CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह




सोलापूर | रविवार, १५ जून २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २१७ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com epaper.
dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



स्वदेशी आणि लघुउद्योग भारताच्या आर्थिक योजनेचा पाया असला पाहिजे. त्यामध्ये सद्भाव, संस्कृती, राष्ट्रीय धोरण आणि अनुशासन यांचा समावेश असावा. स्वदेशीला प्राधान्य देताना जागतिक स्तरावर होत असलेल्या नवोन्मेषाचा स्वीकार करण्याचा विरोध करू नये. आपण आत्मनिर्भर होण्यासाठी आपल्या गरजेच्या वस्तूंची निर्मितीसुद्धा देशातच केली पाहिजे. नैसर्गिक शेती आवश्यक आहे. नैसर्गिक शेतीने केवळ शेतकऱ्यांचे उत्पन्नच वाढणार नाही, तर शेतीमध्ये शाश्वतता आणि लवचीकता देखील येईल.

**पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष भारतीय जनसंघ

# इराण-इस्रायल जिद्दीला पेटले

## एकमेकांवर लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रांनी भीषण हल्ले ● तेल अवीवमध्ये इमारतींचे प्रचंड नुकसान

**तेल अवीव/तेहरान, १४ जून**

जगाचे इंधनाचे भंडार असलेल्या मध्यपूर्वेत इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षाने भीषण स्वरूप धारण केले आहे. शुक्रवारी इस्त्रायलच्या २०० लढाऊ विमानांनी तेहरानवर बॉम्ब आणि क्षेपणास्त्रांनी हल्ले केल्यानंतर शनिवारी इराणने पलटवार केला. दीडशेपेक्षा जास्त बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांनी इस्त्रायलवर मारा करीत मोठे नुकसान केले. याला प्रत्युत्तर म्हणून शनिवारी पहाटे पुन्हा इस्त्रायलने हल्ला केला. यामध्ये इराणचे दोन वरिष्ठ लष्करी कमांडर ठार झाले असून काही लष्करी तळ उध्वस्त केले.

मध्यपूर्वेतील दोन देशांत युद्धाची व्याप्ती वाढत आहे. शनिवारी पहाटे इराणने इस्रायलवर केलेल्या क्षेपणास्त्र आणि रॉकेट हल्ल्यानंतर इस्रालयने पलटवार केला. पहाटेच्या सुमारास इस्रायलच्या जेरुसलेम आणि इतर भागांत स्फोटांचे आवाज ऐकू आले

इस्रायलने इराणविरुद्ध आतापर्यंतचे सर्वांत मोठे हल्ले सुरू केल्यानंतर अणुसुविधांना लक्ष्य करून वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना ठार केले. आणि महत्वाच्या पायाभूत सुविधा नष्ट केल्या. दरम्यान इस्रायलने तेहरानवर हल्ल्याची तिसरी फेरी सुरू केली. शहराच्या काही भागांत स्फोट झाल्याचे वृत्त होते.

सशस्त्र दलाच्या जनरल स्टाफचे गुप्तचर उपप्रमुख जनरल घोलामरेझा मेहराबी आणि ऑपरेशन्स उपप्रमुख जनरल मेहदी रब्बानी हल्ल्यात ठार झाले. इस्रायली हल्ल्यांमुळे इराणच्या फोर्डो अणुकेंद्राला मर्यादित स्वरूपाचे नुकसान झाल्याच्या वृत्ताला इराणने दुजोरा दिला.

युरेनियम संवर्धन केंद्रातील काही भागांचे मर्यादित नुकसान झाले आहे. आम्ही आधीच उपकरणे आणि साहित्याचा महत्त्वाचा भाग बाहेर काढला आहे. त्यामुळे कोणतेही नुकसान झालेले नाही. उत्सर्जनाबाबत काळजी करण्याची गरज नाही, असे अणुऊर्जा संस्थेचे प्रवक्ते बेहरोझ कमालवंदी यांनी सांगितल्याचे वृत्त 'द टाईम्स ऑफ इस्रायल'ने दिले आहे. (वृत्तसंस्था)





इराणच्या बहुतांश क्षेपणास्त्रांना इस्त्रायलच्या आयर्न डोमने हवेतच नष्ट केले. मात्र काही क्षेपणास्त्रे नागरी वस्तीत कोसळल्याने तेल अवीवमधील घरांचे मोठे नुकसान झाले

### इस्रायलची दोन एफ-३५ विमाने पाडली

इस्रायलचे दोन अत्याधुनिक लढाऊ विमान एफ-३५ विमाने पाडली, असा दावा इराणने केला आहे. इराणच्या हवाई संरक्षण यंत्रणेने ही विमाने शुक्रवारी नष्ट केली, असे इराणची सरकारी वृत्तसंस्था तस्नीम न्यूज एजन्सीने म्हटले आहे. विमानाला क्षेपणास्त्र धडकल्यावर पॅराशूटच्या मदतीने उतरलेल्या एका इस्त्रायली महिला वैमानिकाला अटक करण्यात आली. मात्र, इस्रायलच्या आयडीएफने इराणचा हा दावा चुकीचा असून, इराणी माध्यमे अपप्रचार करीत असल्याचे म्हटले आहे.

### मिसाईल लाँचर नष्ट केल्याचा दावा

शनिवारी केलेल्या ताज्या हल्ल्यात पश्चिम इराणमधील मिसाईल लाँचर पॅड नष्ट केल्याचा दावा इस्त्रायली डिफेन्स फोर्सने केला आहे. इराणवरून उडणाऱ्या इस्त्रायली लढाऊ विमानाला लाँचर पॅड दिसताच त्यावर रॉकेट डागून ते नष्ट केले. या हल्ल्याचा व्हिडिओ जारी करण्यात आला आहे.

## अयोध्येतील राम दरबार भाविकांसाठी खुला

**अयोध्या, १४ जून**

अयोध्येतील राममंदिराच्या पहिल्या मजल्यावर स्थापित राम दरबार शनिवारी भाविकांसाठी खुला करण्यात आला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

शुक्रवारी सायंकाळी उशिरा मंदिर ट्रस्टने घेतलेल्या निर्णयानंतर, शनिवारपासून राममंदिराला भेट देणारे भाविकांना राम दरबारात प्रवेश देण्यात आला. सायंकाळी उशिरा निर्णय घेण्यात आल्याने शनिवारच्या दर्शनासाठी सायंकाळी ५ ते ७ आणि ७ ते ९ या दोन स्लॉटसाठी मर्यादित संख्येत पासची व्यवस्था करण्यात आली, अशी माहिती श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सदस्य अनिल मिश्रा यांनी सांगितले.

स्थानिक प्रशासनासोबत झालेल्या बैठकीनंतर श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे सरचिटणीस चंपत राय यांनी भाविकांना राम दरबारात प्रवेश देण्याची परवानगी दिली, असे मिश्रा म्हणाले. रामललाच्या दर्शनासाठी जारी केलेल्या पासेसप्रमाणे राम दरबाराला भेट देऊ इच्छिणाऱ्यांसाठी पास उपलब्ध करून दिले जातील, असे त्यांनी सांगितले. राम जन्मभूमी संकुलात नव्याने बांधलेल्या आठ मंदिरांमध्ये मूर्तींची स्थापना करून, राम दरबार- भगवान राम यांच्या शाही रूपाला ५ जूनपासून अभिषेक सुरू झाला. सकाळी ७ ते ९, सकाळी ९ ते ११, दुपारी १ ते ३, दुपारी ३ ते ५, सायंकाळी ५ ते ७ आणि सायंकाळी ७ ते ७ या दोन तासांच्या वेळेसाठी प्रत्येकी ३०० पास उपलब्ध असतील, अशी माहिती मिश्रा यांनी दिली. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### मृतांच्या कुटुंबीयांना आता सव्वा कोटींची भरपाई

**मुंबई :** एअर इंडियाने अहमदाबाद विमान अपघातात मृतांच्या कुटुंबीयांना २५ लाख रुपयांची अंतरिम आर्थिक मदत जाहीर केली आहे. ही मदत रक्कम टाटा समुहाने यापूर्वी जाहीर केलेल्या १ कोटी रुपयांच्या भरपाई व्यतिरिक्त असेल. एअर इंडियाकडून २५ लाख आणि टाटा समुहाकडून एक कोटी अशी सव्वा कोटींची रक्कम पीडित कुटुंबाला मिळणार असल्याची माहित शनिवारी एअर इंडियाचे सीईओ आणि व्यवस्थापकीय संचालक कॅम्पबेल विल्सन यांनी दिली. विल्सन यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, आम्ही मृतांच्या कुटुंबीयांना आणि या अपघातात बचावलेल्या प्रवाशांना तत्काळ २५ लाख रुपयांची मदत देणार आहे. ही मदत टाटा समुहाने यापूर्वी घोषित केलेल्या एक कोटींच्या भरपाई व्यतिरिक्त असेल. प्रवाशांशिवाय या अपघाताचे बळी ठरलेल्या सर्वांनाच प्रत्येकी २५ लाखांची मदत दिली जाईल.

### विमानाचा क्रमांक एआय-१७१ इतिहासजमा

**नवी दिल्ली :** गुजरातच्या अहमदाबाद येथून लंडनसाठी निघालेले एअर इंडियाचे एआय-१७१ विमान अपघातग्रस्त झाले. यात एक प्रवासी वगळता इतरांचा मृत्यू झाला, अपघाताच्या घटनेनंतर एअर इंडियाने यापुढे विमान क्रमांक एआय-१७१ बदलण्याचा निर्णय घेतला. एआय-१७१ ऐवजी एआय-१५९ हा क्रमांक विमानाला देण्यात आला. एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सांगितले की, विमानाचा क्रमांक बदलण्यामागील हेतू भयंकर अपघाताची कटू आठवण विसरणे आहे. यापुढे अहमदाबाद ते लंडनला जाणाऱ्या विमानाचा क्रमांक एआय- १७१ ऐवजी एआय- १५९ करण्यात आला आहे. १७ जूनपासून बुकिंग प्रणालीत आवश्यक बदल करण्यात येणार आहेत.

## एडन मार्करामच्या विजयी खेळीने दक्षिण आफ्रिका कसोटी जगज्जेता



सामनावीर पुरस्कारासह एडन मार्कराम

**लंडन, १४ जून**

शनिवारी अंतिम कसोटी क्रिकेट सामन्याच्या चौथ्या दिवशी सकाळी आवश्यक असलेल्या शेवटच्या ६९ धावा पूर्ण करून दक्षिण आफ्रिकेने गतविजेत्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५ गड्यांनी विजय नोंदवून आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. प्रत्येक डावांत एक बळी टिपणारा व १३६ धावांची विजयी खेळी करणाऱ्या एडन मार्करामने सामनावीर पुरस्कार पटकावला. टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेने २७ वर्षांनंतर आपले पहिले मोठे क्रिकेट जेतेपद पटकावले.

कर्णधार टेम्बा बावुमाने १३४ चेंडूंत ६६ धावांची खेळी केली व मार्करामसोबत १४७ धावांची भागीदारी करून आपल्या संघाच्या विजयाचा मार्ग सुकर केला. यापूर्वी दक्षिण आफ्रिकेने १९९८ साली चॅम्पियन्स चषक जिंकले होते, परंतु त्यांनी कधीही वन-डे किंवा टी-२० विश्वचषक जिंकले नाही. आणि त्यांनी प्रथमच आयसीसी जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. २०२१ मध्ये पहिल्या जागतिक कसोटी अजिंक्यपदाचा मान न्यूझीलंडने भारताला नमवून पटकावला. २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाने भारतावर मात करून विजेतेपद पटकावले. यंदाच्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या तिसऱ्या आवृत्तीत दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियावर विजय मिळवून हा मान मिळविला. (वृत्तसंस्था)

# उच्चस्तरीय समिती शोधणार विमान अपघाताची कारणे

## नागरी उड्डयन मंत्री नायडू ● तीन महिन्यात येईल अहवाल

**नवी दिल्ली, १४ जून**

अहमदाबाद विमान अपघातामागील कारणे शोधण्यासाठी एका उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती तीन महिन्यात आपला अहवाल सादर करेल, अशी नागरी उड्डयन मंत्री के. राममोहन नायडू यांनी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत सांगितले.

गुरुवारी अपघात झालेल्या एअर इंडियाच्या बोईंग-७८७-८ ड्रिमलाईनर विमानाचा ब्लॅक बॉक्स शुक्रवारी सायंकाळी घटनास्थळावर सापडला. ब्लॅक बॉक्सचे डिकोडिंग केल्यानंतर विमान अपघातापूर्वी काय घडले, याची सखोल माहिती मिळेल, असे देशात विमान वाहतूक सुरक्षा मानके आणि मानक संचालन प्रक्रिया अतिशय कठोर आहेत आणि



सुरक्षितता आणखी सुधारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. विमान अपघातामागील कोणत्याही सिद्धांताचे विश्लेषण केले जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

एअर इंडियाच्या विमान अपघाताची चौकशी सुरळीत सुरू असल्याचे नागरी विमान वाहतूक सचिव समीरकुमार सिन्हा यांनी सांगितले. या अपघाताचा तपास विमान अपघात तपास ब्युरो करीत आहे.

### अकरा मृतदेहांची ओळख पटली

विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांपैकी अकरा जणांची ओळख डीएनए चाचणीच्या आधारे पटवण्यात आली आणि मृतदेह त्यांच्या नातेवाईकांना सोपवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली.

मृतकांची ओळख पटवण्यासाठी डीएनए चाचणी करून मृतदेह त्यांच्या नातेवाईकांना सोपवले जात आहे. याबाबत गुजरात सरकारसोबत समन्वय प्रस्थापित करण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

# सरकारी रुग्णालयात आतापर्यंत २७० मृतदेह

## होस्टेलच्या इमारतीवरील मलबा हटविला




होस्टेलच्या इमारतीवर पडलेल्या विमानाचे अवशेष शनिवारी क्रेनच्या मदतीने हटविण्यात आले

**अहमदाबाद, १४ जून**

विमान अपघातातील २७० मृतदेह आतापर्यंत सरकारी रुग्णालयात आणले गेले, अशी माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली. या विमान अपघातात २६५ जणांचा मृत्यू झाल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात होता. दरम्यान, क्रेनच्या सहाय्याने होस्टेल इमारतीवरील विमानाचा मलबा शनिवारी हटविण्यात आला आहे.

मागील चोवीस तासांत अग्निशमन विभागाला अपघात स्थळावरून एक मृतदेह तसेच काही मानवी अवशेष अपघातस्थळावर सापडले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अपघात स्थळावरून आतापर्यंत जवळपास २७० मृतदेह सरकारी रुग्णालयात आणले गेले, असे बीजे वैद्यकीय महाविद्यालयाच्या जुनियर डॉक्टर्स संघटनेचे अध्यक्ष डॉ. धवल गमेती यांनी सांगितले. अहमदाबाद अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा विभागाने मागील चोवीस तासांत मेघानीनगरमधील अपघातस्थळावरून काही मानवी अवयव तसेच एक मृतहेह ताब्यात घेतला. न्यायवैद्यक व उड्डाण तज्ज्ञांना मदत करणाऱ्या आमच्या पथकाला काही मानवी अवयव शुक्रवारी, तर मृतदेह आज सकाळी सापडला, अशी माहिती मुख्य अग्निशमन अधिकारी जयेश खाडिया यांनी दिली. (वृत्तसंस्था)

## कृषांग जोशी नीट- युजी परीक्षेत महाराष्ट्रातून पहिला

**नवी दिल्ली, १४ जून**



राष्ट्रीय चाचणी संस्थेने शनिवारी नीट- युजी २०२५ चा निकाल जाहीर केला. महाराष्ट्रातून कृषांग जोशी प्रथम तर देशात तृतीय आला आहे. राज्याचाच आरव अग्रवाल सुद्धा पहिल्या दहामध्ये स्थान मिळवण्यात यशस्वी झाला आहे. राजस्थानमधील हनुमानगड येथील महेश केसवानी देशात प्रथम आला आहे. त्याला ७२० पैकी ६८६ गुण मिळाले आहेत. इंदोरमधील उत्कर्ष अवधिया दुसऱ्या क्रमांकावर आहे.

यावर्षी नीट- युजी परीक्षा सुमारे २०.८ लाख विद्यार्थ्यांनी दिली होती. मुलींमध्ये अविका अव्वल ठरले आहेत. दिल्ली, गुजरात आणि महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांनीही या टॉपर्सच्या यादीत स्थान मिळवले आहे. श्रेणीनुसार कटऑफ गुण राष्ट्रीय परीक्षा संस्थेने नीट - युजी २०२५ साठी सर्व श्रेणींसाठी कटऑफ गुण जाहीर केले आहेत. या वर्षी खुला प्रवर्ग आणि श्रेणीतील उमेदवारांसाठी कटऑफ गुण ६८६ ते १४४ दरम्यान निश्चित केले आहेत. याशिवाय ओबीसी, एसी आणि एसटी श्रेणींसाठी नीट - युजी २०२५ चा कटऑफ गुण १४३ ते ११३ दरम्यान निश्चित केला आहे. (वृत्तसंस्था)

# बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन स्थगित

## मंत्री सामंत यांची शिष्टाई; मागण्या मान्य न झाल्यास २ ऑक्टोबरला मंत्रालयात शिरणार

**अमरावती, दि.१४ जून-**

शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी गत ७ दिवसांपासून अन्नत्याग उपोषण करणाऱ्या बच्चू कडू यांनी शनिवारी आपले उपोषण स्थगित करण्याची घोषणा केली. या प्रकरणी त्यांनी सरकारला आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी २ ऑक्टोबरपर्यंतची मुदत दिली आहे.

सरकारने आमच्या मागण्या मान्य केल्या नाही तर २ ऑक्टोबर रोजी आम्ही थेट मंत्रालयात शिरू, असे ते या प्रकरणी सरकारला इशारा देताना म्हणालेत. प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू गत ७ दिवसांपासून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी अन्नत्याग उपोषण करत होते. या उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावली होती. डॉक्टरांनी त्यांना रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला होता. पण त्यानंतरही बच्चू कडू यांनी आपले उपोषण नेटाने पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला होता. त्यांनी परवापासून थेट अन्नत्याग करण्याचाही इशारा दिला होता. त्यामुळे मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी तातडीने त्यांची भेट घेऊन त्यांना सरकार



आपल्या मागण्यांवर सकारात्मक असल्याचे सांगत त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. त्यानंतर बच्चू कडू यांनी उदय सामंत यांच्या विनंतीचा मान राखत आपले अन्नत्याग उपोषण मागे घेण्याची घोषणा केली. उद्याचे चक्का जाम आंदोलन स्थगित करण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

बच्चू कडू उपस्थितांशी संवाद साधताना म्हणाले, सरकारने आपल्या मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आपण हे आंदोलन मागे घेत नाही, तर स्थगित करत आहोत. सरकारने आपल्या मागण्यांवर ठोस निर्णय घेतला नाही, तर २ ऑक्टोबर रोजी आपण थेट मंत्रालयात शिरू. आपण सरकारला छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखा चकवा देऊ. सांगू नागपूरला व जाऊ मुंबईला. यांना आपण एकदा छत्रपतींचा गनिमी कावा दाखवू. मुख्यमंत्री सध्या आम्हाला तारीख सांगण्यास तयार नाहीत. पण आम्ही त्यांना २ ऑक्टोबरची तारीख दिली आहे. या तारखेपर्यंत सरकारला कर्जमाफी द्यावीच लागेल. अन्यथा आम्ही त्यांना माफ करणार नाही. आत्ता आपण हे अन्नत्याग आंदोलन स्थगित करत आहोत. मी कार्यकर्त्यांचा अंत पाहू शकत नाही. ते माझ्याशिवाय उठण्यास तयार नाहीत. एक आज्जी तर ऐकण्यास तयारच नव्हती. सर्वच जातीधर्माच्या लोकांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. त्यांचे मी आभार मानतो. हे यश आमचे नव्हे तर इथे येणाऱ्या सर्वांचे यश आहे. आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर आम्ही उदय सामंत यांच्या घराबाहेर आंदोलन करू, असा इशाराही बच्चू कडू यांनी यावेळी दिला.

### अजित पवारांच्या कार्यक्रमात गोंधळ

**प्रहारचे कार्यकर्ते आक्रमक; पोलिसांनी घेतले ताब्यात**

**पुणे :** राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, तसेच दिव्यांगांना सहा हजार रुपये मासिक पेन्शन देण्यात यावे, या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यक्रमात चांगलाच गोंधळ घातला. गेल्या सात दिवसापासून प्रहार पक्षाचे प्रमुख बच्चू कडू हे आमरण उपोषण करत आहेत. त्यांच्या मागण्या मान्य करण्याची मागणी या आंदोलकांनी केली आहे. गेल्या सात दिवसापासून प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी अन्न त्याग आंदोलन सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आज सातवा दिवस आहे. या आंदोलनामुळे त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत आहे. त्यामुळे प्रहारच्या कार्यकर्त्यांनी अजित पवार यांच्या पुण्यातील कार्यक्रमात गोंधळ घातला. या वेळी त्यांनी बच्चू कडू यांना न्याय देण्याची मागणी या आंदोलकांनी केली. तसेच बच्चू कडू यांच्या सर्व मागण्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात अशी घोषणाबाजी देखील कार्यकर्त्यांनी केली. या आंदोलनाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी अजित पवार यांचा कार्यक्रम बंद पडण्याचा प्रयत्न केला. अजित पवार यांच्या भाषणाला सुरुवात होताच त्यांनी चांगलाच गोंधळ घातला. या वेळी अजित पवार यांनी आंदोलकांना समजून सांगण्याचा देखील प्रयत्न केला. मात्र आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले. 'बच्चू कडू यांना न्याय द्या' अशा शब्दात यावेळी आंदोलकांनी घोषणाबाजी केली.

# आमदार संजय कुटेंचे घर जाळण्याचा प्रयत्न

**जळगाव जा., १४ जून**

बावनबीर येथील शेतकऱ्याचे मागील वर्षी अतिवृष्टीमुळे शेतीचे नुकसान झाले. त्याचा मोबदला न मिळाल्याने या शेतकऱ्याने शासनाविरोधात रोष व्यक्त करीत जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. संजय कुटे यांचे निवासस्थान पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना १३ जून रोजी मध्यरात्री उघडकीस आली. या घटनेमुळे संपूर्ण मतदारसंघात एकच खळबळ उडाली आहे.

१३ जूनच्या मध्यरात्री आमदार संजय कुटे त्यांच्या जळगाव जामोद येथील निवासस्थानी असताना संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर येथील शेतकरी विशाल मुरुख या तरुणाने त्यांच्या निवासस्थानाच्या परिसरात प्रवेश मिळवला.

मला मागील वर्षीच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा मोबदला अद्याप न मिळाल्याने मी आमदारांचा बंगला जाळून टाकतो, असे म्हणत पेट्रोलची कॅन घेऊन बंगल्याच्या प्रवेशद्वारकडे जात असताना डॉ. कुटे यांचे स्वीय साहायक प्रकाश राऊत यांनी त्या शेतकऱ्याला पकडले व पोलिसांच्या स्वाधीन केले.

या प्रकरणी पोलिसांनी शेतकरी विशालविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विशालला पोलिसांनी आज न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याची जामिनावर सुटका केली. घटनेचा पुढील तपास जळगाव जामोद ठाणेदार श्रीकांत निचळ यांच्या मार्गदर्शनात कॉन्स्टेबल संजय वेरूळकर करीत आहेत. (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे...



### सोपान गायकवाड म्हणजे कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे व्यक्तीमत्व होते : अविनाश मडिखांबे

**अक्कलकोट दि.१४ जून-**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे सोलापूर जिल्हा जिल्हा माजी उपाध्यक्ष, चिटणीस तथा काजी कणबसचे माजी उपसरपंच सोपान गायकवाड हे एक आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे व्यक्तीमत्व होते. त्यानी नामदार रामदास आठवले, प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या नेतृत्वा खाली रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून सातत्याने उपेक्षितांच्या मानवी हक्कासाठी त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचार विरुद्ध जिवनाच्या अखेर श्वासा पर्यंत संघर्ष केला केला आहे. आज रिपब्लिकन चळवळीत त्यांची प्रकर्षाने उणिव भासते आहे. अशा भावपूर्ण शब्दात रिपाइं (आठवले) चे अक्कलकोट तालुका अध्यक्ष आविनाश मडिखांबे यानी काजीकणबस येथे आयोजित कार्यक्रमात आदरांजली वाहिली. काजीकणबस (ता.अक्कलकोट) येथे रिपाइं (आठवले) चे सोलापूर जिल्हा सचिव तथा काजीकणबस चे माजी उपसरपंच दिवंगत सोपान यशवंत गायकवाड यांच्या प्रथम स्मृतिदीना निमित्ताने रिपाइं सह गायकवाड परिवाराच्यावतीने आदरांजलीपर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मडिखांबे बोलत होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुध्द महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कालकथित सोपान गायकवाड यांच्या प्रतिमांचे पूजन करून आभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपसरपंच दत्ता मुणाळे, पोलीस पाटील दिपक मंठाळे, रिपाइंचे धाराशिव जिल्हा युवा कार्याध्यक्ष तथा पत्रकार अरुण लोखंडे (जळकोट ता.तुळजापर) आदींची ही आदरांजलीपर भाषणे झाली. प्रास्ताविक पिआरपीचे नेते पँथर रत्नाकर गायकवाड यानी केले तर सूत्रसंचालन रिपाइंचे धाराशिव जिल्हा सचिव एस.के.गायकवाड यानी केले. यावेळी मारुती खारवे, आरविंद लोखंडे, रिपाइंचे भैया इंगळे, विनायक गायकवाड, अविनाश गायकवार, किसन खारवे, मल्हारी वाघमारे, हरिष गायकवाड, जयहिंद गायकवाड, लखन कांबळे, नवनाथ कांबळे, दिपक गायकवाड, राजकुमार गायकवाड, भैय्यासाहेब इंगळे, भीम मडिखांबे, शिक्षाबाई जेटीथोर, रमेश जेटीथोर उपस्थित होते.



### नान्नजच्या घोडके विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**सोलापूर, दि.१४ जून-**

**२५ वर्षांच्या आठवणींना दिला उजाळा**

नान्नज (ता.उत्तर सोलापूर) येथील जी.बी. घोडके विद्यालयात दहावीतील सन १९९९ मधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा घेण्यात आला. २५ वर्षांनी एकत्र आलेल्या या विद्यार्थ्यांनी आठवणींना उजाळा दिला. २५ वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्यात अनेक सेवानिवृत्त शिक्षक कर्मचाऱ्यांनी ही हजेरी लावली होती. उपस्थित सर्व शिक्षकांचे आशीर्वाद घेतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुरुषोत्तम कुलकर्णी होते. यावेळी उद्धव गरड, सिद्धेश्वर गोफणे, लक्ष्मण तोडकर, बाबुराव गुंड, मुख्याध्यापक रमेश आगलदिवटे, पाटील माजी कलार्क दत्तात्रय पाटील, माजी शिपाई दगडू टोणपे आदीसह मान्यवर इतर शिक्षक उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयास लोखंडी कपाट भेट देऊन ऋण व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मनिषा पाटील व आंनद ढोनसळे यांनी तर आभार दिपक अंधारे यांनी मानले.

### फोटो एडीट करून धमकी देणाऱ्यांवर गुन्हा

**सोलापूर, दि.१४ जून-**

फोटो एडीट करून धमकी देत महिलेसोबत जबरदस्तीने शरीरसंबंध करणाऱ्यावर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन महादेव सुकदेव सोलंकर (रा. हेरिटेज फार्म, जुळे सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फेब्रुवारी ते मार्च २०२५ या कालावधीत महादेव सोलंकर याने पिडीत महिलेला तिचा फोटो एका अश्लिल चित्रास लावून एडिट केलेला व्हिडीओ तिच्या वॉटसअॅपवर पाठवून दिला. हा व्हिडीओ व फोटो व्हायरल करतो अशी वारंवार धमकी देऊन पिडीतेच्या मोबाईलवर अश्लिल मेसेज पाठवून पिडीतेला एडिट केलेला व्हिडीओ डिलीट करतो सांगून पिडीतेला तुळजापूर रोडवर बोलावले. पत्र्याच्या रूममध्ये नेऊन तिच्याशी जबरदस्ती केली. महिला सहायक पोलिस निरीक्षक गंपले पुढील तपास करीत आहेत.


### जाहीर नोटीस

सोलापुरातील तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि।। व सब डि।। सोलापूर ता. उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका सोलापूर येथील मुस्लिम पाच्छा पेठ येथील राहुल गांधी झोपडपट्टी मधील झोपडी घर नं.१०, यांसी मिळकत क्रमांक १३१४४०००१२, यांसी हद्द १०X१५ फुट असे एकूण क्षेत्रफळ १५० चौ. फुट इतके असून यात १०X१५ फुट मापाची चोहो बाजूने व वरती पन्हाळी पत्रे घातलेल्या एक खोली आहे. यांसी चतुः सिमा- पूर्वेस : बाबूराव खरात यांची झोपडी क्र.१०ब व १०क, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : शिल्पा खरात यांची झोपडी क्र. १०अ, उत्तरेस : अनिता वाघमारे यांची झोपडी जागा.

वर नमूद संपूर्ण झोपडी घरजागा ही आमचे अशिल श्रीमती ललिता हरिचंद्र चव्हाण, रा. १०, राहुल गांधी नगर झोपडपट्टी, मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर यांचे पती हरिश्चंद्र नागनाथ चव्हाण यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची होती. त्यांचे दिनांक २१/०८/२०२३ रोजी निधन झाले आहे. आमचे अशिल पत्नी म्हणून कायदेशीर वारसदार आहेत. आमचे अशिल श्रीमती ललिता हरिचंद्र चव्हाण यांनी तसे सो.म.पा. च्या व ग.व.सु. विभागात त्यांच्या नावाची नोंद वर नमूद झोपडी जागेवर करणेकामी वारस प्रतिज्ञापत्र लिहून दिले आहे.

सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मार्गाने गुंतविलेली नाही. तरी सदरहू मिळकतीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लिज, लिन, इजमेंट राईट, कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा अगर इतर बँकेचा बोजा वगैरे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ (पाच) दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी, लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली तारीख १४/०६/२०२५

सही/-
विद्या आर. कंटकधोंड
बी. कॉम. (ऑन) एलएल. बी. अॅडव्होकेट
नोटरी भारत सरकार,
फ्लॅट नं. १२, हेरीटेज सॅन्चुरी अपार्टमेंट,
गीता नगर, वालचंद कॉलेज जवळ,
सोलापूर-४१३००६ मो. ९०११४६०६४६
श्रीमती ललिता हरिचंद्र चव्हाण
या अशीलातर्फे अॅडव्होकेट


# अवकाळीमुळे जिल्ह्यात २२ हजार हेक्टरचे नुकसान

## नुकसानीचा अहवाल दोन दिवसात शासनाकडे सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

अनेक वर्षांचे प्रचलित आडाखे मोडून काढत यंदा मे महिन्यातच सोलापुरातच नाहीतर अवघ्या राज्यात दाखल झालेला अवकाळी आणि मान्सूनचा पाऊस शेतकऱ्यांसाठी खास ठरण्याची शक्यता आहे. मात्र हा पाऊस प्रमाणापेक्षा जास्त झाल्याने जिल्ह्यातील ३२ हजार ४४० शेतकऱ्यांचे २१ हजार ९८८ हेक्टरवरील उन्हाळी पिके, फळबागांचे व भाजीपाल्यानचे मोठे नुकसान झाल्याचा



प्राथमिक नुकसानीचा अहवाल जिल्हा प्रशासनाकडून शासनाकडे येत्या २ दिवसात सादर केला जाणार आहे.

१५ मे ते ३० मे पर्यंत यंदा २३० मिलीमीटर इतका उच्चांकी पाऊस झाला आहे. या पावसाबरोबर वादळी वारे आणि विजांमुळे शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान झाले आहे. या कालावधीत जिल्ह्यात अतीपावसाने भिंती पडून २ जणांचा मृत्यू झाला होता तर १ जणाचा वीज पडून मृत्यू झाला होता. इतकेच नाहीतर अनेकांच्या घरांची पडझड झाली होती तर काहीजणांची जनावरेही दगावली होती. याचबरोबर अनेक शेतकऱ्यांचे आंबा, पपई, केळी, द्राक्ष, भुईमुग, कागदी लिंबू, कलिंगडे आदी पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसाने गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतली आणि आता पावसाचा पुन्हा जोर वाढला आहे. या पावसाने अतिरेक केला तर मात्र खरिपाच्या पेरण्याची अडचण होण्याची भीती जाणकार शेतकरी व्यक्त करीत आहेत.

### तालुकानिहाय नुकसानीची स्थिती अशी

जिल्हा प्रशासनाकडून मिळालेल्या नुकसानीच्या अधिकृत अहवालानुसार अक्कलकोट तालुक्यातील १४८ शेतकऱ्यांचे ८३.३० हेक्टरवर नुकसान झाले आहे. बार्शी बाधीत शेतकरी ५ हजार १३८ २४०१.३८ हे. नुकसान, करमाळा ८८३० शेतकरी आणि ७ हजार २२७.५२ हे. नुकसान, माढा १० हजार १४७-७ हजार ५७० हे., माळशिरस ३१७३-१८१२.१० हे., मंगळवेढा ४३-५७.७० हे., मोहोळ १४३१-८७८.५३ हे., उत्तर सोलापूर २१७९-१०७९.०५ हे.,पंढरपूर ५७४-३२४.७० हे., दक्षिण सोलापूर ६४७-४८४.६० हेक्टर, सांगोला १२०-८५.९५ हे. असे जिल्ह्यातील ३२ हजार ४४० शेतकऱ्यांचे २१ हजार ९८८.८३ हेक्टरवरील नुकसान झाले आहे.

### पावसाने उसंद दिली की तिफन चालू

जूनच्या सुरूवातीला पावसाने विश्रांती घेतल्याने काही भागात जमिनीचा वापसा झाला आणि तब्बल १७ टक्के जिल्ह्यात पेरणी झाली. मे महिन्यात पडलेल्या पावसाचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होणार असून, यामुळे यंदा शेतीत पीक चांगले येईल, असा अंदाजही कृषी अभ्यासक आणि जाणकार शेतकरी सध्या तरी बांधत आहेत. दरम्यान, पावसाने यासाठी उघडीप देण्याचीही तितकीच गरज आहे.

# अक्कलकोट मंदिर परिसरात रोजच वाहनांची कोंडी; पोलीसांचे नाही लक्ष

## भाविकांतून व्यक्त होतोय संताप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१४ जून-**

श्रीस्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी अक्कलकोट तीर्थक्षेत्री येणाऱ्या भाविक पर्यटकांची संख्या दिवसोंदिवस प्रचंड प्रमाणात वाढत आहे. किमान गुरुवार, शनिवार, रविवार व पौर्णिमा ह्या दिवशी अधिक गर्दीच्या कालावधीमध्ये वटवृक्ष मंदिर परिसरात वाहतुक कोंडी होत आहे. नियंत्रक पोलीसांनी परिसरात होणाऱ्या वाहतुकीच्या कोंडी बाबत दक्षता घेऊन भाविकाना सहकार्य करावे. या समस्याकडे लक्ष देणारा याचा कोणी वाली आहे की नाही असा संतप्त सवाल भाविकांतून व्यक्त केला जात आहे.



वटवृक्ष मंदिर परिसरात वाहने सुरळीत जाणे येणे करिता कायम स्वरूपी फिक्सड पॉईट वाहतुक नियंत्रक पोलीसाची नेमणुक करून गर्दी कालावधीत विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. मात्र भाविकांच्या समस्याकडे लक्ष देण्यासाठी याचा कोणी वालीच नाही अशा संतप्त प्रतिक्रिया भाविकांतून व्यक्त होत आहेत. वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर परिसरात मोठया प्रमाणातील अतिक्रमण, अरुंद रस्ते, रस्त्यावरच उभ्या अॅटो रिक्षा, भाविकांची वाहने, पार्किंग यामुळे वाहनांची वारंवार प्रचंड कोंडी होते. यामुळे भाविकांना, वाहनधारकाना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. वृद्ध, लहान मुले यांना या परिसरातून जीव मुठीत घेऊन जावे लागते. रोज लाखो भाविक वटवृक्ष मंदिर परिसरात येतात. मात्र येथील रस्ते अद्याप अरुंदच आहेत. मंदिराजवळ आले तरी भाविकांना मंदिर कुठे आहे असे विचारावे लागते. परिसरातील रस्ते व भाविकांना दुरवरून किमान दोन टप्यावरून मंदिर ठळकपणे दिसावे. वाहनांची कोंडी नष्ट व्हावी. वाहने पार्किंगकरिता व अॅटोरिक्षा वाहनाना थांबा वाहतुकीच्या अडथळा विना असलेली जागा अॅटो रिक्षा थांबाकरिता निश्चित करावी. भाविकांभोवती रस्त्यावर वाहतुकीस अडथळा ठरणारे वाहने अॅटो रिक्षा थांबे यांच्यावर नगर पालिका व पोलीसांनी संयुक्त पणे तोडगा काढावा भाविकांची गैरसोय थांबवावी अशी मागणी लहुजी शक्ती सेना जिल्हा संपर्क प्रमुख वसंत देडे यांनी केली आहे.

# आवडीचे क्षेत्र निवडा : प्रा.गोसावी

## आवताडे प्रतिष्ठानतर्फे ७०० गुणवंतांचा झाला सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ जून -**

करिअरसाठी सगळी क्षेत्र समान आहेत.आपल्या बुद्धीनुसार आवडीचे क्षेत्र निवडा असे आवाहन प्रसिद्ध व्याख्याते प्रा.यशवंत गोसावी यांनी केले.



पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील दहावी बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते झाला. अध्यक्षस्थानी भाजपाचे जिल्हाअध्यक्ष शशिकांत चव्हाण हे तर पंढरपूर येथील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी युवक नेते प्रणव परिचारक होते. प्रमुख मार्गदर्शक प्रा. गोसावी होते. पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील सुमारे ७०० गुणवंत विद्यार्थ्यांचा स्कूल बॅग, ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कोणत्याही यशाने हुरळून व अपयशाने खचून न जाता स्वतःच्या क्षमतांवर विद्यार्थ्यांनी सिद्ध करणे गरजेचे असल्याचे आमदार आवताडे यांनी सांगितले. यावेळी शिक्षणाधिकारी कादर शेख, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, उपशिक्षणाधिकारी श्रीमती हवेली, पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, तहसीलदार सचिन लंगोटे, पंढरपूर मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी योगेश कदम, सुशील संसारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, पोलीस निरीक्षक तैयुब मुजावर, पोलीस निरीक्षक शिरीष हुंबे यांनीही मनोगत मांडले. यावेळी माजी सभापती सोमनाथ आवताडे, नवनाथ पवार, माजी प्राचार्य प्रा. येताळा भगत, प्रदीप खांडेकर, विजयसिंह देशमुख, संजय ननवरे, नीला आटकळे, राजेंद्र सुरवसे, माजी संचालक सुरेश भाकरे, शिवाजीराव नागणे, दत्तात्रय जमदाडे, सरोज काझी, प्रकाश गायकवाड, दीपक वाडदेकर, द्रोणाचार्य हाके, तुकाराम कुरे, डी. सी.जाधव, विनायकराव यादव, चंद्रकांत पडवळे, अजित जगताप, प्रवीण खवतोडे, अंबादास कुलकर्णी, गटशिक्षणाधिकारी दर्शन मेहता, ज्ञानदेव जावीर, महादेव जाधव, संपादक दिगंबर भाकरे, सुदर्शन यादव, दादासाहेब ओमणे, गौडाप्पा बिराजदार, मोहन बागल, बाबासो पाटील, दत्तात्रय ताड, विश्रांती भुसनर, खंडू खंदारे, महादेव लवटे, यांचेसह मान्यवर व शिक्षणप्रेमी तसेच दोन्ही तालुक्यातील ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कै.महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठानच्या पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी परिश्रम घेतले.

# आलेगाव येथे कार्यकर्ता संवाद मेळावा संपन्न

## खासदार मोहिते-पाटील यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१४ जून-**

आलेगाव(बु) ता. माढा येथे ग्रामस्थांच्या वतीने खासदार धैर्यशील माहिते-पाटील व आमदार अभिजीत पाटील यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता संवाद मेळावा संपन्न झाला. यावेळी या दोघांचा ग्रामस्थांतर्फे नागरी सत्कार करण्यात आला.



खासदार धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले की, माढा मतदारसंघातील लोकांनी ज्या विश्वासाने आम्हाला निवडून दिले आहे त्याच विश्वासाने जनतेचे प्रत्येक काम करण्याची जबाबदारी आमची असून रस्ते, वाहतूक, पिण्याचे पाणी, आरोग्य विषयक सुविधा, एमआयडीसीच्या माध्यमातून युवकांना रोजगार उपलब्ध, वीजपुरवठा या व इतर बाबींसह युवक, महिला, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांचे आयुष्यमान कसे सुधारेल यासाठी सर्वसमावेशक प्रयत्न करीत असल्याचे भावोद्गार त्यांनी काढले. माढा तालुक्यातील जनतेने अनेक प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने कटिबद्ध असून उजनी धरणाच्या पाण्याची नियोजन, भीमा नदीची आवर्तने, कोंढारभागातील बंधाऱ्यांचा प्रश्न, राष्ट्रीय महामार्गावरील भिमानगर येथे उड्डाणपूल, आरोग्यविषयक उपचारांसाठी निधीसह अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन आमदार अभिजीत पाटील यांनी केले. यावेळी रावसाहेब देशमुख, शिवसेना तालुकाप्रमुख मधुकर देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ नेते पंढरीनाथ चंदनकर, महाराष्ट्र राज्य लेबर फेडरेशन अध्यक्ष भारत पाटील, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, युवक राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष सूरज देशमुख, शिवसेनेचे तालुकाप्रमुख मधुकर देशमुख, डीव्हीपी बँकेचे अध्यक्ष औदुंबर महाडिक-देशमुख, शंकरराव मोहिते पाटील साखर कारखाना संचालक गोविंद पवार, युवा उद्योजक बाळासाहेब ढेकणे, सुरेश पाटील, अनिल पाटील, टाकळी सोसायटीचे चेअरमन भारत माने, भाऊसाहेब काळे, पंढरीनाथ चंदनकर, गोरख देशमुख, आबासाहेब वाघ, अरुण गाडे, सतीश केचे, महेंद्र पाटील, दादासाहेब कळसाईत, लखन काळे, सुलतान शेख, विकी भोसले, प्रताप पिसाळ आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन सुदर्शन पाटील यांनी केले.

# सहकारमंत्री पाटील यांच्या हस्ते उद्या 'धनश्री' च्या वास्तूचे उदघाटन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१५ जून -**

धनश्री मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. मंगळवेढा शाखा आंधळगाव यांच्या स्वमालकीच्या नूतन वास्तूचे उद्घाटन सोमवार दि. १६ जून रोजी दुपारी अडीच वाजता सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार असून आमदार समाधान आवताडे कार्यक्रमाचे अध्यक्ष असल्याची माहिती धनश्री परिवाराचे संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे यांनी दिली.



यावेळी माजी मंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, माजी आमदार राजन पाटील, आमदार अभिजीत पाटील, आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख, सोलापूर बाजार समितीचे सभापती दिलीप माने, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार दीपक (आबा) साळुंखे-पाटील, माजी आमदार शहाजीबापू पाटील, माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, डीसीसी बँकेचे माजी व्हा. चेअरमन बबनराव आवताडे, सोलापूर जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, मंगळवेढा सहायक निबंधक व्ही. व्ही. वाघमारे, दामाजी शुगरचे चेअरमन शिवानंद पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, भैरवनाथ शुगरचे व्हा. चेअरमन अनिल सावंत, नंदकुमार पवार, लतीफभाई तांबोळी, तानाजी खरात, रतनचंद शहा बँकेचे चेअरमन राहुल शहा, येताळा भगत, अजित जगताप, अशोक चौंडे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत साळे यांचेसह इतर मान्यवर व आंधळगाव परिसरातील सर्व सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित राहणार आहेत.

# शिवसेने नंतर पंढरपुरात भाजपा कार्यकर्त्यांची दबंगगिरी

## आरटीओ अधिकाऱ्यांसमोरच घातला गोंधळ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ जून -**

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने बेशिस्त वाहनांवर कारवाई करण्याची मोहिम घेतली आहे. शुक्रवारी (ता.१३) परिवहन विभागाच्या आधिकाऱ्यांनी पंढरपूर शहरातील बेशिस्त रिक्षांवर कारवाईचा बडगा उगरताच भाजप कार्यकर्त्यांची दबंगिरी समोर आली. कारवाई मागे घ्यावी यासाठी काही भाजपा पदाधिकाऱ्यांनी आरटीओआधिकाऱ्यां समोरच गोंधळ घालत राजकीय दबाव टाकल्याची चर्चा सध्या सुरु आहे. पंढरपूर शहरात नियमबाह्यपणे रिक्षातून प्रवासी वाहतूक सुरु असल्याने परिवहन



विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाई सुरु केलेली आहे. चालक परवाना जवळ न बाळगणे, क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची वाहतूक करणे, रिक्षांची कागदपत्रे जवळ न बाळगणे अशा विविध कारणांमुळे जवळपास ५३ रिक्षांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. कारवाईनंतर रिक्षा चालकांसह काही भाजपा पदाधिकाऱ्यांनी कारवाई मागे घेण्यासाठी अधिकाऱ्यांसमोर गोंधळ घातला.

यामध्ये काही स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्ते देखील सहभागी झाले होते.

पंढरपूर शहरात नियमबाह्यपणे व बेकायदेशीरपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्यां रिक्षांवर कारवाई करण्याचे काम सुरु आहे. एकाच दिवशी ५३ रिक्षांवर शुक्रवारी कारवाईचा बडगा उगारण्यात आला. या कारवाई मध्ये ७ लाख ३९ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई केली आहे. कोणत्याही परिस्थिती मध्ये दंडात्मक कारवाई मागे घेतली जाणार नाही. या पुढे देखील कारवाईत सातत्य ठेवले जाईल.

**- विजय पाटील ( उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,सोलापूर )**

दरम्यान भाजपा पदाधिकाऱ्यांच्या या राजकीय स्टंटबाजी बद्दल सर्वसामान्य नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. अलिकडेच विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी जात असताना शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी मंदिरसमितीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की केल्याचा प्रकार ताजा असतानाच आता भाजपा पदाधिकाऱ्यांचा परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांसमोरचा गोंधळ समोर आला आहे.आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पोलिस, परिवहनविभाग, नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने शिस्त लावण्याचे काम सुरु आहे.मात्र काही तथाकथीत सामाजिक कार्यकर्ते आणि भाजपा सारख्या शिस्तप्रिय पक्षाचे पदाधिकारीच चांगल्या कामाच्या आड येत असून त्यांच्या कडून चांगल्या कामांना खीळ घातली जात असल्याची सर्वसामान्य नागरिकांमध्ये चर्चा आहे. त्यामुळे अशा दबंगगिरी करणाऱ्या भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे पक्षांच्या वरिष्ठांनी कान टोचण्याची अपेक्षा ही या निमित्ताने व्यक्त केली जात आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# एसटी महामंडळातंर्गत ५ प्रादेशिक विभागांची निर्मिती

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई दि. १४ जून :**

राज्य परिवहन महामंडळाच्या सुनियोजन व निर्णयाचे विकेंद्रीकरण करण्याच्या हेतूने महामंडळातंर्गत ५ प्रादेशिक विभागांची निर्मिती करण्यात आली आहे.मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे व अमरावती असे विभाग बनविण्यात आले असून, प्रत्येक प्रादेशिक विभाग अंतर्गत कार्यरत विभाग व मुख्यालय निश्चित केले आहेत.कर्नाटक परिवहन महामंडळ धर्तीवर हा निर्णय घेण्यात आला असून त्याबाबतचे परिपत्रक नुकतेच काढण्यात आले आहे.



परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांनी त्याबाबत परिपत्रक काढले असून पुढील काही दिवसात हे प्रादेशिक विभाग स्वतंत्रपणे आपले कार्यालय सुरू करित आहेत. महामंडळाच्या नियोजन व पणन खाते अंतर्गत कार्यरत असलेल्या विविध संनियंत्रण समित्यांचे कार्यालय ६डिसेंबर २०१६ पासून बंद होते. परंतु मंत्री सरनाईक हे कर्नाटक राज्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी तेथील महामंडळाच्या विकेंद्रीकरणाची संकल्पना उचलून धरली. त्यामुळे आकार व प्रशासकीय दृष्ट्या कर्नाटक महामंडळाच्या दुप्पट असणाऱ्या महाराष्ट्र एसटी महामंडळाचे देखील किमान ५ प्रादेशिक विभागात विभाजन करावे अशी संकल्पना त्यांनी मांडली. महसूल विभागाच्या धर्तीवर एसटीची यंत्रणा उभी आहे. तालुकास्तरावर आगार जिल्हास्तरावर विभागीय कार्यालय आणि राज्य स्तरावर मध्यवर्ती कार्यालय अशी त्रिस्तरीय रचना सध्या कार्यरत आहे. परंतु राज्य शासनाच्या महसूल विभागा प्रमाणे सहा प्रशासकीय विभागांचा या त्रिस्तरीय रचनेत समावेश नव्हता. त्यामुळे मध्यवर्ती कार्यातून थेट विभागीय कार्यालयाशी संवाद साधणे भौगोलिक दृष्ट्या शक्य होत नव्हते. अर्थात, स्थानिक पातळीवर वाहतुकीचे नियोजन करणे, यात्रा- जत्रा यासाठी जादा वाहतूक करणे असे निर्णय घेण्यासाठी विलंब होत असे, अथवा प्रशासकीय दिरंगाई मुळे त्याचा विपरीत परिणाम एसटीच्या महसूलावर होत होता.

या सर्वांची दखल घेऊन नियोजन आणि समन्वयाच्या हेतूने महामंळातंर्गत ५ प्रादेशिक विभाग करण्याचा निर्णय घेतला आहे. असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. या निर्णयानुसार प्रत्येक समितीसाठी आवश्यक तेवढ्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून, त्या-त्या भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि वेळेत सेवा मिळण्यासाठी सर्व प्रकारचे नियोजन राबवले जाणार आहे.

# २२ जुलै गोवंश जतन संवर्धनदिन म्हणून साजरा होणार : मंत्री मुंडे

**तभा वृत्तसेवा,
मुंबई, दि.१४ जून -**

राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी देशी गायींच्या संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, दरवर्षी २२ जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे. या निर्णयाचा अध्यादेश सरकारने निर्गमित केला आहे.

यापूर्वीच देशी गायीस राज्यमाता-गोमाता म्हणून घोषित करण्यात आले असून, या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी. पश्चिम महाराष्ट्रामध्ये खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ यांसारख्या देशी गायींच्या जाती आढळतात. मात्र, कमी उत्पादनक्षमता व प्रजननक्षमतेमुळे या गायींच्या संख्येत सातत्याने घट होत चालली आहे. यामुळे त्यांचे जतन व संवर्धन करण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, देशी गायींचे जतन व संवर्धन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करून अधिक उत्पादनक्षम देशी गायी तयार करण्याचे उद्दिष्ट शासनाने घेतले आहे. शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन साजरा करताना चर्चासत्रे, शिबिरे, प्रदर्शने व विविध स्पर्धा यांचा समावेश असलेल्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल.

राज्य शासनाच्या आयुक्त, पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या संयुक्त विद्यमाने या दिवसाचे आयोजन करण्यात येणार असून, यासाठी लागणारा खर्च गोसेवा आयोगाच्या निधीतून करण्यात येणार असल्याचे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

# शेतकरी कर्जमाफीसाठी समितीचा खेळ नको

## तातडीने शेतकऱ्याचा सातबारा कोरा करा : हर्षवर्धन सपकाळ

**तभा वृत्तसेवा,
मुंबई, दि. १४ जून-**

शेतकरी कर्जमाफी जाहीर करण्याची गरज असताना महायुती सरकार जाणूनबूजून टाळाटाळ करत आहे. अवकाळी पावसाने शेतकरी संकटात सापडला असल्याने सरकारने कर्जमाफी समितीचा खेळ न करता तातडीने कर्जमाफी व लाडक्या बहिणीला २१०० रुपये द्या आणि जमत नसेल तर खुर्च्या खाली करा, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी दिला .

यासंदर्भात ते म्हणाले की, पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यक्रमात संतप्त शेतकऱ्यांनी जाब विचारला असता त्यांना दमदाटी केली, ही दादागिरी चालणार नाही. तुम्ही जनतेचे सेवक आहात मालक नाहीत, याचे भान ठेवा. कर्जमाफीसाठी समिती नेमण्याची भाषा करता, आश्वासन देताना समितीची आठवण आली नाही का? राज्याची आर्थिक परिस्थिती दिसली नाही का? आणि सर्वात महत्वाचे म्हणजे शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यासाठी सकारकडे निधी नाही तर अदानी अंबानीसाठी लाखो करोडो रुपयांचा लाभ देण्यासाठी पैसा येतो कोठून? शेतकऱ्यांना व लाडक्या बहिणींना पैसे द्यायचे म्हटले की तिजोरीची आठवण येते का? जगाच्या पोशिंद्याचे कंबरडे मोडले असताना सरकार शेतकरी कर्जमाफी देत नाही. शेतमालाला हमीभाव नाही. निवडणुकीवेळी कर्जमाफीचे आश्वासन देऊन मते घेतली व सत्ता मिळवली आणि आता कर्जमाफीबद्दल आम्ही बोललोच नाही, असे सत्ताधारी निर्लज्जपणे सांगत आहेत. असे सांगून ते म्हणाले की, भाजपा युती सरकार हे फक्त अदानी अंबानीसाठी पायघड्या घालते पण शेतकरी व राज्यातील भगिनींना पैसे देताना चालढकल करत आहे.

सुरजागडच्या खदानीमधून मलई खाणार, समृद्धी महामार्गात भ्रष्टाचार, घोडबंदर भाईंदर बोगदा प्रकल्पात भ्रष्टाचार, पुणे रिंग रोड आणि आता अदानीच्या हितासाठी शक्तीपीठच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा मलिदा खाण्याचा उद्योग फडणवीस, अजित पवार व एकनाथ शिंदे यांचा सुरु आहे. सत्तेतून मलाई खाता आणि शेतकरी व भगिनींना देण्यासाठी पैसे कसे नाहीत.. असा प्रश्न सपकाळ यांनी विचारला आहे.

# विद्यार्थ्यांचे परदेशी शिक्षणाचे स्वप्न आता भारतातच पूर्ण होणार

## ●मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांना आशयपत्र प्रदान




**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि.१४ जून-**

भारतीय विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी जाण्याची गरज राहणार नाही कारण आज राज्य शासनाने राष्ट्रीय शिक्षण धोरणातंर्गत पाच परदेशी विद्यापीठांसोबत आशयपत्र प्रदान केले आहे.आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे देशातील पहिले शैक्षणिक हब मुंबई, नवी मुंबईत उभारण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी सांगितले.

**हॉटेल ताज येथे 'मुंबई रायझिंग'** : क्रिएटिंग ॲन इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी' या पाच जागतिक विद्यापीठांना (एलओआय) आशयपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील,केंद्रीय शिक्षण सचिव तथा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष विनित जोशी,अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, ब्रिटनच्या उच्चायुक्त लिंडी कॅमेरॉन, ऑस्ट्रेलियाचे कॉन्सुल जनरल पॉल मर्फी,अमेरिकेचे कॉन्सुल जनरल माईक हँकी, इटलीचे कॉन्सुल जनरल वॉल्टर फेरारा, ॲबर्डीन विद्यापीठाचे उपप्राचार्य ग्लोबल एंगेजमेंट प्रा.सिलादित्य भट्टाचार्य, यॉर्क विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. चार्ली जेफ्री, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ उपकुलगुरू गॉय लिटलफेअर, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष इलिनॉय टेक राज ईचंबाडी, आयईडी चे रिकार्डो बाल्बो,अधिष्ठाता,विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, युनिव्हर्सिटी ऑफ अबर्डीन (स्कॉटलंड, यु.के.),युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क (यु.के.),युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (ऑस्ट्रेलिया),इलीनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अमेरिका),इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन (इटली) ही जगातील पाच नामवंत विद्यापीठे भारतात येत आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात ही विद्यापीठे उभी राहणार आहेत. याचं परिसरात येत्या काही वर्षात मेडिसिटी, स्पोर्टस सिटी आणि इनोव्हेशन सिटी उभारणाऱ्यात येणार आहे. येथे आगामी कालावधीत दहा विद्यापीठ एकत्र येतील अशी संकल्पना राबवण्यिाचा विचार आहे. सध्या या पाच विद्यापीठांमुळे हा परिसर पूर्ण शिक्षण आणि संशोधन साठी ओळखला जाईल.मुंबईची सध्या वित्तीय,औद्योगिक आणि मनोरंजन उद्योगाचे शहर म्हणून ओळख आहे. विद्यापीठामुळे एज्युकेशनल सिटी अशी ओळख होईल.विकसित भारत २०४७ मध्ये हा निर्णय महत्वाची भूमिका बजावेल. असे सांगून ते म्हणाले की, ॲबरडीन विद्यापीठ, यॉर्क विद्यापीठ, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि इस्टिट्यूटो युरोपियो डी डिझाईन हे मुंबई,नवी मुंबईत पूर्ण कॅम्पस आणणार आहेत - राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० शी सुसंगत अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित होत आहे. अटल सेतू निर्माण झाला आहे.पायाभूत सुविधांच्या व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटी यामुळे विद्यापीठाशी निगडित सर्वांना उपयुक्त ठरेल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे परदेशातील अनेक विद्यापीठांना भारतात येण्यासाठी उत्सुकता दाखवली आहे.ज्या भारतीय तरुणांना परदेशी जाऊन शिक्षण घेणं शक्य नाही त्यांचे स्वप्न आता अपुरे राहणार नाही. सध्या पाच विद्यापीठे आली आहेत.

### विकसित भारतासाठी नवीन शैक्षणिक धोरण हातभार लावेल : केंद्रीय शिक्षण मंत्री

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले की,मुंबई ही स्वप्नांची नगरी बरोबरच आर्थिक राजधानी ही असून आगामी कालावधीत मुंबई येथे शिक्षणाचे हब होण्यासाठी परदेशी पाच विद्यापीठांचा खूप महत्त्वाचं योगदान राहील. भारत हा प्राचीन काळापासून शिक्षण क्षेत्रात जागतिकस्तरावर नावलौकिक राहीला आहे. भारतातील शिक्षण संस्थांना परदेशामध्ये आपल्या शाखा उघडता येणे शक्य होणार आहे.भारतात जागतिक दर्जाचे शिक्षण विद्यार्थ्यांना कमी खर्चात उपलब्ध होईल. आज भारतातील आयआयटी, आयआयएम, आयएफ, सिम्बॉयसिस यासारख्या संस्था परदेशामध्ये सुरू झाल्या असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ ढवसे यांनी सुत्रसंचालन केले.प्रास्ताविक सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केले.यावेळी केंद्रीय शिक्षण सचिव विनित जोशी यांनी मनोगत व्यक्त केले.

### नवी मुंबईत ५ जागतिक दर्जाची विद्यापीठे

●**युनिव्हर्सिटी ऑफ ॲबरडीन** : यूकेमधील सर्वात जुन्या विद्यापीठांपैकी एक आणि भारतात कॅम्पस स्थापन करणारे पहिले स्कॉटिश विद्यापीठ असून २०० हून अधिक भारतीय विद्यापीठे आणि संशोधन केंद्रांसह अनेक दशकांच्या विद्यापीठ भागीदारी यामध्ये असून आयआयटी - इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी; एम्स - ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस; मणिपाल अकादमी; आयसीएआर - इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च, आयसीएमआर - इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि दिल्ली विद्यापीठ यांचा समावेश आहे.

●जगातील टॉप १०० विद्यापीठांमध्ये स्थान मिळवलेले आणि आयव्ही लीग समतुल्य संस्था आणि मुंबईत कॅम्पस स्थापन करणारे ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित ग्रुप ऑफ एट (त्र्ट्ट) विद्यापीठांमध्ये पहिल्या क्रमांकावर असलेले वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ*. भारतीय विद्यार्थ्यांच्या आकांक्षा आणि भविष्यात जागतिक कार्यबल आणि अर्थव्यवस्थेच्या विकसित होत असलेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केलेले विज्ञान,औद्योगिक व इंजिनिअरींग या क्षेत्रात व्यवसाय या विषयांमध्ये पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम असतील.

●यॉर्क विद्यापीठ : ही यूकेमधील सर्वात प्रतिष्ठित संशोधन-केंद्रित संस्थांपैकी एक आहे तसेच ते रसेल ग्रुपची सदस्य आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर सुरक्षा, व्यवसाय, अर्थशास्त्र आणि सर्जनशील उद्योगांसह संगणक विज्ञानातील अत्याधुनिक पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध होतील. उदयोन्मुख क्षेत्रातील कार्यक्रम - एआय, सायबर सुरक्षा, सर्जनशील उद्योग - जागतिक उद्योगांच्या इनपुटसह डिझाइन केले जातील.

●इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (इलिनॉय टेक) हे स्वतंत्ररित्या पदवी देणारे आणि भारतात कॅम्पस स्थापन करणारे पहिले अमेरिकन विद्यापीठ आहे.संगणक विज्ञान, अभियांत्रिकी आणि व्यवसाय यासारख्या उच्च मागणी असलेल्या क्षेत्रांमध्ये पदवीपूर्व आणि पदवीधर शिक्षण उपलब्ध होतील.

●युरोपमधील प्रीमियम डिझाइन शाळांपैकी एक, इस्टिटुटो युरोपियो डी डिझाइन फॅशन उत्पादन डिझाइन आणि व्हिज्युअल कम्युनिकेशनमध्ये जागतिक दर्जाचे कौशल्य उपलब्ध करून देईल.

### मिळकत कराची थकबाकी असलेल्या

# खुल्या जागांवर महापालिकेचा बोजा चढविण्याची कार्यवाही सुरु

▸ **महापालिकेच्या पत्रानंतर उत्तर व दक्षिण सोलापूर तहसीलदारांना केले सूचित**

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१४ जून -**

खुल्या जागेच्या मिळकत कराची थकबाकी असलेल्या मिळकतीवर महानगरपालिकेचा बोजा चढविण्याची कार्यवाही करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय तहसिलदार (महसूल) दिनेश पारगे यांनी उत्तर आणि दक्षिण सोलापूरचे तहसीलदार आणि नगर भूमापन अधिकाऱ्यांना तसे कळिवले आहे.

सोलापूर शहरात महापालिका कार्यक्षेत्रामध्ये खुल्या जागेच्या मिळकतींची मिळकत कराची थकबाकी आहे. वेळोवेळी सूचित करूनही संबंधित मिळकतदारांकडून थकबाकी भरली गेली नाही. त्यामुळे अखेर अशा खुल्या जागेच्या मिळकत कराची थकबाकी असलेल्या मिळकतींवर महापालिकेचा बोजा चढविण्यासंदर्भात महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास दि. १७ मार्च २०२५ रोजी पत्राद्वारे कळिवले होते. या पत्रावर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयकडील तहसिलदार (महसूल) दिनेश पारगे यांनी उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूरचे तहसीलदार आणि नगर भूमापन अधिकाऱ्यांना तसे कळिवले आहे. संदर्भीय पत्र व त्यासोबतची कागदपत्रे जोडून देण्यात येत असून प्रकरणी या पत्राच्या अनुषंगाने प्रचलित शासन नियम / तरतुदी विचारात घेवून पुढील कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत सबंधितास व इकडील कार्यालयास अवगत करण्यात यावे, असे तहसीलदार दिनेश पारगे यांनी सूचित केले आहे. यामुळे आता थकबाकीदारांच्या तशा मिळकतींवर बोजा चढविला जाणार आहे.

# जबरी चोरीतील तीन आरोपी गजाआड; ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त

## पंढरपूर पोलिसांची कारवाई



**तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.१४ जून -**

जबरी चोरी करणाऱ्या तीन आरोपींना केवळ बारा तासात येथील तालुका पोलिसांनी गजाआड केले. या आरोपींकडून मोटारसायकल तसेच ७५ हजार रुपये रोख असा मुद्देमाल देखील जप्त करण्यात आल्याची माहिती तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मजावर यांनी दिली.

या कारवाई संदर्भातील सविस्तर माहिती अशी की, पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील रोपळे या गावच्या शिवारातील हॉटेल शिवशंभू मध्ये दि. ७ जून २०२५ रोजी रात्री एक वाजण्याच्या सुमारास यातील फिर्यादी उत्तम बाजीराव गोडगे (रा. माढा तालुका माढा ) व त्यांचे मित्र श्री.धुमाळ हें गावाकडे जाण्यासाठी वाहनाची वाट बघत थांबले होते. त्यावेळी तीन अज्ञात इसमांनी त्या ठिकाणी येऊन लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याच्या सहाय्याने फिर्यादी उत्तम गोडगे व धुमाळ यांना डोक्यात व पाठीत मारहाण करून जबर दुखापत करून जबरी चोरी केली होती. त्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी ८ जून २०२५ रोजी रोपळे - आष्टी रोडवर रात्री ८ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी भैरवनाथ संजय नाडकर (रा. मुंगशी,ता.माढा ) हे रस्त्यावर जात असताना त्यांना चार अनोळखी इसमांनी रस्त्यामध्ये अडवून मारहाण करून जबर दुखापत करून त्यांच्या ताब्यातील ७५ हजार रुपये किंमतीची मोटर सायकल जबरदस्तीने चोरून घेऊन गेले. दरम्यान या दोन्ही घटनेबाबत पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे ४८९। २५ व ४९१। २५ बीएनएस कलम ३०९ वैगरे प्रमाणे दोन्ही घटनेच्या अनुषंगाने पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आलेले होते. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने माहिती मिळताच पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी तपासाची वेगवेगळी तपास पथके तयार केली. त्या नंतर फिर्यादीने सांगितलेल्या आरोपींच्या वर्णनावरून गुन्ह्यातील आरोपींचा मौजे आष्टी (ता. मोहोळ ) या भागात शोध घेतला. त्यावेळी तुषार सुनील कोळेकर (वय २३ वर्षे रा.पंढरपूर, सध्या आष्टी,ता. मोहोळ) , सुरज देशमुख (रा.मोहोळ) आणि राहुल फाळके (रा.मोहोळ ) असे तीन आरोपींना ताब्यात घेऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता सुरुवातीला आरोपींनी उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यानंतर आरोपींकडे सखोल तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. तालुका पोलिसांनी या तिघांना अटक करुन त्यांच्याकडून गुन्ह्यात चोरलेली रक्कम व मोटर सायकल किंमत रुपये ७५ हजार असा मुद्देमाल जप्त देखील करण्यात आल्याचे पोलिस निरीक्षक मुजावर यांनी सांगितले. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस

# आता शहर बससेवेसाठी आग्रही व्हावे...

**वेध**
**प्रशांत माने**
मो. ९८८११ ९१ ४४३

सोलापूरकरांच्या रेट्यामुळे विमानसेवा सुरु झाली आणि उच्चभ्रू नागरिकांची मोठी सोयदेखील झाली. सोलापूरला मोठे उद्योग आणि आयटी पार्क येण्याच्या आशादेखील पल्लवीत झाल्या आहेत. पण आता सोलापुरातील सामान्य आणि मध्यमवर्गीयांसाठी गरजेची शहर बससेवा सुरु करण्यासाठीदेखील सोलापूरकरांनीच वज्रमूठ बांधली पाहिजे. विमानसेवेसाठी जसे विविध सामाजिक संघटनांनी आंदोलन उभारले तसेच सनदशीर आंदोलन शहर बससेवेसाठी उभारण्याची गरज आहे. कारण एकेकाळी सोलापूरचे वैभव असणारी शहर बससेवा गेल्या अनेक वर्षांपासून बंद असल्यासारखी आहे. अनेक वर्षांपूर्वी सोलापुरातील प्रमुख मार्ग कौंतम चौक ते नेहरू नगर या विजापूर मार्गावर ७ नंबर आणि कौंतम चौक ते साखर कारखाना या होटगी रोड मार्गावर ८ क्रमांकाची बससेवा खूपच लोकप्रिय होती. चाकरमान्यांसाठी तर ही बससेवा लाईफलाईनसारखीच होती. सोलापूर शहरातून धावणाऱ्या रिंगरूट बसमुळे तर शहरात कुठेही प्रवास करण्यासाठी सोलापूरकरांची मोठी सोय होत होती. सम्राट चौक, सातरस्ता, राजेंद्र चौक या ठिकाणी महापालिका परिवहन बससेवेचे मोठे बसडेपो कार्यरत होते, पण आता यापैकी सम्राटचौक डेपो तर बंदच असल्यासारखा आहे. एकेकाळी मनपा परिवहन बससेवा इतक्या चांगल्या आर्थिकस्थितीत होती की, परिवहनकडून महापालकेला आर्थिक पुरवठा होत होता असे जाणकार सांगतात. सोलापूरकरांना परवडणाऱ्या पैशात प्रवास आणि हजारोंना रोजगार उपलब्ध करून देणारी शहर बससेवा आता डबघाईला आलेली आहे. जवाहरलाल नेहरू मिशन अंतर्गत सोलापूरला १०० नवीन बसेस मिळाल्या पण त्या सर्व चेसीक्रॅक मिळाल्या. सोलापूरकरांना या नवीन बसेसचा लाभ तर मिळालाच नाही, पण महापालिका प्रशासन आणि संबंधित पुरवठादार कंपनी यांच्यात सोलापूरकरांच्या कररुपी जमा होणाऱ्या पैशातून कोर्टकचेरी मात्र सुरु आहे. 'खाया पिया कुछ नही गिलास फोडा बारा आणा' अशी गत नवीन चेसीक्रॅक बसेस प्रकरणात सोलापूरकरांची झाली आहे. विमानसेवा सुरु झाली याचा आनंद आणि विमानसेवा सुरु करण्यासाठी मोलाचे योगदान देणाऱ्यांचे कौतुक आहे. परंतु सोलापूर शहर हे कामगाराबहुल लोकवस्तीचे शहर असून येथे विडी, बांधकाम, मोलमजुरी, घरेलु कामगार मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. चिंचोळी, अक्कलकोट रोड आणि होटगी रोड इंडस्ट्रीयल इस्टेट अशा तीन मोठ्या औद्योगिक वसाहती सोलापूर शहरालगत आहेत.



१९९२ साली झालेली सोलापूरची हद्दवाढ इतकी प्रचंड आहे की, लोकांना पंचवीस ते तीस किमीचा प्रवास करावा लागतो. सोलापुरातील कामगार, सामान्य नागरिकांसह कष्टकरी, चाकरमानी, मध्यम वर्गीयांसाठी अत्यावश्यक असलेली शहर बससेवा सुरु करणे महापालिकेचे प्रथम कर्तव्य आहे. पण महापालिका प्रशासन शहर बससेवा सुरु करण्यास हतबल असल्याचे चित्र आहे. प्रशासनाने तर सातरस्ता बसडेपोची काही जागा पेट्रोल पंपासाठी भाडेतत्वावर दिली आहे. विमानसेवा सुरु करण्यासाठी रेटा लावून प्रचंड पाठपुरावा करणाऱ्यांनी आता गरजू प्रवाशांचा पण विचार करून शहर बससेवेसाठी आग्रही आंदोलनाचा पवित्रा घेण्याची गरज आहे. कारण सोलापुरातील उध्दट रिक्षावाल्यांचा नाहक त्रास आणि गरजेपेक्षा जास्तीचा आर्थिक भुर्दंड सोलापूरकरांना रिक्षाप्रवासासाठी करावा लागतो आहे. कारण सोलापुरातील रिक्षांना मीटर नाहीत. तरीदेखील जास्तीचे पैसे देवून अथवा अरेरावी सहन करून का होईना पण सोलापूरकरांना बसेस नसल्यामुळे रिक्षाचा आधार तर मिळतो आहे. याला काही चांगले रिक्षाचालक अपवाददेखील आहेत.

अनेक वर्षांची प्रतिक्षा अन् पाठपुराव्यानंतर अखेर सोलापूरच्या विमानसेवेचे घोडे गंगेत न्हाले. दूधाची तहान ताकावर म्हणीप्रमाणे सोलापूर-मुंबई आणि सोलापूर-तिरुपती नव्हे तर थेट सोलापूर-गोवा का होईना पण सोलापूरची विमानसेवा सुरु झाल्याचा जल्लोष सोलापूकरांनी साजरा केला. सोलापूरच्या लोकप्रतिनिधींसह स्थानिक सामाजिक संघटनांनी केलेला सततचा पाठपुरावा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनावर घेतल्याने आणि सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी यशस्वी प्रयत्न केल्यानंतर सोलापूरची विमानसेवा सुरु झाल्याचे समाधान व्यक्त होत आहे. लवकरच म्हणजे येत्या ऑगस्टमध्ये सोलापूर ते मुंबई विमानसेवादेखील सुरु होवू शकते. कारण याला केंद्रीय विमान उड्डान राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दुजोरा दिला आहे. विमानसेवा सुरु झाली की लगेच सोलापुरात उद्योग येतील अथवा आय.टी. कंपन्या येतील असे नाही. कारण त्यासाठी या कंपन्यांना उपयुक्त असे इतर इन्फ्रास्ट्रक्चरदेखील सोलापुरात निर्माण करण्याची जबाबदारी येथील प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची आहे. यात महत्वाचे म्हणजे आयटी कंपन्यांना गरजेचे असे अतिजलद स्पीडचे इंटरनेट, मोठे मॉल्स, मनोरंजनाची साधने आणि शहरातील वक्तशीर बससेवा यासह महत्वाचे म्हणजे किमान एक दिवसाआड तरी शहराला पाणीपुरवठा होणे गरजेचे आहे. औद्योगिक वसाहतींमध्ये दर्जेदार रस्त्यांसह ड्रेनेज व इतर सुविधा महत्वाच्या आहेत. उजनी धरण १३२ टीएमसी इतक्या महाकाय क्षमतेचे असल्याने उद्योगाला पाणी कमी पडणार नाही, पण त्यासाठी शासनपातळीवरील उद्योगासाठी लागणाऱ्या पाण्याची तरतूद करून मंजूरी घ्यावी लागणार आहे.

सोलापूरचा विकास आणि सोलापूरच्या युवक-युवतींना सोलापुरातच रोजगार उपलब्ध होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मूठ आवळणे काळाची गरज आहे. त्यासाठी स्थानिक सामाजिक संघटनांनी दबावगट निर्माण केले पाहिजेत. पालकमंत्री बाहेरचे असले तरी त्यांना सळो की पळो करणारा पाठपुरावा खूप महत्वाचा आहे. यासाठी आवश्यक विमानसेवा सुरु झाली तरी मुंबईची सेवा गरजेची आणि शहराला किमान दोन दिवसाआड तरी पाणीपुरवठा गरजेचे आहे. आता सोलापूरकरांनी महापालिका परिवहनची शहर बससेवा सुरु होण्यासाठी आग्रही सनदशीर आंदोलनाचा श्रीगणेशा केल्यास गरजू व सामान्य नागरिकांमध्येदेखील आपल्याला कोणीतरी वाली असल्याची भावना निर्माण होईल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# आले महाराष्ट्राच्या मना...



आपल्या मनाला वाटेल त्या रीतीने मतदारांचे मन वाकविता किंवा वळविता येईल ही काही राजकीय पक्षांची मानसिकता अजूनही बदललेली नाही. गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात अनाकलनीय आणि काहीशा अनपेक्षितही उलथापालथी झाल्या. बाळासाहेब ठाकरे यांच्या पश्चात शिवसेना हा लहान भाऊ असेल आणि भारतीय जनता पक्ष हा मोठा पक्ष असेल असे भाकीत भाजपचे दिवंगत नेते प्रमोद महाजन यांनी केले, तेव्हा त्याची राज्यात कुजबुजती चर्चा झाली होती. दोन्ही पक्षांच्या राजकीय अपरिहार्यतेपोटी युतीच्या धाग्याने परस्परांसोबत राहण्यासाठी दोन्ही पक्षांची धडपड सातत्याने सुरू असताना प्रमोद महाजन यांनी वर्तविलेले हे भाकीत म्हणजे, भविष्यातील भाजपचे स्वबळाच्या वाटचालीचे स्पष्ट संकेत असल्यामुळे, युतीचा धागा केव्हाही सोडून दिला जाईल, असेही तेव्हा बोलले जात होते. पुढे तसे झाले, याचे मुख्यतः कारण बाळासाहेबांच्या पश्चात शिवसेना पक्षाच्या प्रमुखपदाची माळ गळ्यात घेतलेल्या उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वशैलीत दडलेले होते, हे आता मागे वळून पाहताना स्पष्ट होते. ठाकरे यांच्या नेतृत्वावर नाराजी आणि नापसंती व्यक्त करतच या पक्षातील बडे नेते पक्षाला 'जय महाराष्ट्र' करून वेगळ्या चुली मांडत किंवा शोधत होते, तेव्हा पक्षाच्या भविष्यातील संभाव्य हानीचे गांभीर्य उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वास उमगले नसावे. म्हणूनच, पक्षाबाहेर जाणाऱ्यांबाबतची बाळासाहेबांच्या काळातील शिवसेनेची भूमिका उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाच्या काळात एकशे ऐंशी अंशातून वळली. 'या चिमण्यांनो, परत फिरा, घराकडे' अशी साद घालून पक्षत्याग करणाऱ्या मोहऱ्यांना भावनिकदृष्ट्या माघारी आणण्याचे प्रयत्न बाळासाहेबांच्या काळात झाले होते, तर 'उडाले ते कावळे' अशा शब्दांत संभावना करत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे काही नेते पक्षाबाहेर जाणाऱ्यांची वजाबाकी करत होते. त्यातूनच शिवसेनेची शकले तर उडालीच, पण महाराष्ट्राच्या सत्ताकारणात अपरिहार्यपणे निर्माण झालेल्या युती आणि आघाडीच्या राजकारणातून नगण्य स्थितीपर्यंत पोहोचण्याची वेळही त्यांच्या गटावर आली आहे.

बाळासाहेबांकडे शिवसेनेचे एकहाती नेतृत्व असताना आणि भाजपसोबत युती असतानाही, युतीच्या कारभाराचा रिमोट आपल्या हाती ठेवण्याच्या बाळासाहेबांच्या आग्रहास तेव्हा भाजपच्या नेतृत्वाने कदाचित नाईलाजाने का होईना संमती दिलेली होती. त्यामुळेच, बाळासाहेबांची नाराजी ओढवणार असे वाटताच भाजपचे दिग्गज नेते मातोश्रीचे उंबरठे झिजवून बाळासाहेबांची समजूत काढत युतीचे तारू तग धरून राहील याची काळजी घेत असत. १९९२ मध्ये या दोन पक्षांत युती झाली नाही आणि त्याचा फटका दोन्ही पक्षांना बसला. तेव्हा झालेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत युती नसल्याने काँग्रेसला त्याचा स्पष्ट फायदा झाला व काँग्रेसचे चंद्रकांत हंडोरे महापौर झाल्याने युतीचे बिघडलेले गणित बाळासाहेब ठाकरे व प्रमोद महाजन या दोन्ही नेत्यांनी गांभीर्याने मान्य केले. ते गणित पुन्हा जुळवायचे असेल तर पुन्हा एकत्र येण्याखेरीज पर्याय नाही या वास्तवाची जाणीव दोघांनाही झाली व पुन्हा युतीचा प्रस्ताव घेऊन महाजन यांनी बाळासाहेबांची मनधरणी केली. ४ फेब्रुवारी १९९२ ही तारीख त्या घडामोडींच्या दृष्टीने ऐतिहासिक होती. या दिवशी, प्रमोद महाजन आणि बाळासाहेब ठाकरे यांनी प्रसार माध्यमांमार्फत एक संयुक्त पत्रक जारी केले आणि यापुढे युतीची बेरीज दिसेल, वजाबाकी नाही अशी ग्वाही देत पुन्हा एकदा हातमिळवणी केली. मुंबई महापालिकेच्या त्या निवडणुकीत काँग्रेसला ११२ जागांवर विजय मिळाला होता, तर शिवसेनेस ६९ आणि भारतीय जनता पार्टीला केवळ १४ जागांवर विजय मिळाला होता. महापालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्याची राजकीय समीकरणे वेगळी असतात, लोकसभा-विधानसभेच्या मतांची गणिते तेथे तंतोतंत लागू पडत नाहीत, हे लक्षात घेऊन नव्या युतीची नवी वाटचाल सुरू झाली.

जे लोकसभेला झाले, जे विधानसभेच्या निवडणुकीतही दिसले, ते दुर्दैवाने महापालिकेच्या निवडणुकीत होऊ शकले नाही. याचा अर्थ, युती तुटली, युती फुटली, पण आम्ही कायमचे दुरावलो असा नाही. विभागांची फेररचना झाल्याने आणि काँग्रेसने ती मोठ्या डावपेचातून केल्याने काही त्रांगडी निर्माण झाली, असे स्पष्ट करत या निवेदनाद्वारे ठाकरे-महाजन यांनी दुरुस्तीचे पाऊल टाकले होते. त्याच काळात शिवसेना आणि भाजप या दोन्ही पक्षांत एकेका जागेसाठी अनेकजण दावा करू लागल्याने वाटाघाटी बिनसत असल्याचे लक्षात आले होते. त्यामुळे भविष्यातील सर्व निवडणुका आम्ही एकत्रच लढणार आहोत, एकत्रच बसणार आहोत, आणि युतीची बेरीजच दिसेल, असेही या निवेदनात स्पष्टपणे नमूद केले गेले होते. भाजप आणि शिवसेनेच्या शाखांनी महाराष्ट्रात जेथे जेथे शक्य आहे, तेथे युती मोडण्यापेक्षा युती जोडण्यावर भर द्यावा आणि मैत्रीपूर्ण लढती या भंपक शब्दावर विश्वास न ठेवता एकत्र काम करावे, असा आदेशही उभय नेत्यांनी राज्यातील कार्यकर्त्यांना दिला होता. शिवसेना आणि भाजपची युती ही वैचारिक बैठकीवर आधारलेली व हिंदुत्वाच्या व्यापक हिताचा विचार करून निर्माण झालेली असल्याने आम्ही पुन्हा एकत्र येत आहोत, असा निर्वाळाही या नेत्यांनी एका निवेदनाद्वारे दिला होता.

महाजन आणि ठाकरे यांच्या या संयुक्त निवेदनाचा काळ आता बराच मागे पडला आहे. जवळपास तीन दशकांहूनही अधिक काळाच्या प्रवाहात गेल्या सुमारे दशकभरापासून या दोन्ही पक्षांतील कडवटपणा शिगेला पोहोचल्याचे महाराष्ट्राने पाहिले आहे. ज्यांच्या मुखी परस्परांच्या गुणांची स्तोत्रे असत, त्याच मुखांतून परस्परांवर टीकेची झोड उठविणे सुरू झाले. भाजपच्या नेत्यांना अफझलखानाची औलाद ठरविण्यापर्यंत शिवसेनेच्या नेत्यांनी मतभेदाचे टोकदार दर्शन घडविले आणि युतीचा कटोरा कायमचा फेकून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने भाजपकडे कायमची पाठ फिरवली.

त्यानंतरचा ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील गटाच्या वाटचालीचा इतिहास महाराष्ट्राने पाहिला आहे. गळती लागल्यामुळे, बंडखोरीमुळे आणि सत्तेच्या सावलीस कायमचे दुरावल्याचे स्पष्ट झाल्याने ठाकरे यांचा गट विकलांग झाला आहे आणि बाळासाहेबांच्या नेतृत्वाखालील पक्षाने दाखविलेली, चुकीची दुरुस्ती करण्याची राजनीतीदेखील या पक्षाच्या हातून निसटली आहे. साहजिकच, एका बाजूला बेरजेच्या राजकारणाचे भाजपचे जुने सूत्र जोमदारपणे अवलंबिले जात असताना, शिवसेनेच्या ठाकरे गटाला मात्र वजाबाकीच्या ग्रहणाने ग्रासलेले दिसत आहे. ही बाब आता पुन्हा एकदा महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आल्याने लक्षात आले म्हणूनच, उरल्यासुरल्या आकड्यांतून नव्या बेरजेची गणिते मांडणे ठाकरे गटाकरिता गरजेचे ठरले आहे. येत्या काळात या बेरजेची गणिते कितपत जमतील, त्याबाबत शंका आहेच, पण एकटे पडलेल्या ठाकरे गटासमोर आता दुसरा कोणताच मार्ग नाही, हेही स्पष्ट झाले आहे. २०१७ मध्ये झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेनेच्या गळतीची पहिली प्रचीती आली. या निवडणुकीत शिवसेनेला ८४ तर भाजपला ८२ जागांवर विजय मिळाला. अनेक जागांवर पराभव होऊनही, भाजपहून जास्त जागा मिळाल्याबद्दल शिवसेनेच्या प्रथेप्रमाणे मातोश्रीसमोर शिवसैनिकांचा जल्लोष झाला, पण सत्तासंपादनासाठीच्या चिंतेनेही मातोश्रीवर खलबते सुरू झाली होती. महापालिकेतील सत्ता टिकवून ठेवण्यासाठी व महापौरपदावरील दावा टिकविण्यासाठी अपक्षांसोबत चर्चा सुरू झाल्याचे सांगण्यात येत होते, मात्र, भाजपसोबत युती करण्याचा कोणताही विचार नाही, असा दावा तत्कालीन नेते मनोहर जोशी यांनी केला होता.

उभय पक्षांतील या घडलंय-बिघडलंय नाट्याचे सर्व अंक आता समाप्त झाले आहेत. महापालिकेच्या आगामी निवडणुकीत ठाकरे गटाच्या अस्तित्वाची पुरती कसोटी लागणार हे स्पष्ट झाले आहे. शिवसेनेत फूट पाडून एकनाथ शिंदे यांनी भाजपचे बोट धरले, तेव्हा उद्धव ठाकरे यांनी जनतेच्या न्यायालयात दाद मागितली होती. निवडणूक आयोग किंवा न्यायालयापेक्षा, जनतेच्या मताधारातूनच खरी शिवसेना कोणाची हे स्पष्ट होईल, असे ते वारंवार म्हणत होते. कदाचित, मतदारांच्या मनात जे काही आहे, ते आपल्यालाच कौल देणारे असेल असा त्यांचा विश्वास होता. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांनी आपल्या मनातील बात उघड केली. ठाकरे गटास स्पष्टपणे नाकारले. महाविकास आघाडी म्हणून तीन पक्षांनी एकत्रितपणे निवडणूक लढवूनही, भाजपच्या पारड्यात जनाधाराचा स्पष्ट कौल पडला, तेव्हाच मतदारांच्या मनात काय आहे हे ठाकरे यांनी ओळखलेही होते. कार्यकर्त्यांनी नाकारले तर आपण पदावरून पायउतार होऊ, असे ते पक्षफुटीनंतर वारंवार सांगत असत. मात्र, निवडणुकीत जनतेने नाकारल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही, जनतेच्या मनात अजूनही आपले स्थान अढळ असल्याचा आव आणत ते भावी निवडणुकांची रणनीती आखत आहेत. एका अस्तित्वाच्या अपरिहार्यतेपोटी एकत्र येण्याच्या काही प्रयत्नांस, जनतेच्या भावनांचा बेगडी मुलामा देत ठाकरे ब्रॅण्ड या नावाचे पितळ उजळण्याचा नवा प्रयत्न सुरू झाला आहे. उद्धव ठाकरे यांचा गट आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोहोंनाही, जनतेने, मतपेटीतून सातत्याने नाकारले आहे. युतीच्या कुबड्या नसतील तर स्वबळावर सत्ता स्थापणे शक्य नाही याची जी जाणीव बाळासाहेबांना होती, ती उद्धव ठाकरेंना नसेल असे नाही. पण भाजपसोबतचे दोर स्वहस्ते कापल्याने नव्या कुबड्यांच्या आधाराच्या अपरिहार्यतेपोटी ठाकरे बंधूंच्या ऐक्याच्या चर्चा सुरू करण्यात आल्या आहेत, हे स्पष्ट आहे. महाराष्ट्राच्या हितासाठी उद्धव ठाकरे गट आणि राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आता एकत्र यावे ही महाराष्ट्राची इच्छा आहे, असा मुलामा या चर्चेस दिला जात आहे आणि अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी, दोन्ही पक्षांचे एकत्र येणे महाराष्ट्रासाठी गरजेचे असल्याचा आभासही उभा केला जात आहे. प्रत्यक्षात, महाराष्ट्राच्या जनतेस या दोन्ही पक्षांचे स्वतंत्र असणे किंवा एकत्र येणे याबाबत काहीच देणेघेणे नाही आणि त्यांच्या कोणत्याही स्थितीबाबत काहीही भावनादेखील नाहीत हे मतपेटीतूनच महाराष्ट्राने दाखवून दिले असतानाही, ठाकरे बंधूंच्या ऐक्यासाठी उभा महाराष्ट्र उत्सुक असल्याची आवई उठविण्यात येत आहे. महाराष्ट्राच्या मनात असेल तेच होईल असे काहीसे सूचक विधान करून उद्धव ठाकरे यांनी ऐक्याचे अनुकूल संकेत दिले, अशी चर्चा सुरू झाली आहे. पण महाराष्ट्राचे मन मागच्या निवडणुकांतच स्पष्ट झाले आहे. अन्यथा, २०१७ च्या निवडणुकीत भाजपच्याच बाहेरून पाठिंब्यावर मुंबई महापालिकेत सत्ता टिकविण्याचा नाईलाजाचा मार्ग ठाकरे यांना मान्य करावा लागलाच नसता. मतदारांच्या मनात काय आहे, हे ठाकरे यांना ठावूक आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे यांनीही मनसेला मतदारांनी दिलेला कौल मान्य केलेला आहे. अशा स्थितीत, महाराष्ट्राला जे हवे तेच होईल असे सांगत नाहक मतदारांना मनास येईल तसे वळविण्याचा विश्वास दाखविणे हे मोठे धाडस ठरेल. ठाकरे बंधूंच्या ऐक्याच्या वावड्यांना दिवसागणिक नवनवी वळणे मिळत आहेत. मुळात, एकत्र येण्याबाबत या दोघा बंधूंच्या मनात काय आहे, याचा एकमेकांसही अजून थांग लागलेला नाही. राज ठाकरे यांनी गेल्या एप्रिलमध्ये महेश मांजरेकर यांच्या युट्यूबवरील मुलाखतीत ऐक्याच्या अनुकूलतेचे अंधुकसे संकेत दिल्यानंतर महापालिकेच्या निवडणुकीतील गरजेची तीव्रता लक्षात आली आणि ऐक्याच्या चर्चांना वाट करून दिली गेली. तेव्हापासून काही नेते युतीचे संकेत देतात तर काही नेते शक्यतांवर पाणी फेरणारी विधाने करतात, असेच चित्र वारंवार दिसत आहे.

युतीच्या चर्चा सुरू असतानाच राज ठाकरे यांनी अलिकडेच मुंबईत ताज लॅण्डसएण्ड हॉटेलमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत तासभर चर्चा केली आणि ऐक्याच्या चर्चेला नवे वळण मिळाले. ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याने त्यांच्या पक्षांची ताकद किती वाढेल, सत्ता संपादनाचे बळ दोघांच्या ऐक्यातून मिळेल किंवा नाही, याची उत्तरे फारशी अवघड नाहीत. पण दोघे एकत्र न येण्याने भाजपच्या तंबूची ताकद मात्र अबाधित राहील असे एक गणित स्पष्टपणे दिसते. राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्या गटासोबत हातमिळवणी केली, तर त्यांना सत्ता मिळण्याची शक्यता नाही, याउलट, उद्धव ठाकरे यांच्यासोबत न राहता, स्वतंत्र राहून निवडणुका लढविल्या तर त्याचा थेट फायदा मात्र भाजप महायुतीस मिळेल, हे भाकीत वर्तविण्यासाठी कोणा राजकीय पंडिताची गरजच नाही. जिंकणाऱ्या घोड्यावरच पैज लावण्याएवढी समज राज ठाकरे यांच्याकडे आहे, असे त्यांना ओळखणाऱ्या अनेकांना खात्रीपूर्वक वाटते. तसेही, उद्धव ठाकरे यांच्या गटाकडे जिंकण्याची क्षमता आणि शक्यताही अजमावत महाविकास आघाडीदेखील अजूनही सावध पावलेच टाकत आहे. महाराष्ट्राच्या मनात काय आहे ते ओळखणे दूरच, पण ज्यांचे बोट धरून २०१९ मध्ये महाराष्ट्राची सत्ता हस्तगत केली, त्या शरद पवार यांच्या मनात काय आहे, तेदेखील ओळखणे उद्धव ठाकरे यांना अवघडच ठरत आहे. तसेही, पवार यांना ओळखण्यासाठी शंभर जन्म घ्यावे लागतील असे संजय राऊत यांनीच म्हटलेदेखील आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### कामठी-मौदा मतदारसंघाबाबत काँग्रेसचा दृष्टिदोष!

कामठी-मौदा विधानसभा मतदारसंघात ऐनवेळी मतदारांची संख्या कशी वाढली, असा संभ्रम निर्माण करीत काँग्रेसने आपल्यातील दृष्टिदोष दाखवून दिला आहे. मतदारसंघात वाढलेले मतदार आणि प्रत्यक्ष स्थितीचाही अभ्यास स्थानिक काँग्रेसी नेत्यांनी आणि विशेषतः राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांनी करायलाच हवा. पण आत्मचिंतन न करता राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत घोटाळा झाला असे म्हणत कामठी विधानसभेचे नाव उदाहरण म्हणून सांगितले. त्यांच्या पाठोपाठ कामठीतील काँग्रेसच्या स्थानिक नेत्यानेही तोच आरोप केला. याचा अर्थ आता काँग्रेसला पराभव पचनी न पडल्याने ते दृष्टिदोष झाल्यासारखे वागत आहेत.

विधानसभा निवडणुकीपूर्वी मी त्यावेळी नागपूर जिल्हा ग्रामीण भाजपचा प्रशासकीय कामकाज प्रमुख होतो. मला प्रमुख या नात्याने लोकसभा व विधानसभा निवडणूक कामकाज आणि सुरू असलेली प्रक्रिया जवळून पाहता आली. मी एकटाच नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रत्येक बैठकीला सर्वच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आवर्जून हजर असायचे. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर हे सर्व पक्षांचे जास्तीत जास्त प्रतिनिधी उपस्थित असावे, यासाठी फार आग्रही होते. त्यानुसार नागपूर शहरातील आणि ग्रामीणमधील प्रत्येकी सहा मतदारसंघातील नवीन मतदार नोंदणी, मृत किंवा गाव सोडून गेलेल्यांची नावे वगळणे, मतदारांच्या नावात दुरुस्ती आदी कामे मार्गी लावण्यात आली. प्रत्येक बैठकीत राजकीय प्रतिनिधींना याची लेखी स्वरूपात माहिती दिली जायची. यात काही लपविण्याला जागा नव्हती. विशेष म्हणजे नवीन मतदार नोंदणीत कामठी विधानसभा कायम अग्रेसर राहिली. याला आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रयत्न व त्यांनी राबविलेली मोहीमच कारणीभूत होती. ते जेव्हा पहिल्यांदा आमदार झाले तेव्हाही त्यांनी नवीन दहा हजार मतदारांची नोंदणी केली होती. त्यावेळी त्यांचा सुमारे ७ हजार मतांनी विजय झाला होता. त्यामुळे नवीन मतदार नोंदणीचे महत्त्व त्यांना माहीत आहे. मोठ्या शहरात नवीन मतदारांची नोंदणी प्रयत्नपूर्वक केली तर नक्कीच वाढते. यात आक्षेप घेण्यासारखे काहीच नाही. उदाहरण द्यायचे झाल्यास आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी ते केले म्हणूनच जास्त मतदार नोंदणी करण्यात यशस्वी ठरले. लोकसभेत मागे पडलेला पक्ष त्यांना दिसत होता. म्हणून जितक्या मतांनी मागे पडलो, कमीत कमी तितकी तरी नवीन मतदार नोंदणी करायचीच, या जिद्दीने ते कामाला लागले व प्रचंड मतांनी जिंकले. काँग्रेसला यात गडबड वाटते, हा त्यांचा दृष्टिदोष आहे. कामठी-मौदा मतदारसंघाबाबत सध्या तेच सुरू आहे, असेच मला प्रांजळपणे वाटते.

**प्रा. श्रीकांत पांडे**/नागपूर

### चिन्नास्वामी स्टेडियमवरील दुर्घटनेला जबाबदार कोण?

पैशाचा हव्यास आणि प्रसिद्धीची भूक मानवाला कसे पशू बनवते, याचे एक ज्वलंत उदाहरण बंगळुरूमधील कर्नाटक सरकार आणि रॉयल चॅलेंजर्सचे व्यवस्थापन व खेळाडू यांच्या संयुक्त विद्यमाने जगाला दिसले. तीन जूनच्या उत्तर रात्री, अहमदाबाद येथे झालेल्या आयपीएलच्या अंतिम सामन्यात विराट कोहलीच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने पंजाब किंग्जचा पराभव केला आणि अठराव्या वर्षी प्रथमच आयपीएल करंडकावर आपले नाव कोरले. याच वेळी आणि याच ठिकाणी त्याबद्दल शानदार समारंभ उत्साहात पार पडला. विराटने मैदानावर डोके ठेवून आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. त्याने आपल्या पत्नीला दिलेले आलिंगन सर्व देशासह जगानेही बघितले.

या पृष्ठभूमीवर, बंगळुरूमध्येच चिन्नास्वामी स्टेडियमवर, पुन्हा एकदा आपल्या विजयाचा लाईव्ह जल्लोष साजरा करण्याचा निर्णय विजयानंतर लगेच घेण्यात आला. अर्थात हा निर्णय राबवणे सोपे काम नव्हते. एकतर बंगळुरू हे भारतातील सर्वाधिक वाहतूक कोंडी होत असलेले शहर आहे. चिन्नास्वामी मैदानाची क्षमता केवळ पस्तीस हजार प्रेक्षकांची! या कार्यक्रमाला अफाट गर्दी होणार, लाखो लोक येणार आणि या गर्दीचे नियंत्रण करणे आपल्याला शक्य होणार नाही म्हणून हा कार्यक्रम एखादा आठवडा पुढे ढकलावा, अशी विनंती बंगळुरू पोलिसांनी लगेचच केली. आदल्या दिवशी रात्रभर झालेल्या कार्यक्रमात पोलिस व्यस्त असल्याने त्यांना आराम करण्याची गरज आहे असेही सांगितले गेले. खुद्द कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनीही अशा अचानक ठरवलेल्या कार्यक्रमाला परवानगी दिली नसल्याचे स्पष्ट केले होते. पण आले आरसीबीच्या (आणि विराट कोहलीच्या) मना, तेथे कोणाचे चालेना या उक्तीप्रमाणे, आपला विजय ॲनकॅश करण्यासाठी आणि पुढील आयपीएलमध्ये मिळणाऱ्या मलिद्याची पेरणी करण्यासाठी अवघ्या चोवीस तासांच्या आत त्यांनी कोणताही विचार न करता, सरकारचा आदेश लाथाडून, हा कार्यक्रम करण्याचा घाट घातला.

कर्नाटकमधील काँग्रेस सरकारने आयोजित केलेल्या कार्यक्रमात झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये अकरा लोक मृत्युमुखी पडले तरी कर्नाटक सरकार, काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधींची वक्तव्ये संतापजनक आहेत. काँग्रेसचे कायदे हे पक्षाचे फायदे आणि सोयी-गैरसोयीप्रमाणे कसे बदलतात, याचे हे ताजे उदाहरण आहे. इतिहासात काँग्रेसने हे अनेकदा केले आहे. आताही मैदानाबाहेर लोक मरत असताना, मैदानाच्या आत मात्र कार्यक्रमाची थिल्लरबाजी सुरूच होती हे सगळ्यात जास्त चीड आणणारे आहे. मुळात हा कार्यक्रम एवढ्या तातडीने करायची काय गरज होती? आणखी काही दिवसांनी व्यवस्थित योजनाबद्ध कार्यक्रम आयोजित केला असता तर काय बिघडणार होते?

या घटनेनंतर, बंगळुरू माझा जीव की प्राण असल्याचे सांगणाऱ्या विराट कोहलीने घडलेल्या प्रकाराबद्दल माफी मागण्याचे, मृत पावलेल्यांना श्रद्धांजली वाहण्याचे, मृतांच्या नातेवाईकांना भेटण्याचे आणि हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमींची विचारपूस करण्याचेही सौजन्य दाखवू नये, हा आपल्याच निष्ठावंत समर्थकांचा घोर उपमर्द आहे. शेवटी काय तर पैसा महत्त्वाचा! अल्लू अर्जुनच्या अटकेचे समर्थन करणारे राहुल गांधी आता मात्र तोंडाला कुलूप लावून बसले आहेत. आता कोणाला तरी बळीचा बकरा बनवून, या दुर्घटनेला संपूर्ण जबाबदार असलेल्या रॉयल चॅलेंजर्स व्यवस्थापन, खेळाडू आणि कर्नाटक सरकारवर कारवाई करण्याऐवजी हे सगळे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न काँग्रेस करत आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### पहिलीपासून सैनिकी शिक्षण : घोषणा स्वागतार्ह, वास्तविकता वेगळीच

नुकतेच भारत सरकारने ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांविरोधात सशस्त्र सैनिकी कारवाई केली. या कारवाईचे संपूर्ण देशाने स्वागत केले. यानंतर देशातील सर्व नागरिकांमध्ये देशभक्ती जागृत होऊन सर्वांना भारतीय सैन्याबद्दल पुन्हा एकदा गर्व वाटला व सर्वांनी भारतीय सैन्याचे कौतुक केले. अनेक नेत्यांनी देखील भारतीय सैन्याचे कौतुक केले. महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी देखील याचा संदर्भ घेऊन महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीपासून सैनिकी शिक्षण देणार असल्याची घोषणा केली. शिक्षण मंत्र्यांनी ऑपरेशन सिंदूरच्या यशामुळे भारावून भारतीय सैन्याबद्दल कृतज्ञता म्हणून ही घोषणा केली असल्याचे वाटते. कारण खेळण्या, बागडण्याच्या अवघ्या सहा सात वर्षांच्या कोवळ्या वयात विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण झेपेल असे वाटत नाही. त्यामुळे यासाठी किमान माध्यमिक स्तरापासून हे शिक्षण दिले जावे असे वाटते.

याउलट महाराष्ट्र शासन व राज्य शिक्षण मंडळाची सैनिकी शिक्षणाबाबत सद्य:स्थिती व वास्तविकता काही वेगळीच आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळातर्फे सद्य:स्थितीत वर्ग बारावीपर्यंत कोणत्याही प्रकारचे अनिवार्य सैनिकी शिक्षण दिले जात नाही. माध्यमिक स्तरावर वर्ग नववी व दहावीला संरक्षणशास्त्र हा केवळ श्रेणी असलेला वैकल्पिक विषय आहे परंतु राज्यभरातील दरवर्षी केवळ पाच टक्के शाळा आपल्या विद्यार्थ्यासाठी हा वैकल्पिक विषय निवडतात. त्यानंतर उच्च माध्यमिक स्तरावर देखील या विषयाचा समावेश नाही. राज्यातील निवडक शाळांमध्ये एनसीसी (नॅशनल कॅडेट कॉर्प्स) च्या माध्यमातून सैनिकी शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते. परंतु एनसीसी हा केंद्र सरकारचा उपक्रम आहे. मध्यंतरी शिक्षण मंडळाने माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी एनसीसीच्या धर्तीवर एमसीसी (महाराष्ट्र कॅडेट कॉर्प्स) ची सुरुवात केली होती. त्याला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद देखील लाभला होता. नंतर शासनाने एमसीसी हा उपक्रम देखील बंद केला. राज्यातील निवडक शाळांमध्ये स्काऊट गाईडच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना विविध आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी तयार केले जाते. याशिवाय महाराष्ट्रात शासनपुरस्कृत जिल्हानिहाय मुलांच्या व विभागनिहाय मुलींच्या अशा एकूण जवळपास बेचाळीस सैनिकी शाळा आहेत. ज्यामध्ये दरवर्षी वर्ग सहावी ते बारावीचे जवळपास तीस हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. या शाळांमध्ये देखील वर्ग सहावी ते आठवीसाठी कुठलाच अनिवार्य सैनिकी अभ्यासक्रम नाही. या शाळांमधील प्रशासन, शिक्षक व सैनिकी अधिकारी यांनी स्वतः तयार केलेला अनुरूप सैनिकी अभ्यासक्रम या वर्गांमधील मुलांना शिकवला जातो. तर वर्ग नववी व दहावीला राज्य शिक्षण मंडळाचा संरक्षणशास्त्र हा श्रेणी विषय अनिवार्यपणे शिकवला जातो. तर वर्ग अकरावी, बारावीला देखील आवश्यक सैनिकी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकवला जातो. या शाळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासह नियमितपणे आवश्यक सैनिकी प्रशिक्षण देखील दिले जाते. यासाठी महाराष्ट्र शासनाने या शाळांमध्ये अनुभवी माजी सैनिक व सैनिकी अधिकाऱ्यांच्या नेमणुका केलेल्या आहेत. या सैनिकी शाळांमधून तयार झालेले विद्यार्थी विविध सैन्यदलात दाखल होऊन देशसेवा देखील करत आहेत.

सध्या राज्य शासन व राज्य शिक्षण मंडळ वर्ग पहिली ते आठवीकरिता बालस्नेही शिक्षणपद्धती राबवीत आहे. या वर्गांच्या व या वयोगटाच्या विद्यार्थ्यांचे शिक्षण या निर्णयामुळे प्रभावित होऊ शकते. त्यामुळे शासनाला व शिक्षण विभागाला महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण द्यायचेच आहे तर ते किमान वर्ग नववीपासून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना द्यावे. बारावीनंतर इच्छुक विद्यार्थ्यांना एक वर्षाचे परिपूर्ण सैनिकी प्रशिक्षण देखील दिले जावे जेणेकरून भविष्यात आपत्कालीन परिस्थितीत हे मनुष्यबळ देशाच्या कामी येऊ शकेल. इयत्ता पहिलीपासून विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण न देता किमान वर्ग सहावीपासून विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या राज्यातील शासन पुरस्कृत सैनिकी शाळांना अधिकाधिक प्रोत्साहन देऊन व तेथील प्रशासनाला आणखी आवश्यक सुविधा पुरवून शासन हा उपक्रम प्रभावीपणे राबवू शकते.

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

## दखल

**प्रा. राम प्रकाश किन्हीकर**

# समृद्धी महामार्ग; एक आकलन

**दि. ११ डिसेंबर २०२२ रोजी नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण झाले. त्याचे थोडे काम बाकी होते. तेही पूर्ण झाले आणि ५ जून २०२५ रोजी संपूर्ण महामार्ग जनतेच्या सेवेत रुजू झाला. त्यानिमित्त...**

महाराष्ट्राची राजधानी मुंबई आणि उपराजधानी नागपूर यांना सरळ मार्गाने जोडण्याचा एक प्रयत्न २० वर्षांपूर्वी झालेला होता. नागपूर-बुटीबोरी-वर्धा-पुलगाव- कारंजा (लाड)- मालेगाव (जहांगीर)- मेहकर-सुलतानपूर- न्हावा- जालना- छ. संभाजीनगर- वेरूळ-कोपरगाव- सिन्नर-घोटी असा सरळ रेषेतला एक राज्य महामार्ग बांधला गेला होता. घोटीनंतर मात्र इगतपुरी-कसारा- शहापूर- पडघा या राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ (तत्कालीन आग्रा- मुंबई महामार्ग) मार्गे हा राज्यमार्ग मुंबई- ठाण्यात पोहोचत होता. समृद्धी महामार्ग येणार आणि तो सुद्धा या जुन्या महामार्गाला जवळपास समांतर असेल असे वाचण्यात आल्यानंतर मनात काही शंका येऊन गेल्या. पण समृद्धी महामार्गावरून प्रवास केल्यावर शंकांचे निरसन झाले.

**काही ठळक वैशिष्ट्ये**

अ) समृद्धी महामार्ग हा नियंत्रित प्रवेश असलेला महामार्ग आहे. या महामार्गावर हळू चालणारी वाहने म्हणजे बैलगाड्या, ट्रॅक्टर्स, सायकली, दुचाकी वाहने यांना प्रवेश नाही. महामार्गावर बाजूने कुंपण घातलेले आहे.

आ) या महामार्गावर मध्ये-मध्ये कुठेही टोल नाके नाहीत. जो काही टोल घ्यायचा, तो हा महामार्ग सोडल्यानंतर त्या त्या गावांमध्ये प्रवेश करताना असलेल्या टोल नाक्यांवर घेतला जातो. टोल नाक्यावरची संपूर्ण वाहतूक प्रत्येक गावागावात शिरताना विभाजित होत जाते. सर्वांचा वेळ वाचतो.

इ) या महामार्गाचा बेस उंचावलेला आहे. त्यासाठी जवळपास ३ ते ५ मीटर्सचा भराव सर्वत्र आहे. महामार्ग कुठल्याही गावातून किंवा त्यांच्या बाह्य वळण मार्गांवरून जात नाही. प्रत्येक गावातून-शेजारून जाताना स्वतंत्र आणि उंचावलेले अस्तित्व आहे. त्यामुळे विशिष्ट वेगाने प्रवास होऊ शकतो. समृद्धीवर प्रवास करताना आपल्या गाडीचा वेग ताशी ८० किलोमीटर्स ठेवला तरी ४-५ तासांच्या सलग प्रवासानंतर आपला सरासरी वेग ताशी ७७ ते ७८ किलोमीटर्स इतका येऊ शकतो. इतर कुठल्याही रस्त्यावर ताशी ८० किलोमीटर्स वेग ठेवला तर इतर अनेक अडथळ्यांमुळे आपला सरासरी वेग ताशी ५० किलोमीटर्स इतकाच येतो.

**ट्रक्सची सोय**

या महामार्गावर ट्रक्स देखील ताशी ८० किलोमीटर्स या वेगाने चालवले तर ८०० किलोमीटर्सचे अंतर साधारण १२ तासांत कापले जाऊ शकते. इतर कुठल्याही महामार्गाने हेच अंतर कापायला ट्रक्सना २० ते २४ तास लागतील. कारण प्रत्येक गावात शिरताना, बाहेर पडताना अनंत अडथळ्यांमुळे ट्रक्सचा वेग जो कमी होतो, तो पुन्हा गाठायला त्यांना वेळ लागतो आणि प्रवासाचा वेळ वाढला की विश्रांतीचा, भोजनाचा वेळ वाढतो. अनेकदा या महामार्गावर स्पीड ब्रेकर लावण्याची चर्चा होते. त्यात मला तरी ते तर्कशुद्ध वाटत नाही. तसे झाले तर या महामार्गाचा हेतूच पराभूत होईल. या महामार्गावर प्रवास करताना माझ्या लक्षात आले की, नगर, नाशिक जिल्ह्यातला कांदा आणि तत्सम शेतमाल नागपूर आणि पुढे छत्तीसगडला मोठ्या प्रमाणात पाठवला जातो. पण त्या प्रमाणात नागपूर, वर्धा, अमरावती इथला कापूस, संत्री इत्यादी शेतमाल नाशिक, पुणे, मुंबई इथे पाठविण्यात येत नाही. याकडे लक्ष दिले तर समृद्धीचा फायदा आपल्याही भागाला होईल.

**अपघातांची कारणे**

या महामार्गावरील अपघातांचा अभ्यास केला तर आपल्या लक्षात येईल की,



९० टक्के अपघात केवळ खालील तीनच कारणांमुळे झालेले आहेत.

१. अतिशय वेगात गाडी (विशेषतः कार्स) चालविल्यामुळे वेग अनियंत्रित होऊन.

२. रात्रीच्या वेळेत पुरेशी विश्रांती न घेता गाडी चालविल्याने चालकाला झोप लागल्यामुळे.

३. हा मार्ग काही काही ठिकाणी वन्यप्राण्यांच्या अधिवासातून जात असल्याने अचानक वन्यप्राणी वाहनासमोर आल्याने व त्या गडबडीत वाहन अनियंत्रित झाल्यामुळे.

यातल्या पहिल्या कारणासाठी आजकाल उपाययोजना सुरू झाल्याचे कळते आहे. बाकी समस्यांवरही उपाय केले पाहिजेत. दुसऱ्या कारणासाठी आपण कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करू शकतो. महामार्गावर प्रत्येकी १००-१५० मीटर्सवर असे कृत्रिम बुद्धिमत्तेने युक्त कॅमेरे लावून वाहनाच्या चालकाचे विश्लेषण होऊ शकते आणि झोपाळू अवस्थेतला चालक चालवीत असलेले त्या त्या कॅमेऱ्यासमोरून जात असताना प्रत्येक १००-१५० मीटर्सवर अलार्म, हूटर वाजेल अशी व्यवस्था होऊ शकते. त्यामुळे तो चालक, गाडीतले इतर सहप्रवासी, आसपास धावणारी वाहने आणि महामार्ग पोलिसही सतर्क होतील आणि अशा वाहनाला थांबवून दुसरा चालक किंवा असलेल्या चालकाची विश्रांती पूर्ण होईपर्यंत हे वाहन महामार्गावर धावणार नाही, याची व्यवस्था करता येईल.


तिसरी समस्या हाताळण्यासाठी या रस्त्यावर जागोजागी वन्यप्राण्यासांठी पूल बांधलेले आहेत. तरीही वन्यप्राण्यांच्या अधिवास क्षेत्रातून वाहन चालवताना चालकांनी वाहनांचे वेग नियंत्रित केलेलेच बरे.

समृद्धी महामार्ग हा विदर्भ, मराठवाडा आणि छत्तीसगडमधल्या मागास भागासाठी खरोखर समृद्धीचा मार्ग बनू शकेल. या महामार्गाद्वारे शेतमाल, खनिजांची वाहतूक विकसित पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबईतल्या कारखान्यांपर्यंत जलद होऊ शकेल. त्यासाठी महामार्गावरील सगळ्या प्रवेश आणि निर्गमन द्वारांजवळ कच्च्या मालाची कोठारे (गोडाऊन्स) तसेच त्यावर प्रक्रिया करणारे छोटे-छोटे कारखाने उभे राहिले आणि तिथल्या स्थानिक कुशल, अकुशल आणि अर्धकुशल मनुष्यबळाचा वापर झाला तर समृद्धीची ही गंगा खरोखर खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचेल. एसटीनेही या मार्गाचा वापर करण्याचा विचार केला पाहिजे. त्याचा सर्वांना लाभ होईल.

सध्या या महामार्गावर पुरेशा ठिकाणी अल्पोपाहार, भोजन, विश्रांती यासाठी व्यवस्था नाहीत. त्याची लवकरच काहीतरी सोय होईल असा विश्वास व्यक्त करता येण्याजोगी स्थिती आहे. भविष्यात हा महामार्ग खऱ्या अर्थाने समृद्धी आणू शकतो, हाही विश्वास येथे व्यक्त करावासा वाटतो.

(लेखक स्थापत्य अभियांत्रिकीचे प्राध्यापक आहेत)

### ट्रॅफिक पोलिसाची नेमणूक करा



सोलापूर शहरात वाढती लोकसंख्या पाहता आज प्रत्येक रस्त्यावर वाहनाची संख्या झपाट्याने वाढत आहे. लोकसंख्या वाढत असल्यामुळे नागरिकांना वेगवेगळ्या समस्याला तोंड द्यावे लागत आहेत. लोकसंख्या वाढली पण रस्ते मात्र आहे त्याच जुन्याच पद्धतीचे आहेत. काही प्रमाणात रस्ते रुंदीकरण करण्यात आले आहेत. पण त्या जागेवर अतिक्रमण करून, रस्त्यावर वाहने लावून रस्ता पुन्हा लहान करण्यात येते .या गोष्टीसाठी उपाय म्हणून शहरातील ट्रॅफिक पोलिसांची संख्या वाढवावी व ज्या रस्त्यावर वाहनांची संख्या कायमस्वरूपी असते त्या रस्त्यावर ट्रॅफिक पोलीस असणे बंधनकारक आहे. उदाहरणार्थ शहरातील काळजापूरच्या मारुती मंदिर येथे दर शनिवारी लोकांची संख्या दिवसभर जास्त प्रमाणावर असते, त्याबरोबर विजापूर वेस येथे असलेल्या मस्जिद मध्ये दर शुक्रवारी नमाजच्या वेळेला एक ते दोन या वेळेत वाहन रस्त्यावर लावल्यामुळे येता जाता अपघात होण्याची शक्यता जास्त वाढलेली आहे. तरी कृपया शहरातील असे गर्दीच्या ठिकाणी वाहतूक पोलिसाची संख्या वाढवून कायमस्वरूपी वाहतूक पोलीस नेमण्यात यावे. ही नम्र विनंती.

**- फैय्याज शेख, सोलापूर**

# कंत्राटी भरतीमुळे बेरोजगारीमध्ये वाढ

## शासनाकडून सेवानिवृत्तांना संधी दिल्यामुळे स्पर्धा परीक्षार्थींमधून नाराजी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ जून-

सरकारी नोकरीमध्ये कंत्राटी भरतीला प्राधान्य देणाऱ्या राज्य सरकारने आता सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनाही कंत्राटी पद्धतीने सेवेत घेण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे बेरोजगार तरुण आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. निवृत्तीनंतर वयाच्या ६५ वर्षांपर्यंत अधिकाऱ्यांना सेवेत घेतल्यास स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांनी करायचं काय? त्यांनी नोकरीच्या शोधात कायम बेरोजगारच राहायचे का? असा संतप्त सवाल करत स्पर्धा परीक्षार्थींनी या निर्णयावर टीका केली आहे.

राज्य सरकारने जे निर्णय घेतला ते राज्यातील बेरोजगार तरुणांना पटला नाही. एका बाजूला उमेदवारांना नोकर भरतीचे आश्वासन द्यायचे आणि दुसरीकडे कंत्राटी भरतीचा निर्णय घेणे, हे योग्य नाही. शासनाने हा निर्णय मागे न घेतल्यास राज्यातील स्पर्धा परीक्षार्थी विद्यार्थी एकत्र येऊन राज्यव्यापी आंदोलन उभा करतील.

**- प्रशांत शिरगुर,**
राज्य उपाध्यक्ष, पवित्र पोर्टल शिक्षक भरती तथा डि.एड बी.एड संघटना

सेवानिवृत्तांना कंत्राटी भरतीनुर सेवेत घेण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यामुळे शासकीय, निमशासकीय सेवानिवृत्तांना कंत्राटी पद्धतीने सेवेत घेतले जाणार आहे. निवृत्तीनंतर आणखी सात वर्षे ते सेवेत राहणार आहेत, एकीकडे लाखो उमेदवार नोकरीच्या प्रतीक्षेत असताना त्यांच्यासाठी नोकर भरती अपेक्षित आहे. त्याऐवजी कंत्राटी पद्धत राबवली जात असताना त्यात सेवानिवृत्तांची भर पडणार आहे.

### स्थापत्य अभियंता संघटनेतर्फे आंदोलनाचा इशारा

सरकारी खात्यांमध्ये निवृत्त अधिकारी यांना प्राधान्य देणे चुकीचे सुशिक्षित बेरोजगार यांच्यावर प्रचंड आर्थिक व मानसिक अन्याय तसेच असंतोष निर्माण होईल. येत्या १५ दिवसांत याबाबत शासनाने व राज्यकर्ते यांनी याबाबतचे स्पष्टीकरण द्यावे अन्यथा आमच्या संघटनेच्या वतीने राज्यातील सेवा नियोजन कार्यालय सुशिक्षित बेरोजगारांची प्रचंड यादी व शासकीयकामांचा विरोधास या सर्व गंभीर बाबी जगासमोर आणले जाईल यासाठी राज्यातही सर्व क्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगाराचे आंदोलन उभे राहील, असा इशारा महाराष्ट्र राज्य स्वयंरोजगार सहकारी सेवा संस्था व राज्य स्थापत्य अभियंता संघटना, राज्य अध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले यांनी दिला आहे.

या निर्णयास अधिकारी व कर्मचारी संघटनांनी विरोध केला आहे. सध्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीचे वय ५८ वर्षे इतके आहे. ते वाढवून ६० वर्षे करावे, अशी मागणी सातत्याने होत आहे. याआधी निवृत्तीचे वय ६० वर्षे च होते. नंतर ते कमी करून ५८ इतके करण्यात आले.

आता निवृत्तीचे वय पुन्हा ६० वर्षे करावे, अशी मागणी सरकारी कर्मचारी करत आहेत. त्यास राज्यातील लाखो पदवीधरांनी विरोध केल्याने राज्य सरकारने आपला निर्णय मागे घेतला होता.

लाखो युवा तरुण बेरोजगार असताना त्यांना न्याय देण्याची भूमिका राज्य सरकारने घेणे अपेक्षित आहे. मात्र निवृत्त अधिकाऱ्यांना पुन्हा सेवेत घेतले जाणार असून, यात वर्ग तीन व वर्ग चारचा समावेश नाही. म्हणजेच अधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांसाठी घेतलेला निर्णय आहे.

**- सोनाली वडे, परीक्षार्थी स्पर्धा परीक्षा**

## महत्वाचे...

### उच्च शिक्षणासाठी 'विद्यार्थी विकास योजने'चा आधार

सोलापूर, दि. १३ जून-

सामाजिक बांधिलकीतून उच्च शिक्षणासाठी दुबळ्या पार्श्वभूमीतील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना मोठा आधार देणारी सेवा सहयोग फाऊंडेशनची विद्यार्थी विकास योजना सध्या महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, झारखंड अशा १३ राज्यांत प्रभावीपणे राबवली जात आहे. दहावी-बारावीमध्ये ७०% पेक्षा जास्त गुण मिळवून प्रवेश परीक्षेत घवघवीत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, वैद्यकीय, फार्मसी, आयुर्वेद, सीए, सीएस यासारख्या अभ्यासक्रम ांसाठी शैक्षणिक शुल्काची संपूर्ण मदत या योजनेतून दिली जाते. सन २०१० पासून आजपर्यंत संस्थेने २३ जिल्ह्यांतील ३६९ विद्यार्थ्यांना २.९२ कोटी रुपयांची मदत केली आहे. राज्यातल्या विविध खेड्यापाड्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे हे कार्य संस्थेचे संस्थापक रवींद्र कर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. योजनेतील १३१६ पैकी ९३२ विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत. ढवड, खपर्शेट्टी, चरहळपवीर, ड्ब्बड, उेसपरुरपीं, कक्क्ष इरपज्ञ, ड्ढख, औसूर डर्शी इत्यादी ठिकाणी विद्यार्थी नोकरी करत आहेत. संस्थेने गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देत काटेकोर निकषांनुसार मदतीचे वाटप केले आहे. संस्थेच्या या कार्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल भविष्याची दारे खुली झाली आहेत. अधिक माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी संपर्क माधव देशपांडे ९०४९९०७४५०. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरीब, होतकरू विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल भविष्याची दारे खुली झाली आहेत. संस्थेच्या संस्थापक रवींद्र कर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणारी ही योजना विद्यार्थ्यांच्या जीवनात अमूल्य बदल घडवून आणत आहे.

### सिगारेट आणण्यास नकार दिल्यामुळे तरुणावर लोखंडी रॉड व काठ्यांनी हल्ला

बार्शी, दि. १४ जून-

सिगारेट आणून देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून तरुणावर लोखंडी रॉड व लाकडी काठ्यांनी हल्ला करून गंभीर दुखापत केल्याची घटना बार्शी शहरातील भोगेश्वरी मंदिराजवळ दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात रितेश रमेश चव्हाण (रा. भाजी मंडई, बार्शी) व त्याच्या एका अज्ञात साथीदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुदर्शन गौतम जाधव (वय २५, रा. कुर्डुवाडी रोड हायवे स्टॉप, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी हे गवंडी काम करून उदरनिर्वाह करतात. घटनादिवशी ते भोगेश्वरी मंदिराजवळ ठेकेदार दत्ता खुणे यांची वाट पाहत असताना, रितेश चव्हाण व त्याचा मित्र मोटारसायकलवर तेथे आले. रितेशने फिर्यादीस सिगारेट आणून देण्यास सांगितले. मात्र फिर्यादीने नकार दिल्यानंतर रितेशने त्यांना शिवीगाळ करून तेथून निघून गेला. यानंतर फिर्यादीने रितेशच्या वडिलांकडे ही बाब सांगितली. रितेशच्या वडिलांनी त्याला बोलावून त्याच्यावर राग व्यक्त केला. काही वेळाने रितेश हा आपल्या मित्रासोबत परत मंदिराजवळ आला व फिर्यादीस तू माझ्या वडिलांकडे का सांगितले? असे म्हणत लोखंडी रॉडने डाव्या हातावर मारहाण केली तर त्याच्या मित्राने लाकडी काठीने पाठीवर मारले. या म रहाणीमुळे फिर्यादी जखमी झाले असून त्यांनी पळत जाऊन रितेशच्या वडिलांकडे मदत घेतली. त्यांनी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर फिर्यादीने पोलीस ठाणे गाठले व तेथून मिळालेल्या यादीनुसार उपचारासाठी दवाखान्यात गेले. प्राथमिक उपचार घेतल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस अधिक तपास करत आहेत. रितेश चव्हाण व त्याचा अज्ञात मि त्राविरोधात कायदेशीर कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत.

### रेल्वेमध्ये आरक्षित सीटवर जनरल तिकीटवाले बसल्याने गैरसोय

सोलापूर, दि. १३ जून-

**दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी**

प्रयागराज, राम जन्मभूमी आयोध्या येथे देव दर्शनासाठी रेल्वे स्लीपर क्लासने आरक्षण करूनही त्या सीटवर जनरल तिकीट वाल्या प्रवाशी बसल्याने प्रचंड गैरसोय झाली असा आरोप करत या प्रकरणी संबंधित रेल्वेच्या दोषी अधिकाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी किरण देशमाने यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. दि. ३० मे ते ९ जून २०२५ दरम्यान सोलापुरातून ३६ महिला आणि १२ पुरुष असे एकूण ४८ भक्तगण प्रयागराज, वैद्यनाथ, पशुपतिनाथ, काशी विश्वनाथ आणि राम जन्मभूमी आयोध्या येथे देव दर्शनासाठी रेल्वेने स्लीपर क्लासचे आरक्षण करून गेले होते. यातील बरेच नागरिक जेष्ठ होते. दरम्यान, या रेल्वे प्रवासात आरक्षित सीटवर जनरल तिकीट व विना तिकीट प्रवाशी बसल्याने जागा मिळू शकले नाही. रेल्वे तिकीट तपासणीस व आरपीएफ पोलीसही दिसून आले नाहीत. यामुळे तक्रार करणे अडचणीचे ठरले. शेवटी रेल्वे मदत या पोर्टलवर मदत मागितली मात्र काहीच उपयोग झाला नाही. रिझर्वेशन सीटवर जनरल तिकीट आणि विना तिकीट प्रवाशांवर कोणतेही कारवाई केली जात नव्हती. दरम्यान, जनरल तिकीट प्रवाशांना रिझर्वेशन बोगीमध्ये सहासे रुपये दंड आकारून त्याच बोगीत प्रवास करण्यास परवानगी दिल्याचा प्रकार दिसून आला.यामुळे आरक्षण करूनही अडचणींना तोंड द्यावे लागले. अधिकाऱ्यांकडे तक्रार केली असता दुसऱ्या डिब्बिजनची बाब आहे, काही करू शकत नाही असे सांगून टाळाटाळ केली, एका प्रवाशाचा मोबाईल ही चोरीला गेला. रेल्वे प्रशासन नव्या नव्या योजना जाहीर करते मात्र प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नाही, असा आरोप किरण देशमाने यांनी केला आहे. तेव्हा याप्रकरणी रेल्वे प्रशासनाने तत्काळ चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी किरण देशमाने यांनी केली आहे. या पत्रकार परिषदेत चंद्रकांत गायकवाड, मोहन घुले, ज्ञानदेव पिसे, सुधाकर मरगणे आणि संबंधित प्रवासी उपस्थित होते.

### देवळे येथील मोहन सोनवले यांना विरमरण

सांगोला,दि.१४ जून-



सांगोला तालुक्यातील देवळे गावचे सुपुत्र मोहन पांडुरंग सोनवले हे भारतमातेचे संरक्षण करत असताना त्यांना विरमरण आले. याबाबत अधिक माहिती अशी, देवळे, ता.सांगोला येथील मोहन पांडुरंग सोनवले (वय-५६) यांचे पालनपूर, गुजरात येथे बॉर्डर सिक्युरिटी फोर्स मध्ये ए.एस.आय पदावरती आपली कामगिरी बजावताना हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर शुक्रवार दि.१३ जून रोजी देवळे येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

# विद्यार्थ्यांना देणार दप्तर, डबा अन् वॉटर बॉटल

**महापालिका महिला व बालकल्याण विभागाची नाविन्यपूर्ण योजना**

**नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना मिळणार मोफत पाठ्यपुस्तके**

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ जून-

महापालिका महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने यंदा नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना दप्तर, जेवणाचा डबा आणि वॉटर बॉटल देण्यात येणार आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी ५ हजार २२३ विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि नियंत्रण अधिकारी मनीषा मगर यांच्या मार्गदर्शनाखाली म हिला व बालकल्याण विभागाचे अधीक्षक ओमप्रकाश वाघमारे यांच्या माध्यमातून ही नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येत आहे. शासनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गणवेश आणि पाठ्यपुस्तके मोफत



मिळतात. महापालिकेतील शाळांम धील विद्यार्थ्यांना शालेय दप्तर (स्कूल बॅग), जेवणाचा डबा, आणि वॉटर बॉटल गरजेचे आहे. ही गरज ओळखून महापालिका म हिला व बालकल्याण विभागाच्या वतीने यंदा ही नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेच्या मराठी, उर्दू, इंग्रजी आदी विविध माध्यमांच्या एकूण ६३ शाळांमधील ५ हजार २२३ विद्यार्थी विद्यार्थिनींना हे साहित्य शाळेच्या पहिल्याच दिवशी वितरित करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान पाहायला मिळणार आहे. त्याची संपूर्ण तयारी पूर्ण झाली आहे. चांगल्या प्रतीचे हे साहित्य विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. या साहित्यामुळे महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची मोठी सोय होणार आहे.

महापालिका महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने मनपा प्राथमिक शिक्षण विभागाशी संपर्क साधून सर्व विद्यार्थ्यांची माहिती संकलित केली आहे. त्यानुसार शाळेच्या पहिल्याच दिवशी हे साहित्य वाटप करण्याचे नेटके नियोजन करण्यात आले आहे.

### ३६४ विद्यार्थ्यांना मिळणार मोफत पाठ्यपुस्तके

शासनाच्या योजनेअंतर्गत पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना क्रमिक पाठ्यपुस्तके मोफत दिली जातात. उर्वरित इयत्ता नववी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना ही सोय उपलब्ध नाही. यामुळे म हापालिका महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने २०२५ - २६ या आर्थिक वर्षात महापालिका शाळेतील इयत्ता नववी व दहावीच्या ३६४ विद्यार्थ्यांना क्रमिक पाठ्यपुस्तके मोफत देण्यात येणार आहेत. मराठी, उर्दू , इंग्रजी या माध्यमातील या विद्यार्थ्यांना लाभ मिळणार आहे.

# जुलै महिन्यात आरटीई मान्यता शिबीर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ जून-

जिल्ह्यातील शाळांच्या आरटीई मान्यता देण्यासाठी तालुकास्तरावर प्राथमिक शिक्षण विभागाकडून शिबिर घेण्यात येणार आहेत. त्यामुळे मुख्याध्यापकांचे हेलपाटे कमी होणार आहेत. दहा प्रकारच्या प्रमुख भौतिक सोयी-सुविधा असलेल्या शाळांना आरटीई म ान्यता दिली जाते. त्याची तपासणी प्राथमिक शिक्षण विभागाकडून जिल्हास्तरावर केली जाते. परंतु, यंदा मात्र तालुकास्तरावर प्राधान्याने शिबिर घेऊन कागदपत्रांची तपासणी करण्याचे आदेश प्राथमिक शिक्षण विभागाने गटशिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे शाळांना आरटीई मान्यता घेण्यासाठी येणाऱ्या अडचणी तालुकास्तरावरच दूर होणार आहेत. त्यानंतर आरटीई म ान्यतेच्या फाईली प्राथमिक शिक्षण विभागाकडे पाठविण्याच्या सूचना शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली आहे.

### तालुकास्तरावर शिबिराचे आयोजन

आरटीई मान्यतेसाठी जिल्ह्यातील हजारो शाळांचे प्रस्ताव येतात. अनेक शाळांमध्ये सोईसुविधा नसतात. शिवाय कागदपत्रे अपूर्ण असतात. त्यामुळे ते प्रलंबित ठेवण्यात येतात. असे प्रकार घडू नये, यासाठी तालुकास्तरावर शिबिराचे आयोजन केले आहे.

**- कादर शेख, शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जिल्हा परिषद सोलापूर**

# जूनमध्ये द.सोलापूर, बार्शी, अक्कलकोट अन् मंगळवेढ्यात सर्वाधिक पाऊस

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ जून-

मे महिन्यात जिल्ह्यात सरासरी २३० मिलीमीटर पाऊस पडल्यानंतर जूनमध्ये आजतागायत दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट आणि मंगळवेढा तालुक्यातील मंडलांमध्ये दमदार पाऊस झाला असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली.

दरम्यान, जिल्ह्यात आजतागायत जून महिन्यात ५१.३ मिलीमीटर इतका पाऊस नोंदला गेला आहे. सध्या दुपारनंतर पाऊस रोजच पडू लागल्याने जमिनीचे वापसे होत नाहीत आणि यामुळे पेरणीचा खोळंबा होत आहे. गेल्या काही दिवसांपासून जूनमध्ये सर्वाधिक पाऊस दक्षिण सोलापूर (७८.९) मिलीमीटर पाऊस नोंदला आहे. तर अक्कलकोट तालुक्यात (६२.२) मिमी आणि मंगळवेढा तालुक्यात (७०.४) इतका पाऊस नोंदला गेला आहे. इतर तालुक्यातील आकडेवारी पाहिल्यास मोहोळ ४५ मिमी, म ाढा ३९.८, करमाळा ३६.४, उत्तर सोलापूर ५५.२, बार्शी ६३.६, द. सोलापूर ७८.९, पंढरपूर २६.६, सांगोला ५३.५, माळशिरस ४९ मिमी तर मंगळवेढा तालुक्यात ७०.४ मिमी इतका पाऊस नोंदला गेला आहे.

एकंदरीत, द. सोलापूर, बार्शी, अक्कलकोट आणि मंगळवेढा तालुक्यात सर्वाधिक पावसाची नोंद आहे तर माढा, पंढरपूर, करमाळा तालुक्यात सर्वाधिक कमी पाऊस नोंदला आहे. तर जिल्ह्याची सरासरी पावसाची नोंद ५१.३ मिमी इतकी झाली असून, पुणे विभागात सरासरी ६० टक्केच्या पुढे पाऊस नोंदला गेला आहे.

# विमानसेवेनंतर उद्योगमंत्र्यांचा दौरा ठरणार होता फलदायी

**दौरा रद्द झाल्याने सोलापूरकरांच्या अपेक्षाभंग**

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ जून-

दि. ९ जून रोजी प्रवासी विमानसेवेचा श्रीगणेशा पार पडला आणि चारच दिवसात उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत हे शनिवार, दि. १४ जून रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येणार होते; मात्र काही कारणास्तव त्यांचा दौरा रद्द झाल्याने सोलापूरकर आणि येथील उद्योजकांचाही अपेक्षाभंग झाला आहे.



उद्योगमंत्री सामंत यांच्या दौऱ्यात शहरातील विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन केले होते. सोलापुरात आल्यानंतर उद्योग विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सोलापूर जिल्हा आढावा बैठक, तर जिल्ह्यातील उद्योजकांच्या अडी-अडचणी संदर्भात महत्वाची बैठक होणार होती. आता विमानसेवा चालू झाल्याने उद्योगमंत्री सोलापूरकरांसाठी काहीतरी नवउद्योगाची किंवा आयटी क्षेत्राबाबत चर्चा करतील, नाविण्यपूर्ण घोषणा करतील अशी आशा सोलापूरकरांना होती. मात्र आमदार बच्चू कडू यांची उपोषणादरम्यान प्रकृती खालावल्याने उद्योगमंत्री सामंत हे अमरावतीला गेल्याने त्यांचा सोलापूर दौरा रद्द झाल्याचे सांगण्यात येते. दि. ९ जून रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सोलापूर विमानसेवा समारंभासाठी येणार होते. मात्र ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने त्यांनी विमानाद्वारे सोलापुरात येता आले नाही. मुख्यमंत्री आले असते तर नवनव्या काम ांच्या घोषणा झाल्या असत्या. मात्र सर्वांची घोर निराशाच झाली.

# संस्था सभासदांनी २३ जूनपर्यंत प्रत्यक्ष हरकती नोंदवाव्यात

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ जून-

जिल्हा विणकर सहकारी फेडरेशन लि.ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये नोंदणीकृत सहकारी संस्था आहे. संस्थेचा नोंदणी क्रमांक पी.२९६४/१९५८ दि. २१/०३/१९५८ असा आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (१-अ) मधील तरतुदीनुसार संस्थेची पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे संस्थेचे सभासद यांना संस्था चालविण्यास स्वारस्य राहिलेले नाही असे प्रथम दर्शनी निदर्शनास येत आहे. तरी संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (१-अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्त का करण्यात येवू नये? याबाबतच्या आपल्या हरकती/सूचना/लेखी खुलासा ही नोटीस वर्तमान पत्रात प्रसिध्द केल्यापासून ७ दिवसाच्या आत किंवा दि. २३ जून पर्यंत कार्यालयात समक्ष उपस्थित राहून सादर करावयात. आपले म्हणणे हरकती/सूचना/ खुलासा प्राप्त न झाल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून, संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येईल याची नोंद घ्यावी, अशी माहिती सहायक आयुक्त, वस्त्रोद्योग निलेश निखाडे यांनी दिली.

# रोजंदारी, बदली कामगारांना कायम करण्यासंदर्भात बुधवारी बैठक

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ जून-

सोलापूर महापालिकेतील २४९ रोजंदारी व बदली कामगारांना कायम करण्यासंदर्भात विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांनी बुधवार दि. १८ जून रोजी दुपारी १२.३० वाजता मुंबई विधानभवनातील कार्यालयात बैठक आयोजित केली आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे हे पाठपुरावा करीत आहेत. कोल्हापूर महानगरपालिका निर्णयानुसार सोलापूर महानगरपालिकेमधील सन १९९५ नंतर सेवेत कार्यरत असलेल्या २४९ रोजंदारी व बदली काम गारांना सेवेत कायम करण्याबाबत विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांना आनंद चंदनशिवे यांनी निवेदन दिले होते. त्यावर तात्काळ कार्यवाही करत उपाध्यक्ष बनसोडे यांनी ही बैठक बोलावली आहे. मुंबई विधान भवन मधील महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय येथील बैठक हॉल क्र. २९ या ठिकाणी ही बैठक होणार आहे. या बैठकीसाठी नगर विकास विभाग (२) चे प्रधान सचिव, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्यासह या विषयासंबंधीत अधिकाऱ्यांना संपूर्ण माहितीसह उपस्थित राहण्यास कळविण्यात आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून महापालिकेतील २४९ रोजंदारी आणि बदली कामगारांना कायम करण्यासंदर्भातला विषय प्रलंबित आहे.



# श्रीसंत माणकोजी महाराज बोधले संजीवन समाधी सोहळा भक्तिभावात

**हजारो वारकऱ्यांची उपस्थिती**

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १४ जून-

श्रीक्षेत्र धामणगाव येथे श्रीसंत माणकोजी महाराज बोधले यांच्या संजीवनी समाधी सोहळ्यानिमित्त दि. १४ जून रोजी आयोजित पुष्पवृष्टीच्या कीर्तनसेवा कार्यक्रमाचा भव्य सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. महाराष्ट्र आणि कर्नाटकातून आलेल्या हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत हा सोहळा अध्यात्माने भारलेला ठरला.या कीर्तन सेवेचे मुख्य आकर्षण होते सद्गुरु श्री. प्रभाकर बोधले महाराज यांचे भावस्पर्शी अभंगकीर्तन. त्यांनी संत तुकाराम महाराजांचा अत्यंत मार्मिक असा अभंग -

**धन्य ते संसारी । दयावंत ते अंतरी ॥**
**तेथे उपकारासाठी । आले घर ज्या ।**

यावर आधारित निरूपण सादर केले. या अभंगाचा अर्थ उलगडताना सद्गुरु प्रभाकरदादा महाराज बोधले म्हणाले की, खरे संत हे घरसंसारात असूनही परम ार्थाशी जोडलेले असतात. जे संसार करत असूनही अंतःकरणात दया, करुणा आणि सहिष्णुता बाळगतात, ते खरे संत होय. त्यांचे आयुष्य कोणावर उपकार केल्याचा अभिमान न बाळगता, लोकांसाठी समर्पित असते. तेथे उपकारासाठी आले घर ज्या - हे संत समाजाच्या कल्याणासाठी जन्म घेतात, त्यांची प्रत्येक कृती ही लोकहिताची असते.त्यांची वाणी बनावट नसून खरेपणाने समृद्ध असते. ते कधीही राग, द्वेष वा अविचार व्यक्त करत नाहीत. त्यांच्या देहबोलीतही नम्रता असते. त्यांचे बोलणे श्रोत्यांच्या हृदयात आदर निर्माण करणारे असते. संत हे स्वार्थत्याग करून स ाजासाठी वावरतात. त्यांच्यापोटी अहंकार, हेवा, द्वेष नसतो. संत माणकोजी महाराजांचे संपूर्ण जीवन या प्रत्येक ओळीतील तत्वांचे साक्षात उदाहरण होते, असे त्यांनी स्पष्ट केले. या सोहळ्यात संत तुकाराम महाराजांचे वंशज हभप पुरुषोत्तम महाराज मोरे व हभप माणिक महाराज मोरे यांच्यासह, सतीश महाराज कंधारकर (पंढरपूर), सोपानकाका महाराज देशमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, शिवाजीराव काळुंगे (धनश्री परिवार) यांची प्रमुख उपस्थिती होती. बोधले महाराज फड परंपरेतील गावे व शिष्य परिवार तसेच बोधले घराण्यातील हभप विवेकानंद उर्फ मनुदादा (वंशपीठाधिश), श्रीराज विवेकानंद बोधले, हभप प्रकाश महाराज बोधले, डॉ. एकनाथ महाराज बोधले, श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले व मनोज महाराज बोधले यांचीही उपस्थिती लाभली.

### रक्तदान शिबिराचे आयोजन

जागतिक रक्तदाता दिनाचे औचित्य साधून या सोहळ्यादिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शेकडो भाविकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सांगता दुपारी १२ ते ३ दरम्यान महाप्रसादाने झाली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - १७

### ऐरोबीक आणि अनएरॉबिक रनिंगमधील फरक

रनिंग करताना शरीर दोन प्रकारे ऊर्जा तयार करतं. ऐरोबीक आणि अनएरॉबिक पद्धतीने. दोन्ही प्रक्रियांचा उपयोग वेगवेगळ्या प्रकारच्या धावण्यामध्ये होतो.

**ऐरोबीक रनिंग**

''ऐरोबीक '' म्हणजे ''ऑक्सिजनसह.'' या प्रकारात शरीर स्थिर गतीने धावत असताना ऑक्सिजनचा वापर करून ऊर्जा निर्माण करतं. लांब पल्ल्याच्या धावणीसाठी (जसे लाँग रन, मॅरेथॉन ट्रेनिंग) ऐरोबीक रनिंग महत्त्वाचं असतं हृदयाचे ठोके (हार्ट रेट ) मध्यम पातळीवर असतात. उदाहरण: ६० मिनिटं मध्यम गतीने धावणं. यामुळे सहनशक्ती, फॅट बर्निंग क्षमता आणि हृदयाची ताकद वाढते.

**अनइरॉबिक रनिंग**

''अनइरॉबिक '' म्हणजे ''ऑक्सिजनशिवाय.'' येथे शरीर झपाट्याने ऊर्जा तयार करतं, पण ऑक्सिजनचा वापर कमी होतो. अतितीव्र (हाय इंटेनसिटी ) रनिंगमध्ये वापरलं जातं, जसे स्प्रिंट्स, हिल रिपीट्स, इंटरव्हल ट्रेनिंग. हृदयाचे ठोके फार जास्त असतात. उदाहरण: ४०० मीटर स्प्रिंट्स.यामुळे वेग, ताकद, आणि लॅक्टिक ॲसिड टॉलरन्स सुधारतो.

**मुख्य फरक**

ऐरोबीक रनिंगमध्ये गती मध्यम आणि कालावधी जास्त असतो, तर अनइरॉबिक रनिंगमध्ये गती जास्त पण कालावधी कमी असतो. ऐरोबीक रनिंग मुख्यतः सहनशक्ती वाढवतो, तर अनइरॉबिक रनिंग वेग आणि ताकद वाढवतो. ऐरोबीक रनिंगमुळे शरीर फॅट जास्त प्रमाणात वापरतं, अनएरोबिक रनिंगमुळे ग्लायकोजेन वापर वाढतो.

ऐरोबीक रन मध्ये स्लोलोट्वीटच मसल्स जास्त सक्रिय राहतात, कारण त्या सतत आणि मंद गतीने काम करतात व ऑक्सिजनवर अवलंबून असतात उशीरा थकतात.अनइरॉबिक रनमध्ये फास्ट स्वीटच मसल्स काम करतात, कारण त्या झपाट्याने, उच्च तीव्रतेने ऊर्जा निर्माण करतात पण लवकर थकतात.


योग्य प्रशिक्षणात ऐरोबीक आणि अनएरॉबिक दोन्ही रनिंगचा संतुलित समावेश केल्यास धावपटूची एकंदर कामगिरी उत्कृष्ट होते.

**-अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो.९१७५८२८२०३

## महत्त्वाचे

### नीरज चोप्राचे अव्वल स्थान मिळवण्याचे लक्ष्य

**पॅरिस** : सलग दोन स्पर्धांमध्ये दुसरे स्थान मिळवल्यानंतर नीरज चोप्राने हंगामातील पहिले मोठे विजेतेपद पटकावण्याकडे लक्ष्य ठेवले आहे. २० जून रोजी सुपरस्टार भारतीय भालाफेकपटू आठ वर्षांनी पॅरिस डायमंड लीगमध्ये पुनरागमन करत असून या स्पर्धेत तो आपला उच्च दर्जाचा खेळ सादर करण्यास उत्सुक आहे. २७ वर्षीय नीरज गत वर्षी फ्रान्सच्या राजधानीत झालेल्या पॅरिस ऑलिम्पिक खेळावर लक्ष केंद्रित करण्यासाठी पॅरिस डायमंड लीगमध्ये खेळला नव्हता. त्याने शेवटचे २०१७ मध्ये ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियन म्हणून पॅरिस डायमंड लीगमध्ये भाग घेतला होता आणि ८४.६७ मीटरच्या भालाफेकीसह पाचवे स्थान मिळवले होते.पॅरिस आयोजकांनी अद्याप स्पर्धकांची संपूर्ण यादी प्रकाशित केलेली नाही, परंतु त्यांनी जाहीर केले की चोप्रा आणि दोन वेळा विश्वविजेता ग्रेनाडाचा ॲण्डरसन पीटर्स हे ९० मीटरचा टप्पा आधीच ओलांडलेल्या पाच सहभागींमध्ये असतील. दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा आणि दुहेरी विश्वविजेता ॲण्डरसन पीटर्स हे पाच सहभागींमध्ये आहेत. त्यांनी या स्पर्धेत ९० मीटरची रेषा आधीच ओलांडली आहे, असे आयोजकांनी सांगितले.



# आफ्रिकेने जिंकले जागतिक कसोटी जेतेपद

### २७ वर्षांनंतर पहिले मोठे क्रिकेट जेतेपद




लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या जागतिक कसोटी अजिंक्यपद सामन्यात विजय मिळवल्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमा विजेतेपदाची ट्रॉफी हातात घेत सहकाऱ्यांसोबत आनंद साजरा करताना

◆ **लंडन, १४ जून**

शनिवारी अंतिम कसोटी क्रिकेट सामन्याच्या चौथ्या दिवशी सकाळी आवश्यक असलेल्या शेवटच्या ६९ धावा पूर्ण करून दक्षिण आफ्रिकेने गतविजेत्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५ गड्यांनी विजय नोंदवून आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. दक्षिण आफ्रिकेने २७ वर्षांनंतर आपले पहिले मोठे क्रिकेट जेतेपद पटकावले व लॉर्ड्सवर आनंदोत्सव साजरा केला. दोन डावांत २ बळी व दुसऱ्या डावांत १३६ धावांची विजयी खेळी करणारा एडन मार्कराम सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

अतिशय रोमांचक ठरलेल्या या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात २१२ धावा केल्यानंतर दक्षिण आफ्रिकेला १३८ धावांत गुंडाळले. पहिल्या डावात ७४ धावांची आघाडी मिळविणाऱ्या ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या डावात दक्षिण आफ्रिकेने २०७ धावांत रोखले. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी २८२ धावांचे लक्ष्य राहिले. दक्षिण आफ्रिकेने तिसऱ्या दिवस अखेर २ बाद २१३ धावांपर्यंत मजल मारली होती.

शनिवारी दक्षिण आफ्रिकेने २ बाद २१३ धावसंख्येवरून चौथ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली व ५ बाद २८२ धावा काढून विजयाचे लक्ष्य गाठले. ही धावसंख्या क्रिकेटच्या घरातील १४१ वर्षांच्या कसोटी इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी धावसंख्या आहे. गतविजेत्या ऑस्ट्रेलियाने आपले जेतेपद कायम राखण्यासाठी दक्षिण आफ्रिकेवर दबाव आणण्याचा पुरेपूर प्रयत्न केला, परंतु दक्षिण आफ्रिकेचे फलंदाज जुमानले नाही. कर्णधार टेम्बा बावुमा एका धावेची भर घालत ६६ धावांवर बाद झाला. टेम्बाने मार्करामसोबत तिसऱ्या गड्यासाठी १४७ धावांची भागीदारी करून आपल्या संघाच्या विजयाचा मार्ग प्रशस्त केला, परंतु पुढे सलामीवीर एडन मार्करामने एक बाजू सांभाळत ट्रिस्टन स्टब्स (८) व डेव्हिड बेडिंगमच्या साथीने संघाला विजयाच्या उंबरठ्यावर आणून सोडले. मार्करामला जोश हेझलवूडने ट्रॅव्हिस हेडकडून झेलबाद करत त्याची घोडदौड रोखली. एडन मार्करामने २०७ चेंडूंचा सामना करत १४ चौकारांच्या मदतीने १३६ धावांची विजयी खेळी केली. त्याने खेळपट्टीवर ६ तास २३ मिनिटे घालवली. पुढे डेव्हिड बेडिंगम व काईल व्हेरियनीने नाबाद खेळी करत दक्षिण आफ्रिकेचा विजय निश्चित केला. बेडिंगमने ४९ चेंडूंत नाबाद २१ धावांची, तर काईलने १३ चेंडूंत नाबाद ४ धावांची खेळी केली.

दक्षिण आफ्रिकेने विजय नोंदवताच ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी विजयी खेळी करणाऱ्या एडन मार्करामच्या पाठीवर थाप मारली आणि त्याचे अभिनंदन केले. लॉर्ड्सवर उपस्थित प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्या वाजवल्या. (वृत्तसंस्था)

# आर्या-अर्जुनने जिंकले सुवर्णपदक



सुवर्णपदक विजेते आर्या बोरसे व अर्जुन बबुता

◆ **म्युनिक, १४ जून**

भारताच्या आर्य बोरसे आणि अर्जुन बाबुता या जोडीने दमदार कामगिरी करत शनिवारी येथे आयएसएसएफ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेतील १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक स्पर्धेत अंतिम फेरीत चीनच्या झिफेई वांग आणि लिहाओ शेंग या जोडीला १७-७ असे हरवून सुवर्णपदक जिंकले.

या प्रतिष्ठित स्पर्धेत सर्वोच्च पारितोषिक जिंकणे सर्वात महत्त्वाचे असताना बोरसे व बाबुताने चांगली कामगिरी केली, त्यांनी चीनच्या खेळाडूंना सामन्यातून डोके वर काढण्याची थोडीशीही संधी दिली नाही.

भारतीय जोडीने पात्रता फेरीत ६३५.२ गुण मिळवून सुवर्णपदकाच्या फेरीत प्रवेश केला. ते वांग आणि शेंग (६३५.९) यांच्यापेक्षा ०.७ गुणांनी मागे होते. हा पात्रता विश्वविक्रम सुद्धा आहे. वैयक्तिकरित्या बोरसेने ३१७.५ गुण मिळवले, तर बाबुताने पात्रता फेरीत ३१७.७ गुण मिळवले.

या वर्षाच्या सुरुवातीला पेरूमधील लिमा येथे झालेल्या विश्वचषकात बोरसेने रुद्रांक्ष पाटील यांच्यासोबत १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते. या स्पर्धेत दुसरी भारतीय जोडी, एलावेनिल वॅलारिवन व अंकुश जाधव या जोडीने ६३१.८ गुणांसह पात्रता फेरीत सहावे स्थान पटकावले. नॉर्वेच्या जीनेट हेग ड्युस्टॅड आणि जॉन-हर्मन हेग यांनी अमेरिकेच्या सागेन मॅडलेना व पीटर मॅथ्यू फिओरी या जोडीवर १६-१४ असा विजय मिळवत कांस्यपदक जिंकले. (वृत्तसंस्था)

# भारतीय महिलांचा ऑस्ट्रेलियाकडून पराभव

### एफआयएच प्रो-लीग हॉकी

**लंडन** : शनिवारी येथे झालेल्या एफआयएच प्रो-लीग हॉकी सामन्यात भारतीय महिला हॉकी संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन गोल गमावल्यानंतर शौर्याने झुंज दिली, पण सरतेशेवटी त्यांना २-३ असा पराभव पत्करावा लागला.

कोर्टनी शोनेल (१६ व्या मिनिटाला), लेक्सी पिकरिंग (२६ व्या मिनिटाला) यांनी केलेल्या मैदानी गोल आणि टॅटम स्टीवर्ट (३५ व्या मिनिटाला) यांनी केलेल्या पेनॉल्टी स्ट्रोकला गोलमध्ये रुपांतर करून ऑस्ट्रेलियाने ३-० अशी आघाडी घेतली.

तथापि, दीपिका आणि नेहाने केलेल्या दोन पेनॉल्टी कॉर्नरला गोलमध्ये रुपांतर करून भारतीय संघाने स्पर्धेत पुनरागमन केले.

भारताने सुरुवातीच्या काळात देवाणघेवाणीचा आनंद घेतला, पण ऑस्ट्रेलियन बचावफळीला तोडण्यात अपयश आले. नवव्या मिनिटाला ऑस्ट्रेलियाने पहिला पेनॉल्टी कॉर्नर मिळवला, परंतु भारताने दमदार बचाव केला. पहिल्या दोन चरणांत ऑस्ट्रेलियाने वर्चस्व गाजवले आणि मध्यंतरापर्यंत २-० अशी आघाडी घेतली. तिसऱ्या चरणात स्टीवर्टने पेनॉल्टी स्ट्रोकला गोलमध्ये रुपांतर करून आपल्या संघाला ३-० अशी आघाडी मिळवून दिली.

# आशियाई जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत प्रणती नायकला व्हॉल्टमध्ये कांस्य

◆ **जेचियोन, १४ जून**

दक्षिण कोरियातील जेचियोन येथे झालेल्या १२ व्या वरिष्ठ महिला आशियाई कलात्मक जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय जिम्नॅस्ट प्रणती नायकने शनिवारी व्हॉल्ट प्रकारात कांस्यपदक जिंकले.

या वर्षी मार्चमध्ये तुर्कीच्या अंताल्या येथे झालेल्या एफआयजी विश्वचषकांत कांस्यपदक जिंकणाऱ्या ३० वर्षीय प्रणतीने १३.४६६ गुणांसह तिसरे स्थान पटकावले. चीनच्या यिहान झांगने १३.६५० गुणांसह सुवर्णपदक, तर व्हिएतनामच्या थी क्विन्ह न्हू न्गुयेनने १३.५८३ गुणांसह रौप्यपदक जिंकले. युवा भारतीय जिम्नॅस्ट प्रोतिष्ठा सामंतानेही प्रभावित केले, मात्र तिने १३.०१६ गुणांसह चौथे स्थान मिळवत, पदक गमावले.



या कामगिरीसह, नायकने आंतर खंडिय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत आपले तिसरे पदक मिळवले व अनुभवी जिम्नॅस्ट दीपा कर्माकरच्या दोन पदकांच्या कामगिरीला मागे टाकले. तिने यापूर्वी २०१९ च्या उलानबातर येथे झालेल्या आवृत्तीत आणि २०२२ मध्ये दोहा येथे झालेल्या आवृत्तीत व्हॉल्टमध्ये कांस्यपदक जिंकले होते.

कर्माकरने २०१५ मध्ये हिरोशिमा येथे तिचे पहिले कॉन्टिनेंटल पदक, व्हॉल्ट कांस्यपदक जिंकले होते व त्यानंतर या वर्षाच्या सुरुवातीला ताश्कंद येथे सुवर्णपदक जिंकले होते.

टोकियो २०२० ऑलिम्पिकपटू प्रणती नायकने अंतिम फेरीत पहिल्या प्रयत्नांत जोरदार कामगिरी केली होती, तिने १३.६६६ गुण मिळवले होते, परंतु १२.८६६ च्या दुसऱ्या व्हॉल्टने तिच्या एकूण गुणांवर परिणाम केला होता.

पात्रता फेरीत १३.०८३ गुणांसह चौथे स्थान मिळवल्यानंतर तिने अंतिम फेरीत प्रवेश केला होता. प्रोतिष्ठाने १२.९१६ गुणांसह पात्रता फेरीतही स्थान मिळवले. (वृत्तसंस्था)

# रणजी करंडक फॉरमॅटमध्ये बदल

◆ **नवी दिल्ली, १४ जून**

२०२५-२६ रणजी करंडक स्पर्धा १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी दरम्यान दोन टप्प्यात आयोजित केली जाणार आहे. यात सध्याच्या दोन्ही संघांऐवजी प्लेट ग्रुपमधून एका संघाची बढती आणि रेलीगेशन होईल, असा निर्णय बीसीसीआयने शनिवारी झालेल्या आपल्या सर्वोच्च परिषदेच्या बैठकीत घेतला.

२०१८-१९ मध्ये, बीसीसीआयने रणजी करंडकामध्ये ईशान्येकडील संघासह नऊ संघांचा समावेश केला होता, परंतु त्याचा परिणाम स्थानिक स्पर्धेत क्रिकेटच्या गुणवत्तेवर झाला आहे. मेघालय रणजी ट्रॉफी एलिट डिव्हिजनमध्ये खेळला होता, परंतु गत हंगामात त्यांनी सर्व सात सामने गमावले होते. सर्व मल्टी-डे पुरुष स्पर्धा (वरिष्ठ आणि ज्युनियर) एका संघाला बढती दिली जाईल आणि एक संघ २०२६-२७ हंगामाच्या ग्रुपिंगसाठी रेलीगेशन केला जाईल, असे बीसीसीआयच्या प्रसिद्धीपत्रकामध्ये म्हटले आहे. लाल चेंडू क्रिकेटमधील फॉरमॅट बदल सर्व वयोगटातील बीसीसीआय स्पर्धांना लागू होईल. रणजी करंडकाचा पहिला टप्पा १५ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर दरम्यान खेळवला जाईल, तर दुसरा टप्पा २२ जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान खेळवला जाईल. बाद फेरीचे सामने ६ ते २८ फेब्रुवारी दरम्यान खेळवले जातील. झोनल फॉरमॅटमध्ये परतणारी दुलीप करंडक ही हंगामाची सुरुवात असेल आणि २८ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर दरम्यान खेळवली जाईल. संघाची निवड झोनल निवड समिती करेल. इराणी कप १ ते ५ ऑक्टोबर दरम्यान खेळवला जाईल, असे बीसीसीआयने पुढे म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# भारताचा ऑस्ट्रेलियाकडून २-३ ने पराभव

### एफआयएच पुरुष प्रो-लीग हॉकी

◆ **ॲण्टवर्प, १४ जून**

एफआयएच प्रो-लीग हॉकीमध्ये भारतीय पुरुष हॉकी संघाच्या समस्या सुटता सुटत नाही. शनिवारी येथे अभिषेकच्या दोन गोलनंतर दोन गोलने आघाडीवर असूनही भारतीय संघाला ऑस्ट्रेलियाकडून २-३ असा पराभव पत्करावा लागला.

भारतीय संघाने या स्पर्धेत नेदरलॅण्ड व अर्जेंटिनाविरुद्ध दोनदा पराभव पत्करला आहे.

जोरदार सुरुवात करत अभिषेकच्या (८व्या आणि ३५व्या मिनिटाला) दोन गोलमुळे भारताने ३५व्या मिनिटाला २-० अशी आघाडी घेतली. पण शेवटच्या टप्प्यात बदल झाल्यानंतर ऑस्ट्रेलिया संघ आक्रमक खेळ करत आला. नॅथन एफ्राम्स (४२व्या मिनिटाला) आणि जोएल रिंटाला (५६व्या मिनिटाला) आणि टॉम क्रेगने (६०व्या मिनिटाला) दोन पेनल्टी कॉर्नरला गोलमध्ये रुपांतरित करून विजय निश्चित केला.

प्रो-लीगच्या युरोपियन लेगच्या पहिल्या चार सामन्यांमध्ये नेदरलॅण्ड व अर्जेंटिनाविरुद्धच्या चार सामन्यांमध्ये निसटता पराभवानंतर, भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध उत्साही दिसत होता आणि पहिल्या दोन चरणांत त्यांनी वर्चस्व गाजवले.

भारतीय संघ कर्णधार आणि स्टार ड्रॅगफ्लिकर हरमनप्रीत सिंगशिवाय होता कारण अर्जेंटिनाविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात झालेल्या दुखापतीमुळे त्याला विश्रांती देण्यात आली होती.

भारतीय संघाने सुरुवातीपासूनच दृढनिश्चय दाखवला आणि आठव्या मिनिटाला अभिषेकने मनप्रीत सिंगकडून पास घेतल्यानंतर सर्कलच्या वरून फ्लिक मारून आघाडी घेतली.

अभिषेकने प्रतिस्पर्ध्यांच्या बचावात्मक क्षेत्रात काही सनसनाटी खेळ करून भारताला दोन गोलने पुढे नेले. १९ व्या मिनिटाला, करकेराने जोएल रिंटाला जवळून रोखण्यासाठी एक उत्तम बचाव केला. २२ व्या मिनिटाला भारताला पेनॉल्टी कॉर्नरच्या स्वरूपात आणखी एक संधी मिळाली परंतु टिम ब्रँडने जुगराज सिंगला पुढे जाऊ दिले नाही.


खेळाच्या शेवटच्या चरणात सुखजीत सिंगने एका ऑस्ट्रेलियन खेळाडूला त्यांच्या वर्तुळासमोर बाद केले आणि अभिषेककडे पाठवले, ज्याने प्रतिस्पर्धी गोलकीपरला गोलमध्ये रिव्हर्स हिट मारून दिवसाचा दुसरा गोल केला.

ऑस्ट्रेलियाने ३७ व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळवला पण करकेराने चांगला बचाव केला.

भारताने ४८ व्या मिनिटाला सलग दोन पेनॉल्टी कॉर्नर मिळवले पण ते फायदा करून घेऊ शकले नाही. शेवटच्या १० मिनिटांत ऑस्ट्रेलियन संघाने जोरदार प्रयत्न केले व सलग चार पेनल्टी कॉर्नर मिळवले, त्यापैकी शेवटचा रिंटालाने गोल केला. (वृत्तसंस्था)

# टीम एमजीडीला फिडे विश्व जलद सांघिक बुद्धिबळाचे विजेतेपद

### स्पर्धा जिंकणारा पहिला भारतीय संघ



◆ **लंडन, १४ जून**

ग्रॅण्डमास्टर्स अर्जुन एरिगासी व प्रणवने अंतिम दिवशी नोंदवलेल्या महत्त्वपूर्ण विजयाच्या बळावर टीम एमजीडीने फिडे विश्व जलद सांघिक बुद्धिबळाचे विजेतेपद पटकावले. या स्पर्धेचे विजेतेपद जिंकणारा हा पहिला भारतीय संघ ठरला. अर्जुन, प्रणवसह या विजेत्या संघात पेंटाला हरिकृष्णा, लिओन मेंडोंका, डेव्हिड ॲण्टोन गुइजारो, त्सोलाकिडो स्टोव्होला, अथर्व तायडे व कर्णधार श्रीनाथ नारायणन् यांचा समावेश आहे. आता हा संघ ब्लिट्झ स्पर्धेत खेळणार आहे.

सहावे मानांकन मिळालेल्या टीम एमजीडीने टीम हेक्सामाइंडविरुद्ध झालेल्या चुरशीच्या लढतीनंतर तीन दिवसांत १२ फेऱ्यांमध्ये १० विजय मिळवत विजेतेपद मिळवले.

गत दोन आवृत्त्यांमध्ये रौप्य आणि कांस्यपदक जिंकल्यानंतर, एमजीडीने पहिल्या दिवशी आपल्या मोहिमेची सुरुवात उत्तम प्रकारे केली. परंतु टीम फ्रीडमविरुद्ध बरोबरी व दुसऱ्या दिवशी टीम हेक्सामाइंडकडून झालेल्या पराभवामुळे त्यांना स्पर्धेत वर्चस्व गाजवण्यासाठी निर्दोष कामगिरी करण्याची आवश्यकता होती व संघाने आवश्यकतेनुसार खेळाचे प्रदर्शन केले. शेवटच्या दिवशी चारही फेऱ्या जिंकून जेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

ग्रॅण्डमास्टर्स अर्जुन, पेंटाला, मेंडोंका, गुइजारो, स्टोव्होला, प्रणव, तायडे व कर्णधार श्रीनाथ नारायणन यांचा समावेश असलेल्या एमजीडी संघाने अंतिम फेरीत महत्त्वाचे विजय मिळवून विजेतेपद मिळवले. अर्जुन व प्रणवने मालकॉमच्या मेट्सविरुद्ध मिळवलेले विजय निर्णायक ठरले.

हे खूप खास आहे! ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघासह आम्ही जिंकण्यासाठी प्रबळ दावेदार होतो आणि टीम एमजीडी सोबत आम्ही अंडरडॉग होतो. तरीही आम्ही पुन्हा सुवर्णपदक जिंकले, असे नारायणन्ने म्हटले आहे.

टीम एमजीडीने २१ गुणांसह अंतिम फेरी गाठली, टीम हेक्सामाइंडपेक्षा एक गुण पुढे होता. विश्वनाथन् आनंदचा समावेश असलेल्या टीम फ्रीडमने १७ गुणांसह तिसरे स्थान मिळवले.

तृतीय विश्वमानांकित अर्जुन हा टीम एमजीडी साठी अंतिम दिवसाचा शिल्पकार होता. त्याने ४ पैकी ३.५ गुण मिळवले व दुसऱ्या दिवसाच्या दुर्दैवी दिवसापासून तो केवळ अर्धा गुण मिळवू शकला होता.

शेवटच्या दिवशी, अर्जुनने काझचेसच्या ग्रॅण्डमास्टर रिचर्ड रॅपोर्टवर विजय मिळवून सुरुवात केली आणि नंतर ताश्कंद ओपन २०२५ विजेता ग्रॅण्डमास्टर निहाल सरीन (अशदोद एलिट चेस क्लब) विरुद्ध बरोबरी साधली. शेवटच्या दोन फेऱ्यांमध्ये अर्जुनने ग्रॅण्डमास्टर जोस मार्टिनेझ (थीम इंटरनॅशनल ट्रेडिंग) व ल्यूक मॅकशेनला आरामात हरवले.

टीम एमजीडी संघाचा उत्साह दांडगा आहे. सर्व खेळाडूंनी संघाची गती कायम ठेवण्यासाठी प्रयत्न केले. तसेच अथर्वची कामगिरीही या जगाहून वेगळी होती, असे अर्जुन म्हणाला. अथर्व तायडेने १२ पैकी ११ डाव जिंकले. (वृत्तसंस्था)

# विंचूरच्या श्री पंचाक्षरी प्रशालेस विजेतेपद

### विंचूर प्रीमियर लीग खो-खो स्पर्धा



**सोलापूर, दि. १४ जून-**

विंचूरच्या श्री पंचाक्षरी प्रशालेने विंचूर प्रीमियर लीग खो-खो स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. विंचूरच्या पंचाक्षरी विद्या मंदिरच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेतील अंतिम सामन्यात त्यानी विंचूर खो-खो क्लबचा एक गुणांनी पराभव केला. निर्धारित वेळेतील सामन्यात मध्यंतरास २-२ आणि नंतर ४-४ अशी बरोबरी झाल्यानंतर ज्यादा वेळेतील डावात पंचाक्षरी प्रशालाने बाजी मारली. यात समर्थ सोनगी याने अष्टपैलू, निलोफर शेख हिने संरक्षक तर विशाल पवार याने आक्रमकाची पारितोषिक पटकाविले

विंचूर व अंत्रोळी येथील पहिली ते सातवीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचे एक महिन्याचे प्रशिक्षण शिबिर घेऊन त्यांच्यातूनच या दोन संघाबरोबरच ग्रामपंचायत विंचूर व जिल्हा परिषद शाळा असे चार संघ तयार करून ही स्पर्धा सोलापूर म्युचर खो-खो असोसिएशनचे सदस्य व विंचूरचे क्रीडाशिक्षक तुळशीराम शेतसंदी यांनी ही स्पर्धा आयोजित केली होती. प्रशिक्षण शिबिरास व स्पर्धेस गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. त्यांनी प्रशिक्षण शिबिरासाठी आर्थिक सहाय्य आणि अंतिम सामन्यानंतर बक्षिसाचा वर्षावही केला. विजयी व उपविजयी संघांना सुमारे दहा हजार रुपयेची पारितोषिके व करंडक देण्यात दिले. ही पारितोषिके बाळासाहेब पाटील, विजयकुमार बिराजदार, नागेश बिराजदार, भीमाशंकर सोनगी, अमोल साबळे, संजय जाधव, आदित्य झाडबुके, मल्लिकार्जुन झाडबुके यांनी पुरस्कृत केली होती.

ही पारितोषिके माजी गटशिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे, शिक्षण विस्तार अधिकारी गुरुबाळा सनके, मागास समाज सेवा मंडळाचे संचालक नागेश बिराजदार, सोलापूर म्युचर खोखो असोसिएशनचे सरचिटणीस अजितकुमार संगवे, पोलीस पाटील मल्लिकार्जुन झाडबुके, मुख्याध्यापक अशोक लिगाडे, बाळासाहेब पाटील, विंचूरचे माजी खेळाडू महावीर नळे यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आली. यावेळी चारही संघाचे प्रशिक्षक बालाजी चव्हाण, विक्रम जाधव, विकास पवार व विकास कोळी तसेच पंच अविनाश कोळी व संजय जाधव यांचाही सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन अशोक कोळी यांनी केले. नागनाथ फुलारी यांनी आभार मानले.

# सोलापूरच्या ३ खेळाडूंची सहा पदकांची कमाई

### एशियन स्पोर्टस् एरोबिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत ४ सुवर्ण व २ रौप्य



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

दुबई येथे झालेल्या एशियन स्पोर्ट्स एरोबिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत सोलापूरच्या ३ खेळाडूंनी चार सुवर्ण व दोन रौप्य अशी सहा पदकांची कमाई केली आहे. सोलापूरच्या इतिहासात प्रथमच स्पोर्ट्स एरोबिक्स आणि हिप हॉप चॅम्पियनशिपमध्ये आंतरराष्ट्रीय पदके मिळाली आहेत.

आशियातील सहा देशांचे खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. भारतातील ४० खेळाडूंच्या संघात येथील तीन खेळाडूंचा समावेश होता. या तीनही खेळाडूंनी ही विशेष कामगिरी केली. भारतातील सर्व खेळाडूंनी ३० सुवर्ण, २९ रौप्य आणि ३५ ब्रांझ पदकांची घवघवीत कमाई करून चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकाविली आहे. स्पर्धेत येथील स्ट्रीमलाईन अकॅडमीचे प्रशिक्षक डॉ. मोहिनी ताकते यांच्या मार्गदर्शनाखाली स्वरा गनेर, हीर गाला, अनुष्का चव्हाण या खेळाडूंनी ही कामगिरी केली. अनुष्का व हीर या जोडीने सात वर्षाखालील वयोगटात सुवर्ण तर वैयक्तिक प्रकारातही या दोघींनी विभागून सुवर्णपदक मिळविले. पंधरा वर्षाखालील वयोगटात वैयक्तिक खेळ प्रकारात स्वराने रौप्य पदक पटकावले. पंधरा वर्षाखालील जोडीमध्ये सारा शेख व स्वरा या जोडीने रौप्य पदक मिळविले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### चैतन्य पतसंस्थेचा वर्धापनदिन उत्साहात

**पिलीव, दि.१४ जून -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील अग्रगण्य चैतन्य ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचा ३९ वा वर्धापन दिन मोठ्या उस्हात साजरा करण्यात आला. यावेळी चेअरमन रामचंद्र उर्फ नानासाहेब देशमुख यांच्या हस्ते ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करणयात आले. यावेळी व्हा चेअरमन शोभाताई रोकडे,व संजय अनंत रोकडे यांच्या हस्ते सत्यनारायणाची पूजा करण्यात आली. यावेळी चेअरमन रामचंद्र देशमुख, व्हा चेअरमन शोभाताई रोकडे, संचालक आरिफखान पठाण, डॉकटर मिलींद गुळभिले, अतुल नष्टे, तुकाराम पडळकर, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी अनिल सावळजकर, विजय सगरे,माजी सरपंच अमोल मदने,दत्तात्रय भैस ,गोविंद भैस,अनिल देशमुख, विजय पिसे ,महादेव तावरे,चंद्रकांत मेथवडे, शाखा व्यवस्थापक रघुनाथ नरळे ,विठ्ठल जाधव, तुकाराम वाघमारे, लक्ष्मण काळे ,गणेश ढेकळे यांच्या सह अनेक मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना चेअरमन नानासाहेब देशमुख यांनी सर्व संचालक व सभासदांच्या सहकार्याने सध्या पिग्मी चांगली गोळा होत आहे. तसेच कर्ज वाटप व वसुली सुद्धा चांगली आहे. सर्वांच्या सहकार्याने सध्या पतसंस्था व्यवस्थीत सुरू आहे. यापुढेही सर्वांनी असेच सहकार्य करावे असे आवाहन यावेळी बोलताना त्यांनी केले.

### आंधळगांव प्रशालेच्या सभागृहाचे सहकारमंत्र्यांच्या हस्ते सोमवारी उद्घाटन

**सांगोला,दि.१४ जून-**



विद्या विकास मंडळ, जवळा यांच्या कै. दत्ताजीराव भाकरे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, आंधळगांव येथील सभागृहाचे उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते तर आ. समाधान अवताडे यांचे अध्यक्षतेखाली सोमवार दि.१६ जून रोजी स.११ वा. होणार आहे. यावेळी सुरेश पालवे, संस्थाध्यक्ष दीपकआबा साळुंखे पाटील उपस्थित राहणार असल्याची माहिती सचिव सुभाष लऊळकर यांनी दिली. विलास कुलकर्णी यांनी त्यांचे दिवंगत माता पित्याचे नावाने सदर सभागृह बांधून दिले आहे. या कार्यक्रमासाठी दामाजी साखर कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील, संचालक तानाजी खरात, बसवराज पाटील, भारत बेंद्रे, माजी नगराध्यक्ष प्रकाश गायकवाड, रा.कॉंचे प्रदेश सरचिटणीस लतीब तांबोळी, मंगळवेढा अध्यक्ष अजित जगताप, शहराध्यक्ष ज्ञानेश्वर वगैरे, प्रांतिक सदस्य प्रवीण खवतोडे, जिल्हा सरचिटणीस अरुण किल्लेदार, उपनगराध्यक्ष विजय खवतोडे, भारत नागणे, शंकर माळी, भारत पाटील व विलास कुलकर्णी हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमासाठी शिक्षण प्रेमींनी उपस्थित रहावे असे आवाहन सुभाष लऊळकर यांनी केले आहे.

### ज्येष्ठ महिलेला अखेर उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिला न्याय


**बार्शी, दि.१४ जून-**

जेष्ठ नागरिक महिलेने मोठ्या विश्वासाने मुलाच्या नावे करुन दिलेले खरेदीखत रद्दबातल ठरवून उपविभागिय अधिकाऱ्यांनी बार्शी येथील ज्येष्ठ नागरिक महिलेला न्याय दिल्याने मोठा दिलासा मिळाला आहे. बार्शीतील एकाज्येष्ठ नागरिक महिलेस तिच्या मुलाने तुझे आता वय झाले आहे, मीच तुला सांभाळणार आहे,दवाखान्याचा खर्च तसेच इतर सर्व खर्च मीच करणार आहे, त्या बदल्यात तू मला खरेदीखत करून दे असे बोलून खरेदीखत करुन देण्यासाठी नैतिक दबाव टाकला. शेवटपर्यंत चांगले सांभाळणे, देखभाल करणे वगैरे आश्वासने दिली. मुलाच्या भावनिक आश्वासनांना बळी पडून मुलाच्या नावे २ डिसेंबर २०२० रोजी दस्त क्रमांक ४८८४/२०२० नुसार खरेदीखत करुन दिले. खरेदी खतामध्ये मिळकतीचे मूल्य रुपये १८ लाख ८५ हजार इतके दर्शविले आहे. परंतु प्रत्यक्षात रक्कमेची देवाणघेवाण झालेली नाही. महिलेला लिहिता वाचता येत नाही. रुपये ५ लाखपेक्षा जास्त रकमेचा व्यवहार असल्यास त्यासाठी देणार व घेणार यांचे पॅन कार्ड नंबर सक्तीचा आहे. तसेच इतकी मोठी रक्कम कशी दिली व घेतली हे दर्शविण्यासाठी बँकेचा खाते नंबर व देवाणघेवाण झाल्याचा पुरावा आवश्यक आहे. हे सर्व या दस्तामध्ये नाही.तो फसवणूक करून, विश्वासघात करून व लबाडीने करून घेतलेला आहे. हल्ली मुलगा हा कसलाही सांभाळ व देखभाल करत नाही. त्याने अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन घरातून हाकलून दिले आहे. मुलाने भोळ्या भाबड्या स्वभावाचा, वृद्धापकाळचा गैरफायदा घेतला आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक कायदा कलम २३ प्रमाणे वादग्रस्त मिळकतीचे खरेदीखत दि. २ डिसेंबर २०२० रोजी दस्त क्रमांक ४८८४/२०२० नुसार मुलाच्या नावे केलेले खरेदीखत रद्द करुन मागितले. तसेच जीवाला धोका निर्माण झाला आहे. म्हणून संरक्षण मागितले. वृद्ध महिलेने बार्शी येथील विधिज्ञ शिवाजी क्षिरसागर यांचे मार्गदर्शन घेऊन उपविभागीय अधिकारी सोलापूर यांचेकडे दावा दाखल केला. त्यावर सुनावणी होऊन उपविभागीय अधिकारी सोलापूर, क्र. १ यांनी खरेदीखत शून्यवत ठरविल्याचा निकाल जाहीर केला. तसेच पोलीस संरक्षण व ताबा सुद्धा देण्याचे आदेश दिले आहेत. सदर निकालामुळे एका ज्येष्ठ नागरिक महिलेला उपविभागीय अधिकारी यांचे कोर्टाकडून मोठा दिलासा व न्याय मिळाला आहे.

## निधन वृत्त...

### शिवप्यारीबाई जाखोटिया


**सोलापूर, दि. १४ जून-**



पंधे सोसायटीतील श्रीमती शिवप्यारीबाई जाखोटिया (वय-९६ ) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. घनशाम व सत्यनारायण जाखोटीया यांच्या त्या मातोश्री होत.

### शोभा चिट्टे

**सोलापूर, दि. १४ जून-**



येथील शोभा इरण्णा चिट्टे (वय- ६९) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

# अक्कलकोटच्या विकासात अन्नछत्र मंडळाचे योगदान

## आ. सचिन कल्याणशेट्टी; शहरातील राजेफत्तेसिंह क्रीडांगणावर वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ जून-**

अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून अन्नदान या पवित्र कार्याबरोबरच विविध उपक्रमासह श्री क्षेत्र अक्कलकोटच्या विकासात देखील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मोलाचे योगदान असल्याचे गौरवोद्गार आमदार-सचिन कल्याणशेट्टी यांनी यावेळी व्यक्त केले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून शहरातील राजेफत्तेसिंह क्रीडांगणावर वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कार्यक्रम आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले होते.

याप्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, नपा प्रशासन अधिकारी शैलेश बिराजदार हे उपस्थित होते. प्रास्ताविक करताना जन्मेजयराजे म्हणाले, महाराष्ट्र शासन, राज्याचे मुख्यमत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राज्यभरात वृक्षारोपण



व वृक्षसंवर्धन करीत आहे, अन्नछत्र या न्यासाकडून जनहितार्थ विविध उपक्रम हाती घेत असताना वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन याला महत्व देत कार्यरत आहेत. ते पुढे बोलताना म्हणाले, संस्थान काळातील गावामध्ये दुतर्फा वडाची वृक्ष असायची मात्र काळानुरूप ती आता पहायला मिळत नाही, मात्र अन्नछत्र मंडळाने सोलापूर रस्त्यावर दुतर्फा वृक्षांची लागवड करण्यात आली. सदरची लागवड ही वळसंग व पुढे सोलापूर शहराच्या सीमेपर्यंत करण्यात येणार होती, मात्र राष्ट्रीय महामार्गाच्या वतीने सदरची झाडे लावण्यात येणार असल्याने वृक्षारोपण करता आले नाही. पुढील काळात शहरातील शासकीय जागेसह अन्य ठिकाणी अन्नछत्र मंडळाकडून वृक्षारोपण व संवर्धन मागणी नुसार करण्यात येणार असल्याचे जन्मेजयराजे यांनी सांगून नागरिकानी याकरिता पुढे येण्याचे आवाहन केले.

यावेळी विद्याधर गुरव, धुळप्पा बजे, यांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमास मॉर्निंग, सुप्रभात ग्रुप, निसर्ग सेवा फाउंडेशन चे पदाधिकारी, सदस्य आणि अमोलराजे जन्मेजयराजे भोसले मित्र मंडळ व लेझीम संघ सह अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, लाला राठोड, संतोष भोसले, ॲड. संतोष खोबरे, मनोज निकम, अरविंद शिंदे, अप्पा हंचाटे, प्रा. शिवशरण अचलेर, प्रभाकर मजगे, प्रवीण शहा, शिवलिंग स्वामी, सुनील गोरे, प्रमोद लोकापुरे, मतीन पटेल, उमेश पाटील चप्पळगांव, अलीबाशा अत्तार, मैनुद्दीन कोरबू, सरफराज शेख, राजशेखर हिप्परगी, विलासराव कोरे, शिवराज स्वामी, नरसिंग क्षीरसागर, अश्पाक काझी, दत्ता कटारे, बाळा शिंदे, योगेश अहंकारी, योगेश कटारे, अप्पी स्थावरमठ, कांत झिपरे, सौरभ मोरे, वैभव मोरे, रोहित खोबरे, वासू कडबगांवकर, किरण पाटील, विठ्ठलराव दिकसंगी, चंद्रकांत कालीबत्ते, चंद्रकांत सोनटक्के, मेजर श्रीकांत मोरे, मेजर किरण जाधव, उषा हंचाटे, गजानन पाटील, जयसिंह राठोड, सुरेश पाटील, डॉ. राजाभाऊ मलंग, डॉ. विनायक बुधले, बसवराज माशाळे, बाबा पाटील, स्वामीराव मोरे, पी.डी. गायकवाड कुरनूर, मल्लिनाथ मजगे, दिलीपराव महिंद्रकर, दिनेश पटेल, विलासराव राठोड, प्रीतेश किलजे, सिद्धेश्वर मोरे, कलशेट्टी व चनशेट्टी बंधू, गणेश गोबुर, महेश शावरी, राजाभाऊ इंगळे, मनसूर फुलारी, राजकुमार भोसले, अतिश पवार, सिद्धराम माळी, धनंजय गाढवे, नागेश कलशेट्टी, केदार माळशेट्टी, आकाश सूर्यवंशी, बालाजी पाटील, लखन झंपले, बाळासाहेब कुलकर्णी बाबलादकर, राचप्पा वागदरे, अभिमन्यू ताड, माळी मामा, गोरख माळी, सुरेश सुरवसे, विजय मोरे यांच्या सह संजय गोंडाळ, शितल जाधव, वैभव नवले, सुरज सावंत, बंडू पाटील, सागर शिंदे, आकाश शिंदे, सनी सोनटक्के, बाळासाहेब पोळ, निखील पाटील, प्रवीण घाडगे, कुमार पाटील, चेतन शिंदे, लक्ष्मण मचाले, महेश दणके, राजू माकणे, आनंत क्षीरसागर, गोविंदराव शिंदे, धनंजय गडदे, सोमशेखर जमशेट्टी, गोटू माने, राहुल इंडे, महांतेश स्वामी, स्वामिनाथ बाबर उपस्थित होते. याप्रसंगी विविध मान्यवरांचा सत्कार झाला. सूत्रसंचालन प्रा. प्रकाश सुरवसे तर आभार प्रा.मनोज जगताप यांनी मानले.

### राम-लक्ष्मणाच्या जोडीला माझे सहकार्य राहील

आमदार- सचिन कल्याणशेट्टी व त्यांचे बंधू मिलन कल्याणशेट्टी हे श्री क्षेत्र अक्कलकोटच्या चौफेर विकासासाठी सतत झटणारे नेतृत्व लाभले आहे. विकास कार्यात आजवरच्या लोकप्रतिनिधी मध्ये आ. सचिन कल्याणशेट्टी हे अव्वल ठरले आहेत. विकासाच्या माध्यमातून तीर्थ क्षेत्र नगरीचा चेहरा- मोहरा बदलण्याचे महत्वपूर्ण काम ते करीत आहेत. त्यांना मोलाची साथ मिलन कल्याणशेट्टी हे देत आहेत. श्री क्षेत्र अक्कलकोटच्या विकास कार्यासाठी राम-लक्ष्मणाच्या जोडीला माझी खंबीर साथ राहणार असल्याचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले म्हणाले

# ई-नाम प्रणाली शेतकऱ्यांना फायद्याची : रंगनाथ कटरे

## शेतमालाच्या खरेदी-विक्रीत पारदर्शकता

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१४ जून -**

केंद्र सरकारच्या नविन धोरणानुसार राष्ट्रीय कृषि बाजार (ई-नाम) या प्रणालीमुळे शेतक-यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा होणार असून शेतमालाच्या खरेदी-विक्री व्यवहारात पारदर्शकता येणार असल्याची माहिती कृषि मंत्रालय भारत सरकारचे नियुक्त मार्गदर्शक रंगनाथ कटरे यांनी दिली.

केंद्र सरकारच्या नविन धोरणानुसार राष्ट्रीय कृषि बाजार म्हणजे ई-नाम या योजनेमध्ये कृषि उत्पन्न बाजार समिती, अकलूज या बाजार समितीचा समावेश झाल्याबद्दल सदर प्रणालीची माहिती व अंमलबजावणी होण्यासाठी शुक्रवारी बाजार समितीचे चउझ गोडावूनमध्ये शेतकरी, व्यापारी, आडते, हमाल, तोलार, शेतकरी कंपनी पदाधिकारी, बाजार समिती कर्मचारी यांच्यासाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. कटरे म्हणाले की, ई-नाममुळे शेतक-यांच्या शेतमालाला वाजवी भाव मिळणे व विक्री झालेल्या मालाचे तात्काळ पैसे बँक खात्यात जमा होणे तसेच राज्यातील इतर बाजार समितीत नोंद असणारे खरेदीदार व्यापा-



यांना बोली लावणे शक्य होणार आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील म्हणाले की, या प्रणाली अंतर्गत व्यवहारामुळे शेतक-यांना रकमेबद्दल सुरक्षितता निर्माण होणार आहे. या योजनेमध्ये लाभ मिळण्यासाठी शेतक-यांनी बाजार समितीकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी आधारकार्ड झेरॉक्स, बँक पासबुक झेरॉक्स, मोबाईल नंबर देणे अनिवार्य आहे. शेतक-यांच्या शेतमाल खरेदी- विक्रीसंबंधी सध्याचे व्यवहार व त्यामधून होत असलेले संभाव्य धोके नुकसान लक्षात घेता शेतक-यांच्या फायद्यासाठी शेतकरी व व्यापा-यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी संचालक आनंद फडे, उध्दव डांगरे, शेतकरी, व्यापारी, बाजार समिती कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपसचिव दिनेश माने-देशमुख यांनी आभार मानले. सुत्रसंचालन धनंजय देशमुख यांनी केले.

# बार्शी नगरपालिकेविरुद्धचे महावितरणचे अपील फेटाळले

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ जून-**

बार्शी नगरपालिका महावितरण कंपनीची मोठी ग्राहक असताना देखील पालिकेची कोणतीही कामे महावितरणकडून वेळेवर केली जात नव्हती. तसेच एक्सप्रेस फिडरचे पैसे भरुनही तो न देता फसवून लिंक लाईन देऊन पालिकेची फसवणूक केल्याने महावितरण विरुद्ध दाखल केलेले खटल्यात जिल्हा व राज्य ग्राहक आयोगाने दिलेला पालिकेच्या बाजूचा निकाल राष्ट्रीय आयोगाने कायम ठेवत महावितरणचे अपील फेटाळून लावले आहे. त्यामुळे महावितरणला आता ३० दिवसांचे आत चांदणी जलशुद्धीकरण केंद्रावर एक्स्प्रेस फिडर बसवून द्यावा लागणार आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, नगरपरिषदेच्या विरोधात नगरपालिकेने तत्कालीन विद्युत निरीक्षक अविनाश शिंदे यांच्या माहितीवरुन आमदार दिलीप सोपल यांच्या सुचनेनुसार तत्कालीन नगराध्यक्ष योगेश सोपल, गटनेते नागेश अक्कलकोटे यांनी पालिका सभागृहात ठराव करुन २००९ साली ऍड. शिवाजी क्षीसागर यांच्यामार्फत जिल्हा ग्राहक मंचात तक्रार केली होती. यामध्ये शहरातील स्ट्रीट लाईट वेळेवर दुरुस्त न करणे, चांदणी जलशुद्धीकरण केंद्र येथे एक्स्प्रेस फिडर ऐवजी पालिकेला फसवून लिंक लाईन देणे व यामुळे पाणीपुरवठा वारंवार खंडित होणे आदी मुद्द्यांवर तक्रार केली होती. या ठिकाणी जिल्हा ग्राहक मंचाने पालिकेच्या बाजूने निकाल देत तीस दिवसाच्या आत एक्सप्रेस फिडर बसवून देण्याचे आदेश दिले होते. महावितरणने पुढे अपील केल्यानंतर राज्य आयोगाने देखील हा निकाल कायम केला होता. जिल्हा ग्राहक मंच व राज्य या दोन्ही कोर्टामध्ये नगरपालिकेच्या बाजूला निकाल झाल्यानंतर महावितरणने दिल्लीमध्ये रिविजन पिटीशन दाखल केले. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाने बार्शी नगरपरिषदेने केलेला युक्तिवाद मान्य करुन महावितरणचे रिविजन पिटीशन फेटाळून लावले आहे, व राज्य आयोगाचा निकाल कायम केला आहे.

२००८ ला एक्सप्रेस फिडरची किंमत पावणे नऊ लाख होती. मात्र आता या फिडरची किंमत ५५ लाख रुपये एवढी झालेली आहे. जिल्हा, राज्य आणि दिल्ली या तीनही ठिकाणी बार्शी नगरपरिषदेचा विजय झाल्याने महावितरण कंपनीला चांदणी जलशुद्धीकरण केंद्रावर ३० दिवसांच्या आत एक्सप्रेस फिडर बसवून द्यावा लागेल. असे झाल्याने बार्शीकर जनतेला जास्त प्रेशरने पाणी मिळून पाण्याची समस्या कमी होईल.

बार्शीतील जनतेचा पाणीपुरवठ्याचा मूलभूत अधिकार असताना महावितरण कंपनीचे अधिकार्याने अठरा वर्षांपासून पाणीपुरवठा पूर्ण क्षमतेने होण्यापासून जनतेला वंचित ठेवल्यामुळे मानवी हक्क आयोगाकडे देखील तक्रार करण्यात येणार असल्याचे ॲड. शिवाजी क्षीरसागर यांनी सांगितले. याकामी आमदार दिलीप सोपल, तत्कालीन नगराध्यक्ष योगेश सोपल, नागेश अक्कलकोटे यांच्यासह माजी आमदार राजेंद्र राऊत, खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या सर्व राजकीय पक्षांनी संधी दिल्याचे क्षीरसागर यांनी सांगितले. क्षीरसागर यांच्या सोबत दिल्लीत श्रीमती यु डी फरतडे यांनी काम पाहिले. ऍड पवन क्षीरसागर व अक्षय बिडाबाग यांचे सहकार्य लाभले.

# डॉ. आंबेडकर स्वाधार योजनेच्या अटी शिथिल करा

## भाजपाचे खिलारे यांची समाजकल्याण मंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १४ जून-**

अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नसल्यास त्यांनाही शिक्षण घेता यावे यासाठी भाजपा महायुती सरकारने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतून निवास व भोजनासाठी विशेष अर्थीक तरतूद केली असून या योजनेचा लाभ राज्यातील सर्व ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या गोरगरीब मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिला जावा अशा मागणीचे निवेदन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांचेकडे भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष संजीव खिलारे यांनी समक्ष भेटून दिले आहे.

त्यावर लवकरच सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे मंत्रिमहोदयांनी सांगितले असल्याची माहिती श्री. खिलारे यांनी पत्रकारांना दिली. या स्वाधार योजनेतून राज्यातील मोठ्या ६ महानगरपालिका व इतर म



हानगरपालिका, नगरपरिषदा अशा काही मोजक्याच ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या परंतू वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासन आर्थीक मदत करते. परंतू या स्वाधार योजनेचे मर्यादित स्वरुप पाहता राज्यातील अनेक शैक्षणिक संस्थेत निवासी वैद्यकीय, इंजिनिअरिंग, उच्च शिक्षण घेणारी गरीब मुले या योजनेपासून वंचित रहात असल्याने त्यांनाही स्वाधार योजनेचा लाभ देण्यात यावा . या योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थांसाठी ३० वर्षे असलेली वयाची अट वाढवून ४५ वर्षे करावी व लाभाचे स्वरुप एका शैक्षणिक वर्षासाठी ७५ हजार रुपये करण्यात यावे, शिष्यवृत्ती व स्वाधार योजनेची रक्कम विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या शेवटी दिली जात असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते .म्हणून पात्र विद्यार्थ्यांना या पुढील शैक्षणिक प्रवेशा वेळीच स्वाधार योजनेचा पहिला हप्ता देण्यात यावा इत्यादी मागण्यांचे निवेदन भाजपा अनुसूचित जाती मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष संजीव खिलारे (मोहोळ ) यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ व सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांना दिले . मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने बाबत लवकरच योग्य ती ठोस कार्यवाही करण्याचे आश्वासन समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट व प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी दिले आहे.

# पत्रकारांनी स्वतःच्या कुटुंबासाठीही वेळ द्यावा : नलावडे

## बार्शीत व्हॉइस ऑफ मीडियाकडून शालेय साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि १४ जून -**

पत्रकार हा समाजाचा आरसा असतो. पत्रकारांना समाजातील सर्वच घडामोडीबाबत जागृत राहून महत्त्वाचे कर्तव्य पार पाडावे लागते. परंतू स्वतःच्याच कुटुंबाकडे दुर्लक्ष न करता पत्रकारांनी आपल्या कुटुंबासाठी वेळ देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन निवृत्त शिक्षणाधिकारी व सुयश विद्यालयाचे अध्यक्ष शिवदास नलावडे यांनी येथे केले.

व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमच्यावतीने पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार आणि शहर, तालुक्यातील पत्रकारांच्या मुलांना शालेय साहित्याचे वाटप शुक्रवारी (दि. १२) संघटनेच्या राज्य कार्यालयात करण्यात आले. त्यावेळी ते



बोलत होते. यावेळी निवृत्त तहसीलदार मदनराव वायकुळे, व्हॉइस ऑफ मीडियाचे राज्य उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ, शाम थोरात, अमोल आजबे, मयूर थोरात, प्रवीण पावले, प्रदीप माळी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अहमदाबाद येथे झालेल्या विमान दुर्घटनेतील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. समाजात वावरत असताना पत्रकारांवर अनेक जबाबदाऱ्या असतात. रात्री बेरात्री कोणतीही घटना घडली तरी ते सतत कार्यरत असतात. पण कुटुंबाकडे दुर्लक्ष होते. मात्र पत्रकारांनी आपल्या मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठीही वेळ द्यावा, असे आवाहन नलावडे यांनी केले. स्मार्ट अॅकॅडमीचे संचालक सचिन वायकुळे म्हणाले, मुलांचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर आपल्या मुलांसोबत मैत्रीपूर्ण वातावरण ठेवावे, असे स्पष्ट केले. प्रस्ताविकात अजित कुंकूलोळ म्हणाले, बार्शीत केवळ संघटनेतील सदस्य असलेल्या पत्रकारांच्या पाल्यांनाच नव्हे तर तालुक्यातील सर्वच पत्रकारांच्या १०० मुलांना सुमारे एक लाख रुपयांचे शालेय साहित्य वाटप केले आहे. जिल्ह्यात पहिल्यांदाच हा उपक्रम राबवल्याचे कुंकूलोळ यांनी सांगितले. सूत्रसंचालन संदीप अलाट यांनी केले तर आभार शाम थोरात यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निलेश झिंगाडे, विजय शिंगाडे, समाधान चव्हाण ,विक्रांत पवार ,ओंकार हिंगमीरे ,जमीर कुरेशी, अपर्णा दळवी यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### या गुणवंतांचा झाला सन्मान

डॉ. साक्षी प्रशांत काळे (फिजिओथेरपिस्ट), साक्षी प्रदीप माळी, सिद्धांत अमोल आजबे, संस्कृती सिद्धांत बसवंत, वेदांत सचिन वायकुळे, हर्षद आनंद शेटे, तन्वी उमेश काळे, सुरभी चंद्रकांत करडे या दहावी, बारावीच्या गुणवंत मुलांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

# नीट परिक्षार्थींची फसवणूक; सीबीआयकडून दोघांना अटक

## ● सोलापूरच्या संदीप शहाचा अटक केलेल्यामध्ये समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

नीट परीक्षेत चांगले गुण मिळवून देण्याचे आमीष दाखवून फसवणूक करणाऱ्या टोळीतील दोघांना केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) अटक केली. आरोपींनी नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या (एनटीए) अधिकाऱ्यांशी संबंध असल्याचा दावा करून विश्वास संपादन करत होते, अशी माहिती सीबीआयने शनिवारी दिली. याप्रकरणी सीबीआय तपास करत आहे.

आरोपींनी अनेक विद्यार्थी व पालिकांची फसवणूक केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. अटक करण्यात आलेले आरोपीमध्ये संदीप शहा (सोलापूर) आणि सलीम पटेल (नवी मुंबई) यांचा समावेश असून त्यांना अनुक्रमे ९ आणि १० जून रोजी मुंबई आणि सांगली येथून अटक करण्यात आली, अशी माहिती सीबीआयकडून देण्यात आली आहे. सीबीआयने ९ जूनला याप्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून आरोपींनी नीट युजी २०२५ परीक्षेतील कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांचे गुण वाढवून देण्याचे आमिष दाखवून पालकांकडून मोठी रक्कम उकळली, असे तपासात निष्पन्न झाले आहे.

आरोपींनी अनेक विद्यार्थी व पालकांना अधिकाऱ्यांच्या मदतीन गुण वाढवून देण्याचे आमीष दाखवले होते. त्या बदल्यात आरोपींनी मोठी रक्कम घेतल्याचे सीबीआयने स्पष्ट केले आहे. आरोपी पालकांवर प्रभाव टाकण्यासाठी परळ परिसरातील पंचतारांकीत हॉटेलमध्ये पालकांची भेट घ्यायचे. संदीप शहा याने विद्यार्थ्यामागे प्रत्येकी तब्बल ९० लाख रुपये मागितले होते. मात्र, चर्चेनंतर ही रक्कम ८७ लाख ५० हजार रुपये स्वीकारण्यास होकार दिला होता. निकाल जाहीर होण्याच्या सहा तास आधी त्यांना वाढवलेल्या गुणांची माहिती मिळेल, असे आश्वासन दिले होते. या व्यवहारात संदीप शहा नियमितपणे नवी मुंबईतील शिक्षण सल्लागार संस्थेचे संचालक सलीम पटेल याच्या संपर्कात होता. तसेच पुण्यातील आणखी एका सल्लागार संस्थेशी देखील त्याचे संबंध होते, अशी माहिती सीबीआयकडून देण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या मोबाईलची न्यायवैद्यक प्रयोगशाळेत तपासणी केली असता संभाव्य उमेदवारांची यादी, त्यांचे पट क्रमांक, प्रवेशपत्र, ओएमआर शीट तसेच हवाला चॅनेलच्या माध्यमातून झालेल्या आर्थिक व्यवहारांचे पुरावे सापडले आहेत, असे सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायालयाने दोघांनाही १६ जूनपर्यंत सीबीआयच्या कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी सीबीआयने केंद्रीय अधिकाऱ्यांच्या सहभागाबाबतही तपास केला. पण सध्यातरी कोणताही सरकारी अधिकारी किंवा एनटीए कर्मचारी यांचा सहभाग आढळला नसल्याचे सीबीआयकडून सांगण्यात आले. सध्या सीबीआय आरोपींच्या कॉल डिटेल्स आणि आर्थिक व्यवहारांची तपासणी करून फसवणूक झालेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शोध घेत आहे.

संदीप शहावर मेडिकलमध्ये व्यवस्थापन कोट्यातून ॲडमिशन मिळवून देतो म्हणून सोलापूर शहरातील विजापूर नाका पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल आहेत. गुन्ह्यांचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून करण्यात येऊन न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आलेले आहे

# शहराला तीन दिवसाआड पाणीपुरवठा शक्य : पालकमंत्री गोरे

▸▸ दुहेरी जलवाहिनीतून सोरेगाव जलशुद्धीकरण केंद्रात पोहोचलेल्या पाण्याची पालकमंत्र्यांनी केली पाहणी
▸▸ आ. देवेंद्र कोठे यांच्यासह पदाधिकारी व अधिकाऱ्यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनी बनविणे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न होते. ते स्वप्न पूर्ण झाले आहे. या कामाच्या पूर्तत्वासाठी सोलापुरातील स्थानिक लोकप्रतिनिधींनीदेखील यशस्वी पाठपुरावा केला आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून सोलापूरला अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे सद्यस्थितीत सोलापूर शहराला तीन दिवसाआड पाणीपुरवठा करणे शक्य होईल, अशी माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वकांक्षी प्रकल्प असलेल्या उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर चाचणी दरम्यान शनिवारी पाणी सोरेगाव येथील जलशुद्धीकरण केंद्रात पोहोचले. या पाण्याची तसेच सोरेगाव जलशुद्धीकरण केंद्राचीही पाहणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शनिवारी दुपारी केली. यावेळी आ. देवेंद्र कोठे, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, जिल्हाध्यक्ष (पूर्व) शशिकांत चव्हाण आदी उपस्थित होते. येथील पाहणीनंतर पत्रकारांशी बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले, पाकणी नव्या जलशुद्धीकरण केंद्राच्या उभारणीसाठी वन विभागाची जागा मिळवून सोलापूर महानगरपालिकेचे नऊ कोटी रुपये वाचविण्यात यश आले आहे. नव्या जलशुद्धीकरण केंद्राच्या उभारणीपर्यंत दर आठवड्यातून दोन वेळा पाणी सोडण्याबाबत सोलापूर महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांची मी चर्चा केली आहे. परंतु सोलापूरकरांना दररोज पाणीपुरवठा करणे हे सोलापुरातील लोकप्रतिनिधी आणि भारतीय जनता पार्टीचे स्वप्न आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी असोत किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असोत, दिलेला शब्द त्यांनी आजवर पाळलेला आहे. त्यामुळे सोलापूरकरांना दररोज पाणीपुरवठा करण्याचा शब्दही नक्की पाळला जाईल. त्यासाठी भारतीय जनता पार्टीचे सर्व लोकप्रतिनिधी कटिबद्ध आहेत, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले.

### ▸▸ अंतर्गत पाणी वितरण व्यवस्था कामानंतर दररोज पाणीपुरवठा : पालकमंत्री गोरे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्याच बैठकीत सोलापूरच्या अंतर्गत पाणी वितरण व्यवस्थेसाठी ८५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून सोलापूरकरांना मोठा दिलासा दिला आहे. पाकणी जलशुद्धीकरण केंद्राच्या उभारणीचे काम वर्षभरात पूर्ण होणार आहे. तसेच शहरातील अंतर्गत पाणी वितरण व्यवस्था कामानंतर सोलापूरला दररोज पाणीपुरवठा करण्याची क्षमता निर्माण होईल, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले.

### ▸▸ दिलेला शब्द पूर्ण करणारच : आ. कोठे

सोलापूरकरांना दररोज पाणीपुरवठा करण्याचा शब्द भारतीय जनता पार्टीने दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली सोलापुरातील विकासकामांनी वेग धरला असून सोलापूरकरांना दिलेला शब्द आम्ही पूर्ण करणार आहोत, असे आ. देवेंद्र कोठे यांनी सांगितले.



सोलापूर : येथील रेल्वे स्थानकाचे नूतनीकरण सुरू असताना ऐतिहासिक शिल्प त्यांनी अडगळीत ठेवले होते. याबाबत दैनिक तरुण भारतच्या माध्यमातून आवाज उठविल्यावर आता ते शिल्प अडगळीतून हलवून स्थानकाच्या दर्शनी भागात ठेवण्यात येत आहे. या कारवाईचे टिपलेले छायाचित्र.

# ९० गावात राबविले विकसित कृषि संकल्प अभियान

## २२ हजारपेक्षा जास्त शेतकऱ्यांना फायदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

खरीप हंगाम पूर्व अभियान अंतर्गत ९० गावात कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे भारतीय कृषि अनुसंधान परिषदेंतर्गत शबरी कृषि प्रतिष्ठान संचलित कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर मार्फत जिल्ह्यातील राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र, सोलापूर, विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर, कृषि विभाग, आत्मा विभाग यांच्या सहभागाने दि. २९ मे ते १२ जूनए २०२५ विकसीत कृषि संकल्प अभियान संपन्न झाले. ही अभियान ९० गावात राबविले तर याचा फायदा २२ हजारपेक्षा जास्त शेतकऱ्यांन होणार आहे.



सदरील अभियानामध्ये सर्व संशोधन संस्थांमधील शास्त्रज्ञांचे तीन चमु करण्यात आले होते. यामध्ये ते प्रत्येक दिवशी सहा गावात असे सलग एकूण १५ दिवस उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, मंगळवेढा इ. तालुक्यातील ९० गावामध्ये जाऊन २२ हजार शेतक-यांना मार्गदर्शन केले. यासाठी राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र, सोलापूरचे संचालक डॉ. आर. ए. मराठे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले, शबरी कृषि प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदिप गायकवाड, कृषि विज्ञान केंद्र, सोलापूरचे वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. लालासाहेब तांबडे आदी परिश्रम घेत आहेत. या अभियानात राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र, सोलापूरचे प्रधान शास्त्रज्ञ डॉ. दिनेश बाबु, वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ. पी.जी. पाटील, शास्त्रज्ञ डॉ. नम्रता गीरी, डॉ. रूपा सौजन्या, विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रफुल्ल पवार, डॉ. आदीनाथ ताकटे तर कृषि विज्ञान केंद्रातील विषय विशेषज्ञ प्र. अ. गोंजारी, डॉ. प्रकाश कदम, अमोल शास्त्री, अनिता शेळके, समाधान जवळगे, विकास भिसे, प्रयोग शाळा तंत्रज्ञ राहुल लंगोटे इ. शास्त्रज्ञांनी सक्रिय सहभाग नोंदविला.





# जनकल्याण मल्टीस्टेटला पॉवर ५० पुरस्कार प्रदान

**तभा वृासेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

समाजाच्या विविध क्षेत्रात नेत्रदीपक व प्रभावीपणे कार्य करत आपल्या कर्तृत्वाचा वैशिष्ट्यपूर्ण ठसा समाजमनावर उमटविणाऱ्या पन्नास विविध संस्था, व्यक्तींना दिला जाणारा पॉवर ५० पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते जनकल्याण मल्टिस्टेट या संस्थेला प्रदान करण्यात आला.

संस्थापक चेअरमन राजेंद्र हजारे व मुख्य कार्यकारी अधिकारी आशा हजारे यांनी पुरस्कार स्वीकारला. हॉटेल बालाजी सरोवर प्रीमियर येथे आयोजित केलेल्या या पुरस्कार सोहळ्याला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अॅन्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी, पोलीस आयुक्त राजकुमार, सोलापूर मध्यचे आमदार देवेंद कोठे, पुणे येथील उद्योजक शहाजीराव भाड यांच्यासह प्रतिष्ठित नागरीक, उद्योजक, व्यापारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# मुलांच्या स्वागतासाठी अधिकारी राहणार उपस्थित

▸ सीईओ कुलदीप जंगम यांची माहिती
▸ उद्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव

**तभा वृासेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

सोमवार १६ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षाला सुरूवात होत असून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व स्वागत करण्यासाठी पालकमंत्री, खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व आयुक्त, लोकप्रतिनिधी सह सर्व विभागाचे विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित राहणार आहेत.



जिल्हा परिषद शाळेतील मुलांचा प्रवेशोत्सवातून जंगी स्वागत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील २०० ते ३०० शाळांना भेट देण्याचे नियोजन करण्यात आला आहे. पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तके, बूट, गोड खिचडीसह नवीन गणवेश देण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेच्या सर्व विध्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केला आहे. जिल्हा परिषदेत आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहीती दिली. यावेळी जंगम म्हणाले, पंतप्रधान मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना शाळा प्रवेशोत्सव जिल्हा परिषद शाळेत सर्वप्रथम सुरू करण्यात आला. त्यानंतर या मोहीमेला चांगला प्रतिसाद मिळाल्याने शासनाकडून जिल्हा परिषद शाळा प्रवेशोत्सवाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. शासनाकडून प्रवेशोत्सवाच्या माध्यमातून शक्य तितक्या शाळांना भेट देऊन जिल्हा परिषद शाळांवरील विश्वास दृढ करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. यावेळी पालकमंत्रीसह खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, पोलिस आयुक्तसह जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख उपस्थित राहणार आहेत. शाळा प्रवेशोत्सवाची शिक्षण विभाग व जिल्हा प्रशासनाकडून नियोजन करण्यात येत असल्याचे जंगम यांनी सांगितले.

### ▸▸ मान्यवरांच्या सत्काराला बगल

शाळा प्रवेशोत्सवासाठी उपस्थित राहणाऱ्या मान्यवर व लोकप्रतिनिधींचे सत्कार करण्यासाठी हार तुरे, बुके, शाल, पेटा यांना बगल देऊन शाळेत येणाऱ्या विद्यार्यांचे स्वागत करण्याच्या सूचना देण्यात आले आहेत. त्यामुळ विध्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आपुलकी निर्माण होण्यास मदत होणार आहे. शाळांकडून सत्कार कार्यक्रमाला बगल देऊन प्रवेशोत्सव कार्यक्रम होणार असल्याचे सांगण्यात आले.

# शेळगीतील थोबडे नगरात साडेपाच लाखांची घरफोडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ जून -**

शहरातील शेळगी परिसरातील महेश थोबडे नगरातील बंद घर फोडून चोरट्याने ५ लाख ५० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला.



याबाबत शिवानंद लिंगण्णा कडबगावकर (वय ६२, रा. महेश थोबडे नगर, शेळगी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवानंद कडबगावकर हे १२ जून रोजी घराला कुलूप लावून कुटुंबियासमवेत शिर्डी येथे देवदर्शनासाठी गेले होते. ते परत १३ जून रोजी घरी परत आले. या दरम्यान अज्ञात चोरट्याने कडबगावकर यांच्या बंद घराचा कडी कोयंडा कुलूप कशानेतरी तोडून घरात प्रवेश केला आणि लाकडी व लोखंडी कपाटातील सोन्याचे दागिने चोरून नेले. यामध्ये चोरट्याने ४० ग्रॅम वजनाचे हातातील पाटल्या, १५ ग्रॅमचे सोन्याचे मिनी गंठण, १० ग्रॅमच्या कानातील रिंगा, ५ ग्रॅमची अंगठी, १० ग्रॅमचे हातातील बांगड्या, ३० ग्रॅम वजनाचे चपलाहार असे दागिने असल्याचे नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक महाडीक पुढील तपास करीत आहेत.

# गुरुनानक चौकात वाहतुकीचा वाढला लोड

## ● प्रशासनाचे होते दुर्लक्ष; वाहतुकीचे वाजले तीन तेरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून**

होटगी रोडवरील ड्रेनेज चेंबर लाईनचे काम हाती घेण्यात आल्याने, गांधीनगर ते महिला हॉस्पिटल दरम्यान चा रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. त्याला पर्यायी मार्ग म्हणून राजीव नगर, मिल्ट्री कॅन्टीन मार्गे गुरुनानक चौक गांधीनगर असा रस्ता पर्यायी स्वरूपात देण्यात आला आहे. परंतु या पर्याय रस्त्यांवर वाहतुकीचा बोजवारा उडालेला दिसत आहे. मुख्य चौकातील सर्कल भोवती वाहनधारकांनी आपली मनमानी सुरू केली असल्याने, कुठले वाहन कोठून जाते, वाहनधारकांना हेच कळेनासे झाले आहे. त्यामुळे अपघाताचा धोका बळावत चाललेला आहे. येथे बॅरिगेट्स आणले परंतु लावले गेले नाही. त्यामुळे या नियोजनशून्य वाहतुकीकडे प्रशासनाचे जाणून बुजून दुर्लक्ष होताना दिसत आहे.

दरम्यान शहराचे सांडपाणी छत्रपती संभाजी तलाव परिसरात मिसळत असल्याचे महापालिका प्रशासनाच्या निदर्शनास आल्यानंतर, शहरातील हे वाहणारे सांडपाणी वळवण्याकरिता ड्रेनेस चेंबर लाईन घालण्याचे काम सुरू केले. या कामासाठी रस्त्यावरून जाणारी वाहतूक गुरुनानक चौकाकडे वळवण्यात आली. मात्र हा पर्यायी मार्ग अरुंद व खड्डेमय असल्याने येथे वाहनधारकांचे मोठ्या प्रमाणात कोंडी होत आहे. अशातच आता वाहनधारकांचा मनमानी कारभार समोर आला आहे. वास्तविक पाहता गुरुनानक चौकातून जाताना वाहनधारकांनी चौकातील सर्कल पूर्णपणे ओलांडून जाणे आवश्यक असताना तसे होताना दिसत नाही. सर्कल भोवती फेरी मारून न जाता वाहनधारक रस्त्याच्या मधूनच जात असल्याने अचानक समोरून येणाऱ्या वाहनामुळे येथे वाहनांचा समोरासमोरील अपघात होण्याचा धोका संभवत आहे. वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढल्याने बेशिस्त वाहतुकीला मोठ्या प्रमाणात चालना मिळत आहे.



सोलापूर : शहरातील गुरुनानक चौकातील सर्कल भोवती फेरी न मारताच वाहनधारक रस्त्याच्या मधूनच जात असताना टिपलेले छायाचित्र.

### ▸▸ सर्कलला फेरी न मारताच जातात

गांधीनगर कडून गुरुनानक चौकाकडे येणारी वाहने जेव्हा चौकातील सर्कल येथे दाखल होतात. तेव्हा सर्कल भोवती फेरी मारून वाहने रस्ता ओलांडतात. परंतु काही बेशिस्त रिक्षाचालकांच्या वर्तणुकीमुळे वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. सर्कल भोवती फेरी न मारताच वाहने मधूनच रस्ता ओलांडत आहेत. त्यामुळे कुमठा नाका चौकाकडून तसेच अशोक चौक कडून येणारी वाहने यांचा अपघात होण्याचा धोका बळावत आहे. वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात झाल्याने येथे बॅरिगेट्स तसेच वाहतूक पोलिसांचा बंदोबस्त असणे गरजेचे आहे. मात्र प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.

### ▸▸ प्रशासनाने काम लवकर पूर्ण करावे

प्रशासनाने सदरचे ड्रेनेज चेंबर लाईनचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी केली जात आहे. पर्यायी मार्गावर वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढल्याने वाहतूक कोंडीचे स्वरूप वाढत आहे. अशातच गुरुनानक चौकातील स्थानिक रहवाशांना याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. घरासमोर वाहनांच्या मोठ्या आणि लांबच लांब रांगा लागल्याने त्यांना देखील ये जा करण्यासाठी कसरत करावी लागत आहे. हॉर्नचा कर्कश्य आबालवृद्धांसाठी घातक ठरत आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने देखील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन लवकरात लवकर सदरचे काम पूर्ण करावे असा सूर आता स्थानिक नागरिकांमधून उमटत आहे.



# अनैतिक संबंधाच्या संशयातून बटलेत महिलेला मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून**

मोहोळ तालुक्यातील बिटले गावात अनैतिक संबंधाच्या संशयातून रुपाली बळी होनमने (वय ३१) या महिलेला मारहाण करण्यात आली. ही मारहाण १२ जून रोजी झाली.

गुरुवारी रुपाली या राहत्या घरी असताना, रमेश आदलिंगे, उज्वला आदलिंगे व इतरांनी अनैतिक संबंधाच्या संशयातून लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. या मारहाणीत रुपाली हिच्या डोक्याला जखम झाली. तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार घेऊन दुपारी १.३० वाजता ती सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. उपचार करून दुपारी ४.५० वाजता तिला रुग्णालयातून सोडण्यात आल्याची नोंद सिव्हीलमध्ये झाली आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विमानाच्या तिसऱ्या 'टेकऑफ'लाही सोलापूरकरांचा प्रतिसाद

**सोलापूर, दि. १४ जून-**

सोमवारनंतर शुक्रवार, शनिवारी गोव्याहून आलेल्या विमानाला चांगले प्रवाशी मिळाले आणि या प्रवाशांना घेवून सोलापुरातून गोव्याकडे आज शनिवार, दि. १४ जून रोजी सायंकाळी ४: ४५ वा. विमानसेवेचा तिसरा टेकऑफ झाला. सोलापूरकरांच्या वाढत्या उत्साहामुळे फ्लाय ९१ कर्मचाऱ्यांनीही समाधान व्यक्त केले.

शुक्रवार, दि. १३ रोजी गोवा येथून आलेल्या विमानात २४ प्रवासी आले आणि ५१ प्रवाशी मार्गस्थ झाले. गोवा विमानतळावरून




ही सेवा रविवार, सोमवार, शुक्रवार आणि शनिवारी सोलापूरकरांना मिळणार आहे. आज शनिवारीही गोव्याहून २३-२४ प्रवाशी आले आणि सोलापूरहून ५९ प्रवाशी गोव्याकडे मार्गस्थ झाले. दरम्यान, रविवार आणि सोमवारी हे विमान सकाळी ८ वा. २० मिनिटांनी सोलापुरात येवून ८ वा. ५0 मिनिटांनी मार्गस्थ होणार आहे आणि शुक्रवार, शनिवारी हे विमान ५ वाजेच्या दरम्यान मार्गस्थ होत आहे. सध्या टाईमिंग थोडा मागेपुढे होत असला तरी पुढील आठवड्यापासून ही विमानसेवा सुरळीत चालेल, अशी माहिती सोलापूर विमानतळ अधिकाऱ्यांकडून मिळाली. दरम्यान, विमानाला नीट दिशा दिसण्यासाठी सोलापुरातील उंच इमारतींना लाल, पिवळ्या रंगाच्या पट्ट्या माराव्यात असेही आवाहन करण्यात आले आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### नऊ वर्षाच्या मुलाला मारहाण

**सोलापूर, दि. १४ जून-**

विजापूर रोडवरील माशाळ वस्ती येथे नऊ वर्षाच्या मुलाला बॅटने मारहाण करण्यात आली. हा प्रकार मुलांच्या भांडणातून घडला असून महिलेसह दोघांविरूध्द तक्रार दाखल झाली आहे. रोनित राहुल जरग (वय ९, रा. माशाळ वस्ती) असे मारहाण झालेल्या मुलाचे नाव आहे. रोनित हा गल्लीत इतर मुलांबरोबर खेळत होता. त्यावेळी त्याची तक्रार प्राची व सुरज राठोड यांच्या मुलाबरोबर वाद झाला. त्यावेळी आमच्या मुलाला मारतो का ? म्हणत धावत आलेल्या प्राची आणि सुरज राठोड या दोघांनी रोनित यास बॅटने मारल्याने सर्वांगास मुकामार लागला. ही मारहाण १० जून रोजी सायंकाळी सहा वाजता झाली असून शनिवारी सकाळी १०.४५ वाजता त्रास होऊ लागल्याने रोनित यास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### रेल्वेच्या धडकेत मजरेवाडीतील एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १४ जून-**

टिकेकरवाडी ते सोलापूर दरम्यान रेल्वेच्या धडकेत मजरेवाडी येथील सिद्राम धोंडप्पा हावडे (वय४२, रा. मजरेवाडी गाव, होटगी रोड) या व्यकतीचा मृत्यू झाला. गुरुवारी रात्री ११ वाजता जखमी अवस्थेत सिद्राम हे आढळून आले होते. टिकेकर वाडी ते सोलापूर अप ट्रक इलेक्ट्रीक पोल ४६0.१३ च्या जवळ रेल्वे ट्रकच्या जवळ सिद्राम हे जखमी अवस्थेत आढळून आले होते. त्यांना शनिवारी रात्री १२.३0 वाजता हवालदार मनुरे यांनी उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वी ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पतीने प्लॅस्टिक खुर्चीने मारल्याने पत्नी जखमी

**सोलापूर, दि. १४ जून-**

घरगुती कारणातून झालेल्या वादानंतर पतीने प्लॅस्टिक खुर्चीने मारल्याने पत्नी जखमी झाली. ही मारहाण शुक्रवारी रात्री ११ च्या सुमारास झाली. लक्ष्मी उमेश निरवाणी (वय ३२ , रा. वैष्णवी नगर, सैफुल) असे मारहाण झालेल्या विवाहितेचे नाव आहे. शुक्रवारी रात्री घरी असताना लक्ष्मी आणि तिचे पती उमेश यांच्यात घरगुती कारणातून वाद झाला. या वादातून उमेश याने घरातील पास्टिक खुर्चीने मारल्याने लक्ष्मी हिच्या डोक्यात जखम झाली. शनिवारी रात्री एक वाजता पती उमेश याने उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मंदिराच्या कट्टयावर आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १४ जून-**

लष्कर परिसरातील कुंभार गल्ली येथील महादेव मंदिराच्या कट्यावर बसून उंदीर मारण्याचे औषध प्राशन करून एकाने आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार शुक्रवारी रात्री ९.३0 च्या सुमारास उघडकीस आला. भाऊसाहेब लक्ष्मण खरटमल (वय ३२, रा. उत्तर सदर बझार) असे तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी रात्री ९.३0 च्या सुमारास भाऊसाहेब याने महादेव मंदिराच्या कट्यावर बसून अज्ञात कारणातून उंदीर मारण्याचे औषध प्राशन केले. त्यात त्याला त्रास होऊ लागल्याने भाऊ गुरुलिंग याने रात्री १0.५0 वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### बिशीच्या पैशाच्या कारणावरून हाणामारी

**सोलापूर, दि. १४ जून-**

शहरातील तेलंगी पाच्छा पेठ येथे बिशीच्या पैशाच्या कारणावरून हाणामारी होऊन एकमेकांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले. मुजम्मिल एम डी हनिफ शहापूरे (वय ३२, रा. तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन सचिन मल्लिनाथ हक्के (वय ३१, रा. दमाणी नगर, आमराई, पाटील वस्ती, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर सचिन हक्के याच्या फिर्यादीवरुन मुजम्मिल शहापूरे याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुजम्मिल शहापूरे व सचिन हक्के हे एकमेकांचे ओळखीचे आहेत. १३ जून रोजी तेलंगी पाच्छा पेठ येथील नौशाद चहा कॅन्टीन येथे बिशीच्या पैशाच्या कारणावरून दोघांमध्ये एकमेकांना शिवीगाळ करून हाणामारी झाली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक डेरे पुढील तपास करीत आहेत.

# पालखी मार्गावर वॉटरप्रूफ मंडप

- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचना
- मुक्कामाच्या ठिकाणी २९ मंडपाचे नियोजन
- वारी निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी परस्परात योग्य समन्वय ठेवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

पालखी मार्ग पालखी मुक्काम ठिकाण विसावा ठिकाणी व रिंगण व पंढरपूर शहरात वाखरी येथे आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. यावर्षी पाऊस लवकर सुरू झालेला असून पावसाचे प्रमाण अधिक असू शकते; त्या दृष्टीने पालखी मार्गावर, तळावर आवश्यक त्या ठिकाणी जलावरोधक मंडप उत्कृष्ट दर्जाचे टाकावेत. शौचालय व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चांगली करावी. पालखी सोहळा व वारकऱ्यांना या कालावधीत कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही या दृष्टीने सर्वांनी दिलेली जबाबदारी अत्यंत नियोजनबद्धरित्या पार पाडावी, त्यासाठी परस्परात योग्य समन्वय ठेवावा व ही आषाढी वारी निर्विघ्नपणे पार पाडावी, अशा सूचना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केल्या.

आषाढी वारी २०२५ च्या अनुषंगाने प्रशासकीय यंत्रणेने केलेल्या नियोजनाच्या पूर्वतयारीचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे येथून घेतला. याप्रसंगी दूरदृष्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, जिल्हा शल्य चिकित्सक सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले यांच्यासह संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ६ जुलै रोजी होत असून २६ जून ते १० जुलै हा संपूर्ण यात्रा कालावधी आहे. पुणे, सातारा व सोलापूर जिल्हाधिकारी यांनी पालखी मार्गावर त्यांच्या त्यांच्या हद्दीत पालखी मुक्कामी ठिकाणी विसावा ठिकाणी जनरेटरची व्यवस्था करून ठेवण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले. यासाठी जिल्हा परिषदेचा सेस मधील निधी वापरावा. जर हा निधी नसेल तर जिल्हा नियोजन समिती मधून निधी उपलब्ध करून देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. यावेळी विभागीय आयुक्त चंद्रकांत कुलकुंडवार यांनी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या वतीने आज रोजी पर्यंत करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती बैठकीत सादर केली. तसेच पोलीस विभागाने वारी कालावधी पोलीस बंदोबस्त व गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती पोलीस विभागाचे आयजी सुनील फुलारी यांनी दिली. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मानाच्या पालख्या व अन्य पालख्या त्यांच्यासाठी करण्यात आलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली. पालखी तळांचे, विसावा ठिकाणांचे मागील वर्षीपेक्षा अडीच पट म्हणजेच ७५ हजार घनमीटरचे मुरमीकरण करण्यात आल्याचे सांगून मुक्कामाच्या ठिकाणी २९ वॉटरप्रूफ मंडप टाकण्याचे नियोजन केलेले आहे. यावेळी पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूड्डी तसेच सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनीही वारीच्या अनुषंगाने केलेल्या नियोजनाची माहिती दिली.




### ▶▶ स्वच्छतेला अधिक प्राधान्य द्यावे

पोलीस विभागाने देहू व आळंदी येथून पालख्या निघाल्यानंतर त्यांच्यासमवेत असलेल्या शौचालय वाहने, पाण्याचे टँकर तसेच अन्य सुविधा पुरवणाऱ्या लोकांसाठी देहू, आळंदी ते पंढरपूर पर्यंत एकच पोलीस विभागाचा युनिक पास उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून त्या त्या जिल्ह्याच्या हद्दीत जाताना या लोकांना पर्यायाने वारकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही, असे पवार यांनी सांगून पालखी मार्गावर तसेच संपूर्ण वारी कालावधीत स्वच्छतेला अधिक प्राधान्य देण्याचेही त्यांनी सुचित केले.

## आषाढीसाठी यंदा १० हजार पोलिसांचा बंदोबस्त

▸ साडेपाचशे अधिकारी आणि ३२०० होमगार्ड

**पंढरपूर :** पंढरीच्या पांडुरंगाचा आषाढी एकादशीचा सोहळा ६ जुलै रोजी पंढरपुरात रंगणार आहे. यंदाच्या वारीसाठी अंदाजे १६ लाखांहून अधिक भाविक पंढरीत येतील, असा पोलिसांचा अंदाज आहे. गर्दीवरील नियंत्रणासाठी दहा हजार पोलिसांचा बंदोबस्त त्याठिकाणी असणार आहे. गतवर्षी पंढरीत १४ ते १५ लाख भाविक आले होते. त्यावेळी पंढरपूर शहरातील गर्दीवर नियंत्रण आणताना पोलिसांना मोठी मेहनत घ्यावी लागली होती. ५ व ६ जुलैला पंढरपूर शहरात वारकऱ्यांची संख्या खूप मोठी राहते. गर्दीवर नियंत्रण करून वारी यशस्वी करण्यासाठी राज्यभरातील काही प्रमाणात पोलिस बंदोबस्तासाठी असणार आहेत. गतवर्षी अधिकारी व पोलिस अंमलदारांची संख्या चार हजार ८५0 पर्यंत होती. पण यंदा वारकरी मोठ्या संख्येने येण्याचा अंदाज असल्याने एकूण सहा हजार पोलिस अंमलदार व अधिकारी बंदोबस्तासाठी असणार आहेत. याशिवाय त्यांच्या मदतीला तीन हजार २00 होमगार्ड देखील असतील. तसेच राज्य राखीव पोलिस बलाच्या सहा कंपन्या देखील पंढरपुरात असणार आहेत.

| असा असणार बंदोबस्त... | |
|---|---|
| पोलिस अधिकारी | ५४५ |
| पोलिस अमंलदार | ५,४५0 |
| होमगार्ड | ३,२00 |
| एसआरपीएफ कंपन्या | ६ |

**पोलिस, आरटीओची यंत्रणा असणार एकत्र**

आषाढी वारीसाठी लाखो वारकरी त्यांच्या गावापासून पायी पंढरीच्या दिशेने निघाले आहेत. महामार्गावर त्यांचा प्रवास असतो. अनेकदा अपघात देखील झाले असून त्यात काहींना जीव गमवावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर अपघातमुक्त वारीसाठी यंदा आरटीओची पथके व सोलापूर ग्रामीण पोलिसांची पथके वेगवेगळ्या मार्गांवर कार्यरत असणार आहेत. वारकऱ्यांचे प्रबोधन व वाहतुकीचे नियमन ही पथके वारी काळात करणार असून तसे नियोजन पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी व आरटीओ गजानन नेरपगार यांनी केले आहे.

## जातीवाचक शिवीगाळ; महिलेसह तिघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**

तरूणास जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी महिलेसह तिघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अजय राम कंपली (वय ३१, रा. जय शंकर तालीम, मोदीखाना) याने दिलेल्या फिर्यादीवरुन हाफिज शेख, शकिला हाफिज शेख, जोनीजहाँ शेख (रा. शिवाजी नगर, मोदीखाना, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१३ मे रोजी सकाळी मोदीखाना येथील हनुमान मंदीराजवळ अजय कंपली हा त्याची एमएच १३ ईएल 0३२९ क्रमांकाच्या दुचाकीवरून दुध पाकिट घेऊन घरी जात होता. त्यावेळी हाफिज शेख याने त्याची काळ्या रंगाची कार भरधाव वेगाने चालविली. त्यावेळी कंपली याने ती गाडी थांबवली. त्यावेळी कार पुढे जाऊन परत मागे येऊन कंपलीच्या दुचाकीला ठोकर मारून निघून गेली. त्यामध्ये कंपलीच्या दुचाकीचे नुकसान होऊन पायास दुखापत झाली. यावेळी हाफिज शेख याची पत्नी शकिला व मुलगी जोनीजहाँ यांनी कंपली यास जातीवाचक शिवीगाळ केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहा. पोलिस आयुक्त सुधीर खिरडकर तपास करीत आहेत.

## रेल्वे स्थानकावरील सरकता जिना बंदच

▶▶ रेल्वेमंत्र्यांच्या दौऱ्यानंतरही परिस्थिती जैसे थे!; प्रवासी वैतागले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**

सोलापूर रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्र. १ वर प्रवाशांच्या सोयीसाठी असलेला सरकता जिना रेल्वे राज्यमंत्री व्ही. सोमण्णा यांच्या दौऱ्यानंतर पुन्हा बंद ठेवण्यात आला आहे. प्लॅटफॉर्म क्र. २ व ३ वरील लिफ्ट ही बंद आहे.

दरम्यान, जेव्हा प्रवाशी रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्र. १ वर येतात, त्यांची रेल्वे जर दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या किंवा पाचव्या क्रमांकावर असेल तर त्यांना जिन्यावरून चढून जावे लागते. जिने उंच व मोठे असल्याने प्लॅटफॉर्म क्र. १ वरून लिफ्टची सोय करण्यात आली आहे. मात्र, लिफ्टमध्ये फक्त ६ लोक थांबू शकतात, त्यामुळे वेळ जातो. गैरसोय होऊ नये म्हणून प्लॅटफॉर्म क्र. १ वर सरकता जिना बसविण्यात आला आहे. तो काही महिन्यापासून बंद होता. रेल्वे राज्यमंत्र्यांच्या दौऱ्यावेळी सरकता जिना सुरू होता. प्लॅटफॉर्म क्र. २ व ३ वर लिफ्ट करण्यात आली आहे. मात्र बिघाड झाल्याने बंद आहे. अशी अवस्था सोलापूर रेल्वे स्टेशनची झाल्याने प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.








### ● काम सुरू असल्याने जिना बंद

प्लॅटफॉर्म क.१ वर होणारी गर्दी लक्षात घेऊन प्रवाशांना बाहेर पडण्यासाठी दोन जिने आहेत. त्यातील एक जिना कामानिमित्त बंद आहे. हे काम मार्च २०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र ते पूर्ण न झाल्याने बंद असल्याचे बोलले जात आहे.

### ● दोन प्रवेश रस्ते बंद

रेल्वे स्थानकामध्ये प्रवेश करण्यासाठी चार मार्गिका (रस्ते) आहेत. त्यातील दोन मार्गिका बंद आहेत, तर एक सुरू आहे. त्यातून दोन रस्त्याने प्रवेश करता येतो. इंटरसिटी, सिद्धेश्वर, इंद्रायणीसह अन्य गाड्यांच्या वेळेत प्रवाशांची गर्दी वाढते. मात्र, एकच मार्गिका सुरू असल्याने बाहेरील. बाजूस रस्त्यावर वाहने थांबतात. रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होते.

**● बंद असलेला सरकता जिना चालू करा :** प्लॅटफॉर्म क्र. १ वर करण्यात आलेला सरकता जिना घाईगडबडीत चुकीच्या ठिकाणी झाला आहे, शिवाय तो बंद असतो. तो सुरू करावा, मात्र भविष्यातील डेव्हलपमेंटचा विचार न करता तो झाला आहे. तोच जिना व तिकीट घर शनी मंदिरच्या पाठीमागील जागेत करावा, अशी मागणी केली जात आहे.

**- राजा जाधव, अध्यक्ष रेल्वे प्रवासी संघटना**

## वृध्देला मारहाण करून ठार मारण्याची धमकी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**

वृध्द महिलेला मारहाण करून ठार मारण्याची धमकी देणाऱ्यां चौघांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शकिला अ. हाफिज शेख (वय ६८, रा. शिवाजी नगर, मोदीखाना, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन अजय कंपली, शारदा कंपली, यल्लूबाई कंपली, कुमार जंगडेकर (रा. जय शंकर तालीम, मोदी खाना, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. १३ जून रोजी सकाळी ९ च्या सुमारास शकिला शेख या घराच्या पर्किंगमध्ये पती व मुलीसमवेत गाडी काढत होत्या. त्यावेळी अजय कंपली याने शकिला शेख यांना येथे गाडी पार्क करायची नाही, येथे यायचे नाही असे म्हणून शिवीगाळ करून शकिला यांना मारहाण केली. तसेच गाडीस कट मारून शिवीगाळ करीत कुमार जंगडेकर यानेदेखील धमकी दिली. शकिला शेख यांच्या पतीस कट मारून शिवीगाळ करून तुझ्यासह सर्वांना जीव मारतो, तुझ्या घराला आग लावतो, मुलींना शिवीगाळ करीत ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक संजीवनी व्हट्टे पुढील तपास करीत आहेत.

# शहरातील शाळांची उद्या वाजणार घंटा

▶▶ शाळेची झाली स्वच्छता; विद्यार्थ्यांचे होणार स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

सोलापूर शहरातील सरकारी आणि खासगी अनुदानित शाळांची घंटा उद्या सोमवार (दि.१६) जून रोजी सकाळी वाजणार आहे. उन्हाळच्या सुट्ट्या संपल्यानंतर सोमवार हा शाळेचा पहिला दिवस असणार आहे. वार्षिक परीक्षा संपल्यानंतर गेल्या दीड महिन्यापासून सुट्ट्यामुळे शाळा बंद होत्या. आता शाळा पूर्वव्रत सुरू होणार आहेत. त्या अनुषंगाने शाळेतील वर्गखोल्यांची व शाळा परिसराची स्वच्छता व साफसफाई करण्यात आली. शाळेतील कचरा घंटागाडीत टाकण्यात आला.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापकांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बोलावून घेत, कार्यक्रमाची पूर्वतयारी केल्याचे चित्र यावेळी दिसून आले. दरम्यान, सोलापूर शहरातील सरकारी जिल्हा परिषद, मनपा आणि खाजगी अनुदानित अशा विविध शाळांमध्ये हा प्रवेशोत्सव करण्यात येणार आहे. शाळेत नवीन प्रवेश घेतलेल्या विविध वयोगटाच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी आनंददायी व प्रसन्नमय वातावरणात प्रवेशोत्सव आणि गुलाब पुष्प देऊन औक्षण करत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. त्यानुसार आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी संबंधित शाळा समितीच्या वतीने विविध जय्यत तयारी करण्यात आली आहे. त्याच अनुषंगाने शहरातील महापालिका शाळांमध्ये आज स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. याअंतर्गत कर्मचाऱ्यांनी शाळेतील कचऱ्याचे ढीग घंटागाडीत टाकल्याचे दिसून आले.




**सोलापूर : सोमवारपासून शाळा सुरू होत असल्याने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी शाळेची स्वच्छता करताना छायाचित्र केवल तिवारी यांनी टिपले आहे.**

# शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालयात १२ लाखांचा अपहार

### १६ वर्षानंतर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

सोलापूर शहरातील शेट गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालयात संस्थेचे सचिव आणि आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्यांनी जवळपास १२ लाख रुपयांची संस्थेची फसवणूक केली असल्याचे प्रकरण उघडकीस आली आहे. या प्रकरणी १६ वर्षांनंतर दाखल फिर्यादीनुसार फौजदार चावडी पोलीस ठाण्यात संस्थेचे सचिव व आयुर्वेद महाविद्यालयाच्या माजी प्राचार्याविरुध्द गुन्हा दाखल झाला.

याबाबत अरविंद रावजी दोशी (वय ८५, रा. सोनी कॉलेजसमोर, प्रताप नगर रोड, सोरेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दिपक शंकरराव आहेरकर (रा. पश्चिम मंगळवार पेठ) आणि प्रदीप सतीश नांदगावकर (रा. पन्नालाल नगर, अमरावती) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोलापुरातील सखाराम नेमचंद जैन औषधालय ट्रस्टचे मानद सचिव दिपक शंकरराव आहेरकर आणि शेठ गोवींदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य प्रदीप सतीश नांदगावकर यांनी संगनमताने संस्थेचे ठराव नसताना बनावट ठराव दस्त तयार करून तो दि रत्नाकर बँक, लि. या बँकेत खरा आहे म्हणून सादर करून मुदतपूर्व एफ डी मोडून त्यातील ३ लाख ९२ हजार ९३५ रूपये काढून घेतले. हा प्रकार २00५ ते २00९ दरम्यान गोवींदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालयात घडला. तसेच कर्जाची आवश्यकता नसताना ट्रस्टमधील विश्वस्तांना माहिती होऊ न देता रत्नाकर बँकेतील २४ लाख रूपयांची एफ. डी. वर तारण ठेऊन त्यावर ८ लाख रूपयांचं कर्ज काढले. आहेरकर व नांदगावकर यांनी मिळून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ११ लाख ९२ हजार ९३५ रूपये वापरून संस्थेची फसवणूक केली. हा प्रकार निदर्शनास आल्यावर अरविंद दोशी यांनी शुक्रवारी मध्यरात्री फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील या गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## ज्ञानामृत आनंदलहरी - ११४७

**मन शुध्द तया काय करिसी माळा ।**
**मंडित सकळा भूषणांसी ।।**

मन माणसाच्या ताब्यात असणे आणि माणूस मनाच्या ताब्यात असणे यांत फार मोठा फरक आहे. मनाला ताब्यात ठेवणारे खरे सुखी समाधानी असतात. जो माणूस मनाच्या ताब्यात असतो त्याच्याकडून चांगले घडणे कठीण असते. मन मानवाला सिथर राहू देत नाही. धावणारे मन इंद्रियांकडून नको ते करुन घेते. मनाधिन असलेला माणूस इंद्रियाधिनही होत असतो. मन आणि इंद्रिये त्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी माणसाला प्रवृत्त करतात. असे प्रवृत्त होणे म्हणजे स्वत:चे सर्वस्व हरण करणे होय. धावणाऱ्या मनाकडे शुध्दता असत नाही. कारण धांवणारे मन चांगल्याच गोष्टीकडे धांवते असे नाही. धावणारे मन विषयाच्या मागे धांवत असल्याने मानवाकडून होणारे वर्तन ईर्षा, द्वेष, मत्सराच्या निर्मितीला कारणीभूत ठरु शकते. आपल्या मनाला धावू देणारे, मनाच्या इच्छा पूर्ण करणारे लोक बाह्यदर्शनी कितीही आकर्षक, सुंदर दिसत असले तरीही मनाने सुंदर असतीलच असे नाही. म नाची सुंदरता, मनाची शुध्दता हीच खरीसंपत्ती आहे. बाह्यदर्शनी टिळा, माळा, गंध, पेहराव कितीही चांगल्याप्रकारे परिधान केले किंवा धारण केले व मन शुध्द नसेल तर बाह्य दिसणारे सर्व व्यर्थ असते. बाह्यसौंदर्यापेक्षा मनाचे सौंदर्य अत्यंत महत्वाचे आहे. मन शुध्द असणाऱ्याला माळ, टिळा, पेहराव नसले तरी चालतात. शुध्द मनाच्या माणसाला कोणत्याही भूषणाची, दाग-दागिण्यांची गरज नाही. मनाची शुध्दता हाच फार मोठा अलंकार व भूषण आहे. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात मन शुध्द तया काय करिसी माळा । मंडित सकळा भूषणांसी । हरिच्या गुणें गर्जताती सदा । आनंद तया मानसी ।।



मनाची शुध्दता मानवाचे जीवन शुध्द करु शकते. मनच शुध्द नसेल तर त्याच्याकडून होणाऱ्या वर्तनात कांही अंशी का असेना पण अशुध्दता असणार आहे. मन चंगा तो कटौती मे गंगा ।, मन नाही चांगा तर काय करील काशी गंगा ।। असे म्हटले जाते. यावरुन आपल्या लक्षात येते की, मनाच्या शुध्दतेवर बरेच कांही अवलंबून आहे. मन शुध्द असणाऱ्या संत सज्जनांच्या, हरि भक्तांच्या मुखातून हरीचे नामस्मरण सदैव चालू असते. यांना नामस्मरणातून निरंतर आनंद मिळत असतो. हरीचे नामस्मरण करण्याचे बंधन आपल्यावर संत महात्म्यांनी घातले नसले तरी मनाच्या शुध्दतेबद्दल त्यांनी आग्रह धरला आहे, हे आपण विसरु नये. प्रत्येक गोष्टीत, घटनेत व्यवहार पाहण्याची मानवाची वृत्ती मनाच्या अशुध्दतेला कारणीभूत ठरत असते. कोठेतरी, केंव्हातरी माणसाने व्यवहारापेक्षा मानवतेला, माणुसकीला जास्त महत्व द्यायला हवे. मानवतेतून माणुसकी नावाची शाश्वत संपत्ती जोपासली जात असतांनाही माणूस व्यवहारातून नाशवंत अशी धन संपत्तीच जमा करण्याच्या मागे लागतो. हे बुध्दीजीवी मानवाचे वैशिष्ट्य आहे. पैशाने प्रचंड श्रीमंत असणाऱ्यांची संख्या कांही कमी नाही. लाखो श्रीमंत जन्मले आणि मेले, पण त्यांच्या नांवाचा उल्लेखही कोणी करीत नाही. पण आर्थिक कमतरता असणारे पण मनाने प्रचंड श्रीमंत असणारे ज्ञानोबा, तुकाराम, चोखोबा, समर्थ आदी संत सदैव आठवतात. त्यांच्या मनाची शुध्दता अशा आठवणीला कारणीभूत आहे. स्वत:च्या समाधानासाठी जरी आपण आपल्या मनाची शुध्दता केली तरी पुरेसे होईल, असे वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - चांगला दिवस, फादर्स डे |
| दि. १५ जून २०२५ | यादवराव महाराज पुण्यतिथी |
| विक्रम संवत् २०८१ | ....राहू काल.... |
| शके - १९४७ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| संवत्सर - विश्वावसु | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| मास - ज्येष्ठ | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| कृ. चतुर्थी (१५.५१) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - ग्रीष्म | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र - श्रवण (२४.५९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - ऐंद्र (१२.१८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| करण - कौलव (२७.४४) | |

### राशीभविष्य

**मेष :** सामाजिक कार्यांमुळे सुयश आणि सन्मान मिळू शकेल. मित्रांच्या सहकार्याने कामे पूर्ण होतील.उद्योगधंदा चांगला चालेल.वैवाहिक जीवनात भावनात्मक समस्या राहू शकतात.

**वृषभ :** कामकाजाची गती मध्यम राहील.लहान:मोठया अडचणींचा सामना करावा लागेल. थकित पैसे मिळण्यास अडथळे येतील. थकवा जाणवेल.पूजा:पाठात मन रमेल.

**मिथुन :** नवीन कामकाजांचे योग प्रबळ आहेत.कौटूंबिक समस्या राहू शकतात. आर्थिक परिस्थितीत सुधार होण्याची शक्यता आहे.व्यवसायात प्रगती होईल. प्रवास सुखात होईल.

**कर्क:** बुद्धि आणि मनोबलाने सुख:संपन्नतेची परिस्थिती बनेल. आळस सोडून द्या. कायदेशीर प्रकरणे सुधारतील.उद्योगधंदा फायदेशीर राहिल.

**सिंह :** काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. आपली म हत्वकांक्षा पूर्ण होईल.

**कन्या:** कौटूंबिक सुख आणि आर्थिक अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहिल.

**तुळ :** अगोदर केलेल्या काम ाचा चांगला परिणाम दिसण्यास सुरूवात होईल. बुद्धीमत्तेवर अडचणींवर मात कराल. नोकरीमध्ये अधिकाऱ्यांची मदत मिळेल.

**वृश्चिक:** व्यापाराच्या विस्तारासाठी केलेले प्रयत्न यशस्वी होतील. आर्थिक स्थिती चांगली राहील. धैर्य व सहनशिलता ठेवा. कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

**धनु:** यश मिळाल्याने उत्साह वाढेल. श्रेष्ठ लोकांच्या भेटी होतील. नवीन योजनेमुळे फायदा होईल.

**मकर:** मानसिक तनावापासून सुटका मिळेल.उद्योगधंदा ठीक चालेल.योजनेनूसार कामे केल्यास लाभ होऊ शकेल.

**कुंभ :** कौटूंबिक वातावरण उत्साहपूर्वक राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. आर्थिक योग चांगले आहेत.

**मीन :** मुलांच्या कामा संदर्भात चांगली बातमी मिळेल. चैनीच्या वस्तु खरेदी करण्याचा योग आहे.

# ३०० पेक्षा जास्त गोवंशांना जीवनदान

## ▸ ९ गोमास तस्कर वाहनांवर कारवाई; ▸ शहर-ग्रामीण पोलिसांची गोरक्षकांना मदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

बजरंग दलाच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यात ३०० पेक्षा जास्त गाई, बैल व वासरांना कत्तलीपासून वाचविण्यात बजरंगी गोरक्षकांना यश आले आहे. ग्रामीण भागातून होणारी गोवंशाची तस्करी रोखण्याकरिता पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व उप अधीक्षक प्रीतम यावलकर यांची मदत लाभल्याचे बजरंग दल जिल्हा गोरक्षा प्रमुख प्रशांत परदेशी यांनी सांगितले.

तसेच शहरी भागात घरोघरी कुर्बानीसाठी देशी गाय व बैल बंदिस्त रूममध्ये बाथरूम मध्ये ठेवलेले असताना शहर पोलिसांच्या मदतीने ते गोवंश सुखरूप रित्या ताब्यात घेऊन गोशाळेत सोडण्यात आले. या कामासाठी सोलापूर शहर पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांची मोलाची सहकार्य लाभल्याचे मत व्यक्त करण्यात आले. यादरम्यान काही लोक गायी व बैलांची तस्करी करण्याकरिता मदत करत असल्याचेही उघडकीस आले. मागील महिनाभरापासून बजरंग दलातील गोरक्षक गोरक्षण कार्य करत असताना दिवस रात्र जागून तब्बल ३०० पेक्षा जास्त गोवंशांना कत्तलीपासून वाचविण्यात आलेले आहे. बजरंग दल सोलापुरातील गोरक्षकांनी केवळ सोलापूर जिल्ह्यात कार्य न करता धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजी नगर, बीड, नांदेड पर्यंत कारवाई केलेली आहे. महानगरपालिकेमार्फत एक नवीन पथक तयार करून रात्री सुद्धा मोठ्या घोळक्याने रस्त्यावर बसलेले गोवंश ताब्यात घेण्यात यावे.




रस्त्यावर फिरत असलेले ८० टक्के गोवंश हे कसायांनी रस्त्यावर सोडलेली आहेत तर १० टक्के गोवंश हिंदू व्यक्तीनी रस्त्यावर सोडलेले आहेत. यातील बहुतांश गोवंश महानगरपालिकेने ताब्यात घेतल्यास रस्त्यावर कुठेही मोकाट गोवंश दिसणार नाही, अशी मागणी बजरंग दल जिल्हा सुरक्षा प्रमुख शितल परदेशी यांनी व्यक्त केली.

कायदा कडक नसल्याने गोतस्कर हे पाऊल उचलत आहेत व कायदा पायदळी तुडवत आहेत. असे मत बजरंग दल जिल्हा सह गोरक्षा प्रमुख पवन कुमार कोमटी यांनी व्यक्त केले. कारवायासाठी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी उपअधीक्षक प्रीतम यावलकर, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, मानद पशु कल्याण अधिकारी महेश भंडारी तसेच सोलापूर शहर ग्रामीण पोलीस स्टेशन अधिकारी व कर्मचाऱ्यांची मदत मिळाली. कारवाई यशस्वी करण्याकरिता बजरंग दल जिल्हा सुरक्षा प्रमुख शितल परदेशी, बजरंग दल सोलापूर जिल्हा गोरक्षा प्रमुख प्रशांत परदेशी, बजरंग दल सोलापूर जिल्हा सह गोरक्षा प्रमुख पवनकुमार कोमटी, गोरक्षक पवन बल्ला अनिकेत गोरट्याल, राकेश बिज्जरगी, गणेश बिज्जरगी, वीरेश मंचाल, विवेक वंगारी, कुमार आंबट, शुभम फलमारी, आदी गोरक्षकांनी सदर कारवाया यशस्वी करण्याकरिता अथक परिश्रम घेतले.



# सोलापूर विद्यापीठाचा भाभा अणुसंशोधन केंद्राशी करार

### २०० हून अधिक विद्यार्थ्यांना होणार फायदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने केंद्र सरकारच्या मुंबई येथील भाभा अणुसंशोधन केंद्राच्या आकृती केंद्राशी सामंजस्य करार केला असून यामुळे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना भाभा अणुसंशोधन केंद्राने विकसित केलेल्या दोनशेहून अधिक तंत्रज्ञानाचा लाभ घेता येणार आहे.

त्याचबरोबर येथील विद्यार्थ्यांना अणुसंशोधन केंद्रामध्ये प्रकल्प करण्याबरोबरच प्रशिक्षणही मिळणार आहे. या करारावर दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांच्या प्रमुख उपस्थितीत कराराचा कार्यक्रम पार पडला. यावेळी भाभा अणुसंशोधन केंद्राच्या वैज्ञानिक अधिकारी तथा आकृती ग्रुपच्या लीडर भारती भालेराव, विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, डॉ. अंजना लावंड आदी उपस्थित होते. अन्न, कृषी, पाणी, औषधे, अभियांत्रिकी आदी क्षेत्राशी संलग्न समाज उपयोगी २०० हून अधिक तंत्रज्ञान भाभा अनुसंशोधन केंद्राने विकसित केले आहेत. या विकसित तंत्रज्ञानाचा वापर व उपयोग आता विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना करता येणार आहे. या तंत्रज्ञानाचा अभ्यास देखील विद्यार्थ्यांना करता येणार आहे. पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना विविध प्रोजेक्ट, ट्रेनिंग तसेच व्यवसायासाठी परवानगी देखील भाभा अनुसंशोधन केंद्राकडून विद्यार्थ्यांना मिळणार आहे. या कराराचा विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होणार असल्याचे प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा सांगितले.

## शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचा आज अखेरचा दिवस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग यांच्या कार्यालयामार्फत अनुसूचित जाती या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व विद्या वेतन या योजनांचा लाभ देण्यात येतो. या सर्व शिष्यवृत्तींसाठी आज १५ जून अर्ज करण्याचा अखेरचा दिवस आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासनाच्यावतीने विविध योजना, शिष्यवृत्ती राबविण्यात येतात. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून त्यांचा लाभ मिळणार आहे. या योजनेच्या लाभापासून मागासवर्गीय विद्यार्थी वंचित राहणार नाही याची सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी नोंद घ्यावी. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सरकारी शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी केले.

## देशी गाय अनुदान प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१४ जून-**

पशुसंवर्धन विभागाच्या दि. ८ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयामध्ये नमुद केल्याप्रमाणे गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालन पोषणासाठी रु.५०/- प्रति दिन, प्रति देशी गाय अनुदान योजनेकरीता महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत व सदर शासन निर्णयाम धील नमुद निकषानुसार पात्र गोशाळा, गोसदन पांजरापोळ व गोरक्षण संस्थांनी ऑनलाईन अर्ज करणेची मुदत दि. ३० जून पर्यंत वाढविण्यात येत आहे.

योजनेचा उद्देश व स्वरुप, अनुदान पात्रतेच्या अटी व शर्ती, योजनेची अंमलबजावणी, तसेच योजनेचा ऑनलाईन अर्ज व त्यासोबत जोडावयाची अनुषंगिक कागदपत्रे इत्यादी बाबतची सविस्तर माहिती www.mahagosevaayog.org d https//schemes.mahagosevaayog.org या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र गोसेवा आयोग कार्यालयाकडे थेट प्रस्ताव सादर केलेला तसेच ई-मेल किंवा तत्सम द्वारे सादर केलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत. असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, डॉ. विशाल येवले यांनी केले आहे.



# प्रभाग क्रमांक २२ परिसरात रस्ता काँक्रिटीकरण कामाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जून-**

सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विशेष सहकार्यातून माजी नगरसेवक किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत १८ लाख २८ हजार रुपये खर्चित येथे यतिमखाना परिसरात रस्ता काँक्रिटकरण कामाचे उद्घाटन करण्यात आले.

दरम्यान, यतिम खाना परिसरात बऱ्याच दिवसापासून रखडलेल्या रस्त्याच्या कामाला मूर्त स्वरूप प्राप्त झाले. येथील रहिवाशांच्या मागणीनुसार रस्ता कामाची सुरुवात करण्यात आली. विकास कामांमध्ये गुणवत्ता हा सर्वोच्च निकष असावा, ठेकेदारांनी कोणतेही तडजोड न करता वेळेत आणि दर्जेदार काम पूर्ण करावे असा, सल्लाही यावेळी किसन जाधव यांनी ठेकेदारांना दिला.

याप्रसंगी एजाज शेख, महबूब पठाण, इरफान शेख, बिलाल शेख, जुबेर शेख, जम ीर शेख,मोहीम शेख, कुरेशी, निराशा शेख, मीराशाब शेख, उमर शेख, जब्बार शेख,, सय्यद चाचा, सद्दाम शेख, केशर मणियार, शामला जाधव,अन्नपूर्णा जाधव, शहजाद शेख,मालानबी शेख, बिलाल शेख, रियाज शेख, सलीम शेख, महादेव राठोड,वसंत कांबळे,फिरोज पठाण, आनंद गाडेकर, सुहास जाधव आदींच्या उपस्थितीत या रस्ता कामाचे विधिवत पूजन करण्यात आले.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून रुग्णांना १३ लाखांची मदत

▸▸ **आ. सुभाष देशमुखांचा पाठपुरावा**

▸▸ **रूग्णांच्या सोयीसाठी स्वतंत्र यंत्रणेची केली उभी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

आमदार सुभाष देशमुख यांनी केलेल्या पाठपुराव्याने मे महिन्यात १३ जणांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून तत्काळ अर्थसाहाय्य मिळवून दिले आहे. १२ लाख ८५ हजारांची मदत देऊन या १३ कुटुंबाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू आणण्याचे मोलाचे सामाजिक काम आ. देशमुख यांनी केले आहे.

मे महिन्यात आ. देशमुख यांनी १३ रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून तत्काळ अर्थसाहाय्य मिळवून दिले आहे.

गरीब रुग्णांना वैद्यकीय सेवासुविधा मिळाव्यात यासाठी आ. देशमुख यांनी आपली विशेष यंत्रणा उभारली आहे.रूग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळवण्यासाठी आवश्यक कागदपत्रे मिळवून त्याचा प्रस्ताव पाठवावा लागतो. आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही यंत्रणा ते काम योग्य पद्धतीने पार पाडत आहे.

### यांना केले अर्थसाहाय्य

मे महिन्यात आमदार देशमुख यांच्या प्रयत्नांमधून राजेंद्र गंगाधर तारापुरकर, गजानन मारुती कुंभार, वत्सलाबाई पुंडलिक मोरे, राजश्री दत्तात्रय झिंबल, कमलाबाई शाम नरोटे, बालाजी सिद्राम यलगुंडे, अफरोज जाकीर मुल्ला, चैत्राली अमर कानडे, शिवन्या प्रदीप गायकवाड, दत्तात्रय भगवान जाधव, शिवाजी नागप्पा तुरबे, तानाजी लोहार, स्वाती लगदिवे या रुग्णांना ५० हजार पासून ते २ लाखांपर्यंतची आर्थिक मदत मिळवून दिली आहे. या सर्व रुग्णांनी आमदार देशमुख यांचे आभार मानले.

## किर्लोस्कर कारखान्याजवळ तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. १४ जून-**

होटगी रस्त्यावरील किर्लोस्कर कारखान्याजवळ शुक्रवारी रात्री आठ वाजता दक्षिण सोलापूर तालुक्यातील आहेरवाडी येथील तरुणास अज्ञात कारणातून मारहाण केली. बसवराज चिंगु रामपुरे (वय ३५) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. शुक्रवारी रात्री आठच्या सुमारास बसवराज हा होटगी रस्त्यावरून जात होता. किर्लोस्कर कारखान्याजवळून जात होता. त्यावेळी तेथील चार ते पाच जणाच्या जमावाने त्याला लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री दोन वाजता मित्रा भिमा धोत्रे याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## सराईत गुन्हेगाराकडून लॉज चालकावर चाकूने हल्ला

**सोलापूर, दि. १४ जून-**

लॉजमधील रूम देण्याच्या कारणावरून सराईत गुन्हेगाराने लॉज चालकाला चाकूने मारून जखमी केले.याबाबत विनायक प्रभाकर बोगा (वय ३०, रा. गोदूताई परूळेकर नगर, विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन भैय्या उर्फ संदीप लक्ष्मण पाटील (वय ३५, रा. पत्रा तालीम, सोलापूर) याच्याविरुध्द सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ जून रोजी सकाळी सातच्या सुमारास विनायक बोगा याने भाड्याने चालविण्यास घेतलेल्या बार्शी रोडवरील भोगाव येथील सुस्वर लॉज येथे अमर मधुकर व कामगार आदित्य माने हे काम करीत होते. त्यावेळी आदित्य माने याने बोगा याच्या मोबाईलवर फोन करून भैय्या पाटील हा लॉजमध्ये येऊन रूम मागत असून तो त्याच्याशी वाद घालत आहे असे सांगितले. त्यामुळे बोगा व त्याचा मित्र ओम वंगा हे दोघे एमएच १४ एसी ७८६३ या कारमधून सुस्वर लॉज येथे आले. त्याठिकाणी रूम देण्याच्या कारणावरून भैय्या पाटील याने बोगा यास शिवीगाळ करून दमदाटी करीत असताना त्याने त्याच्या खिशातून चाकू काढला. त्यावेळी चाकू धरलेला हात बोगा याने पकडला, त्यामुळे दोघांमध्ये झटापट झाली. त्यामध्ये भैय्या पाटील याने बोगा याच्या गुडघा, हाताच्या बोटांना, पाठीवर चाकूने मारून दुखापत केली. या दोघांच्या झटापटीत भैय्या पाटील याच्या पोटात चाकू लागल्यामुळे त्याच्या पोटातून रक्त येऊ लागल्यामुळे बोगा हा त्याठिकाणाहून पळून गेला. अशी नोंद सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक कदम पुढील तपास करीत आहेत.



## ठोकळ महाविद्यालयात अकरावीसाठी व्यवस्थापन व संस्था कोट्यांतर्गत प्रवेशास प्रारंभ

**सोलापूर, दि. १४ जून-**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता ११ वी प्रवेश प्रक्रियेसाठी शासनाने यावर्षीपासून केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने नोंदणीद्वारे प्रवेश होणार असल्याचे जाहीर केले. ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता प्रत्यक्ष प्रवेश देण्यास सुरुवात झाली आहे. शिक्षण विभागाने ११ जून रोजी अंतिम सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली असून व्यवस्थापन व संस्था अंतर्गत कोट्यातून प्रवेश सुरु केले आहे. या अंतर्गत श्रीमती निर्मला ठोकळ कनिष्ठ महाविद्यालय येथे गुणवत्ता यादीनुसार व्यवस्थापन कोटा तसेच संस्थांतर्गत कोट्यातून दि. १२ जूनपासून प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाले. इन हाऊस कोट्यातून प्रशालेतील नमीरा शेख या विद्यार्थिनीने आपले पहिले प्रवेश घेतले. सदर विद्यार्थिनींचे निर्मलाताई ठोकळ, प्राचार्य दत्तात्रय गाजरे यांच्या उपस्थितीत व डॉ. शिवानंद भांजे यांच्या हस्ते ॲडमिशन लेटर, पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. या निमित्ताने संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती निर्मला ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष ॲड. विपीन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ यांनी प्राचार्य डी. डी. गाजरे यांनी अकरावीसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.



## 'त्या' ११ कामगारांना कामावर रुजू करून घेण्याचे आयुक्तांचे आदेश

**सोलापूर, दि. १४ जून-**

सेवा समाप्तीची कारवाई केलेल्या त्या ११ बदली, रोजंदारी कामगारांना दंड आकारून कामावर रुजू करून घेण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे त्यांनी प्रयत्न केले होते. त्याला यश आले. दि. १ मे रोजी पालिका आवारात ध्वजारोहण कार्यक्रमाप्रसंगी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या भाषणावेळी कायम करण्याच्या अनुषंगाने या ११ कर्मचाऱ्यांनी घोषणा दिल्या होत्या. त्या कार्यक्रमामध्ये अडथळा निर्माण झाला. ही बाब अंत्यत गंभीर, कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारी आहे. त्यांच्या या गैरवर्तनामुळे जनमाणसात मनपाची प्रतिमा मलिन झाली असून, राष्ट्रीय कार्यक्रमास बाधा पोहोचविली. त्यास सर्वस्वी ११ कर्मचारी जबाबदार असल्याने त्यांना शिक्षा होणे आवश्यक आहे. याप्रकरणी या ११ जणांवर सेवा समाप्तीची कारवाई केली होती.



## 'सूर्याची सावली' या काव्यसंग्रहास दुनघव स्मृती काव्य गौरव पुरस्कार

**सोलापूर, दि. १४ जून-**

नवी मुंबई ऐरोली येथील कवयित्री रुपाली शिंगे- गायकवाड यांच्या 'सूर्याची सावली 'या काव्यसंग्रहास देविदास दशरथ दुनघव स्मृती काव्य गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणे येथे वैशाख वादळ वारा काव्य महोत्सव २०२५ ग्रामीण कवी चंद्रकांत मोतीराम जोगदंड आयोजित खुले कवी संमेलन व पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथील एस.एम जोशी फाऊडेशन सभागृह नवी पेठ येथे आयोजित करण्यात आला होता. सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस व ग्रामीण साहित्यिक बबन पोतदार यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे प्रा. हनुमंत धालगडे, व्यंकटराव वाघमोडे आणि काव्यसंमेलनाचे अध्यक्ष डॉ. शैलेंद्र भणगे उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



### भंडारकवठे ग्रा. पं. तर्फे सेवानिवृत्त व पदोन्नती मिळालेल्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १४ जून-**

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व निवृत्तीपर्यंत सेवा बजावलेल्या लोकांचे ग्रामपंचायतकडून सत्कार करण्यात आला आहे. हे सत्कारमूर्ती भंडारकवठेचे भूषण आहेत, असे प्रतिपादन भंडारकवठेचे सरपंच भीमाशंकर बबलेश्वर यांनी केला. ते भंडारकवठे येथे आयोजित सत्कार समारंभ कार्यक्रमात बोलत होते. यावेळी भंडारकवठे येथील सेवा निवृत्त झालेल्या व पदोन्नती मिळालेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पतीसाठी किडनी देणाऱ्या भाग्यश्री तुंरबे व बहिणीसाठी किडनी देऊन जीवदान देणाऱ्या सुप्रिया कमळे या भगिनींचा विशेष सत्कार करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त झालेले मधू बिराजदार, शांतप्पा कांबळे, कलप्पा बगले, बसवराज बनपूरे, नितीन कुलकर्णी, सुरेश बबलेश्वर, लकण्णा कमळे, आमसिद्ध बिराजदार , महादेव तेलगाव, मिनाक्षी  बबलेश्वर, राजशेखर कमळे, ग्रामसेवक म्हाळप्पा गाडेकर, सुमन कोळी, द्रौपदी सगर, लोकमंगलचे सरव्यवस्थापक दिपक नलावडे, आमसिद्ध कमळे,  सोमनिंग मोटे, कांतेश गुमतापूरे, मुन्ना तडवळकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपाचे जिल्हा चिटणिस यतीन शहा, अशोक मुकाणे, गोपाल जंगलगी, हणमंत पुजारी, श्रीमंत कुंभार, बसवराज मुकाणे, उपसरपंच सरीता तुरबे, राजकुमार बिजरगी, महादेव बगले, निंगप्पा कुपसंगे, सोमनिंग कमळे, संगपा बिराजदार, गुरबाळा तावसे, शिवानंद माढे, निलेश नंदरगी, महादेव लायणे, धरेप्पा तेली, सोमनिंग विरदे आदी उपस्थित होते.

### मंगळवेढा वीजवितरण उपविभाग कार्यकारी अभियंतापदी संतोष मरळे

**मंगळवेढा दि.१४ जून -**

मंगळवेढा येथील वीज वितरणचे कार्यकारी अभियंता महेश शिपुरे यांची सांगली येथे केवळ सात महिन्यात बदली झाली असून त्यांच्या जागी संतोष मरळे यांची नियुक्ती झली आहे. त्यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्विकारला. येथील अतिरिक्त कार्यभार पंढरपूर विभागातील सहाय्यक अभियंता संदीप माळी यांच्याकडे तात्पुरत्या स्वरुपात दिला होता. संतोष मरळे यांनी कोल्हापूर झोनमध्ये उपकार्यकारी अभियंता म्हणून काम केले आहे. यावेळी श्री. मरळे यांनी तालुक्यातील वीज ग्राहकांना अखंडित व सुरळीत वीजपुरवठा देवून विजवसूली चांगल्या पद्धतीने करून सोईसुविधा देण्यास प्राधान्य राहील असे प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.  यावेळी सांगोलाचे उपकार्यकारी अभियंता गणेश पोवार, मंगळवेढा ग्रामीणचे सहायक अभियंता प्रशांत गायकवाड,अमर कांबळे,दत्ता आसबे,उल्हास पाटील,उदय पाटील,विजय मासाळ,प्रशांत गडकर आदी उपस्थित होते. वीज वितरणच्या शहरी व ग्रामीण भागात पाच कनिष्ठ अभियंता, लाईनमनची पदे कमी असल्यामुळे नागरिकांना सेवा देण्यासाठी कसरत करावी लागत आहे. ही पदे तात्काळ भरल्यास अखंडीतपणे वीज सेवा देण्यात येईल असे सांगण्यात आले. बारामती विभागाचे अधिकारी यांनी तात्काळ लक्ष घालून मंगळवेढ्यातील रिक्त पदे भरावीत अशी मागणी जोर धरत आहे.

### मंत्री आबीटकर यांची दिपकआबा साळुंखे-पाटील यांच्या कार्यालयास भेट

**सांगोला, दि. १४ जून-**

महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांनी शुक्रवार दि.१३ जून रोजी दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या सांगोला येथील कार्यालयास भेट दिली. यावेळी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी तालुक्यातील आरोग्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधत विविध प्रश्न सोडवण्याची मागणी केली. यावेळी माजी आमदार शहाजीबापू पाटील उपस्थित होते. सांगोला शहरात कोट्यावधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या ट्रॉमा केअर सेंटरमध्ये आवश्यक अधिकारी कर्मचाऱ्यांची भरती करून लवकरात लवकर हे ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात यावे, सांगोला ग्रामीण रुग्णालयास १०० बेड उपलबध करून उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात यावा, तालुक्यातील हलदहिवडी आणि खिलारवाडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती बांधून तयार आहेत तरी या ठिकाणी आवश्यक अधिकारी कर्मचारी यांची पदभरती करून आरोग्य सेवा सुरू करावी, जवळा येथे ग्रामीण रुग्णालय सुरू करावे, महूद येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे नव्याने बांधकाम करावे अशा मागण्या यावेळी दिपकआबा साळुंखे पाटील यांनी ना.प्रकाश आबीटकर यांच्याकडे केल्या. यावेळी मंत्री आबीटकर यांनी या मागण्याला सकारात्मक प्रतिसाद देत लवकरात लवकर सर्व मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी शिवाजी बनकर, अनिल खडतरे, भाऊसो यमगर, सुनील पाटील, डॉ.पियूष साळुंखे पाटील, ड. यशराजे साळुंखे, अनिल खटकाळे, मनोज उकळे, सचिन लोखंडे, आलमगीर मुल्ला, सचिन पाटणे, विनोद रणदिवे, दिलीप मोटे, रवी चौगुले, संतोष खडतरे, तौफिक मुजावर, अजित गोडसे, खंडू पाटील उपस्थित होते.



### निलज येथे संघर्ष समितीची बैठक

**करमाळा, दि. १४ जून-**

करमाळा तालुक्यातील निलज येथे रिटेवाडी उपसा सिंचन संघर्ष समितीची बैठक संपन्न झाली. गावा-गावात जाऊन जनजागृती करून आपणास हक्काचे पाणी कसे मिळेल याबाबत रिटेवाडी संघर्ष समितीचे अभ्यासक सरपंच अंकुश शिंदे यांनी मार्गदर्शन केले. रिटेवाडी उपसा सिंचन योजने संदर्भात सविस्तर आढावा आणि मार्गदर्शन पोथरेचे सरपंच अंकुश शिंदे, पिंपळवाडीचे सरपंच मदन पाटील, वंजारवाडीचे सरपंच प्रवीण बिनवडे, बाळासाहेब टकले यांनी केले. प्रास्ताविक अंगद देवकते यांनी केले तर पत्रकार राजेश गायकवाड यांनी आभार मानले. हा लढा यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थांनी आश्वासन दिले. रिटेवाडी उपसा सिंचन योजना मार्गी लावण्यासाठी त्या अंतर्गत येणाऱ्या सर्व गावा-गावात जाऊन संघर्ष समिती जनजागृती करणार असल्याची माहिती संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आली.

# डॉ. हिरेमठ हॉस्पिटलचे नव्या दिमाखात आज उद्घाटन

### बार्शीकरांसाठी पुन्हा रुग्णसेवेत सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, १४ जून -**

बार्शी शहरातील एकेकाळी वैभवशाली आणि पंचक्रोशीत ख्यातनाम असलेले डॉ. हिरेमठ को-ऑपरेटीव्ह हॉस्पिटल आता नव्या रुपात, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा एकदा रुग्णसेवेसाठी सज्ज झाले आहे. वर्तमान हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेडच्या अंतर्गत या हॉस्पिटलचा भव्य शुभारंभ रविवार, दि. १५ जून रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या सोहळ्याचे उद्घाटन प्रसिद्ध मूत्ररोगतज्ज्ञ डॉ. भालचंद्र कश्यपी यांच्या हस्ते होणार असून आमदार अॅड. दिलीप सोपल हे अध्यक्षस्थानी असतील. यावेळी हभप जयवंत बोधले महाराज आणि संस्थापक अध्यक्ष डिजीटल मीडिया संपादक पत्रकार संघटना राजा माने यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

१९९० च्या दशकात डॉ. ए. जी. हिरेमठ आणि ड. गंगाधर सोपल यांनी या हॉस्पिटलची स्थापना केली होती. त्यांना डॉ. जी. बी. हिरेमठ, डॉ. बी. एम. नेने आणि डॉ. सुमंगला देशपांडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या काळात हॉस्पिटलने आपल्या उत्कृष्ट सेवांमुळे बार्शी आणि परिसरातील रुग्णांचे श्रद्धास्थान बनले होते. मात्र, कालांतराने काही कारणांमुळे हॉस्पिटल मागे पडले. आता वर्तमान हेल्थकेअर प्रा. लि.च्या माध्यमातून हॉस्पिटल पुन्हा नव्या जोमाने उभे राहत आहे.

#### वर्तमान हेल्थकेअर प्रा. लि.चा पुढाकार

डॉ. निनाद माढेकर, डॉ. स्नेहल माढेकर, डॉ. मयुरी पाटील, डॉ. मिलिंद पाटील, डॉ. कैवल्य गायकवाड, डॉ. गौरी गायकवाड आणि श्री. अमित इंगोले यांच्या नेतृत्वाखाली वर्तमान हेल्थकेअर प्रा. लि.ने हॉस्पिटलच्या पुनरुज्जनासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. स्थानिक मित्रमंडळी आणि सहकाऱ्यांचा मोठा पाठिंबा या प्रकल्पाला मिळाला आहे. डॉ. हिरेमठ हॉस्पिटलच्या या नव्या स्वरुपामुळे बार्शी आणि परिसरातील नागरिकांना आधुनिक आणि सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहेत. हॉस्पिटलच्या या पुनरागमनाने पुन्हा एकदा रुग्णांच्या मनात विश्वास आणि आशा निर्माण होईल, अशी अपेक्षा आहे.

#### नव्या सुविधांची आणि तज्ज्ञ डॉक्टरांची फौज

वर्तमान हेल्थकेअर प्रा. लि.च्या संचालक मंडळाने हॉस्पिटलला आधुनिक सुविधांनी सुसज्ज केले आहे. यामध्ये प्रशस्त आयसीयू, सीसीयू, इमर्जन्सी डिपार्टमेंट, अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, स्पेशल रुम्स, जनरल वॉर्ड, सूट, भव्य वेटिंग हॉल, डॉर्मेट्री, कॅफेटेरिया, गार्डन एरिया, स्वतंत्र ओपीडी, सुसज्ज लेबर रुम आणि नवजात शिशु कक्ष (एनआयसीयू) यांचा समावेश आहे. हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीममध्ये डॉ. स्नेहल माढेकर (मेडिसीन), डॉ. कैवल्य गायकवाड (सर्जरी), डॉ. गौरी गायकवाड (स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र), डॉ. अमोल शिंदे (बालरोग), डॉ. निनाद माढेकर (अस्थिरोग), डॉ. इरशाद तांबोळी (कान-नाक-घसा), डॉ. मोहन महाजन (नेत्ररोग), डॉ. चैतन्य देशपांडे (फिजिओथेरपी), डॉ. सारंग सोमाणी (दंतरोग), डॉ. स्नेहा सोलंकी (रेडिओलॉजी), डॉ. मिलिंद पाटील आणि डॉ. मयुरी पाटील (पाथोलॉजी), डॉ. विकास खामकर (हृदयरोग), आणि डॉ. सचिन बोटे (किडनी शस्त्रक्रिया) यांचा समावेश आहे. याशिवाय डॉ. अनंत माने, डॉ. सुधीर बकरे, डॉ. धनंजय मांजरे, डॉ. प्रशांत मोहिरे, डॉ. मौलाना शेख, डॉ. समिता गरुडे आणि डॉ. ओंकार रणशूर यांच्यासह अनेक तज्ज्ञ डॉक्टर्स आणि सहकारी यांचा पाठिंबा या उपक्रमाला आहे.

## प्रथमवर्ग न्यायालयाने दिलेला आदेश केला रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ जून -**

पोलीस कोठडीतील एका आरोपीस रिवाल्वरच्या सहाय्याने धमकावून काठीच्या सहाय्याने मारहाण करून छळ केल्याच्या कारणावरून दोन पोलीस अधिकाऱ्यांच्या विरुद्ध येथील प्रथमवर्ग न्यायालयाने आरोपी समन्स काढण्याबाबत व कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते. त्या प्रकरणी दाखल करण्यात आलेला रिव्हीजन अर्ज मान्य करून सत्र न्यायाधीश नंदीमठ यांनी प्रथमवर्ग न्यायालयाने दिलेला आदेश रद्द केला आहे.

या प्रकरणाची हकीगत अशी की एका गुन्ह्याच्या प्रकरणी महादेव वसंत खिलारे यांना पंढरपूर तालुका पोलिसांनी अटक केली होती. पोलीस कोठडीत असताना खिलारे यांना तत्कालीन पोलीस निरीक्षक किरण अवचर आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक आदिनाथ खरात यांनी रिवाल्वरच्या सहाय्याने धमकावले आणि काठीच्या सहाय्याने मारहाण केली अशी तक्रार खिलारे यांनी केली होती. त्याप्रकरणी पंढरपूर येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांनी दोन्ही पोलीस अधिकारी यांचे विरुद्ध कलम ३२४ , ५०६ सह ३४ भारतीय दंड विधान प्रमाणे आरोपी समन्स काढणे बाबत व कारवाई करणे बाबत आदेश केला होता. याप्रकरणी वरील दोन्ही पोलीस अधिकारी यांनी अॅड. एम.एम. काणे आणि अॅड. चंद्रशेखर पोरे यांचे मार्फत येथील सत्र न्यायालयात रिव्हीजन अर्ज दाखल करून आदेशास आव्हान दिले होते. सदर रिव्हीजन अर्जाची सत्र न्यायाधीश नंदीमठ यांच्या पुढे सुनावणी झाली. त्यांनी अॅड. एम.एम.काणे व अॅड.चंद्रशेखर पोरे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून सदर रिव्हीजन अर्ज मंजूर करून पंढरपूर येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांनी आरोपी समन्स काढणे बाबत केलेला आदेश रद्द करून रिव्हीजन अर्ज मंजूर केला. सदर रिव्हीजन अर्जाचे कामी अर्जदार यांचे तर्फे अॅड. एम.एम.काणे व अॅड. चंद्रशेखर पोरे यांनी कामकाज पाहिले.

## वृत्तपत्र विक्रेत्याचा मुलगा झाला वकील

### मेहनतीला मिळाले यश

**अकलूज -** येथील वृत्तपत्र विक्रेते महेश कुलकर्णी यांच्या मुलाने वकिलीच्या परीक्षेत उज्वल यश मिळवले. त्यामुळे आयष्य भराच्या मेहनतीला यश मिळाले असल्याची प्रतिक्रिया महेश कुलकर्णी यांनी व्यक्त केली.



वयाच्या १७ व्या वर्षापासून महेश कुलकर्णी हे अकलूज शहरातील चौकाम ध्ये बसून वृत्तपत्र विक्रीचा व्यवसाय करतात. वृत्तपत्र विक्रीतून मिळणाऱ्या तुटपुंज्या कमाईतून जिद्दीने त्यांनी आपल्या मुलीचे लग्न केले. बीसीएस चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मुलाने वकील होण्याची इच्छा व्यक्त केली. परिस्थिती प्रतिकूल असतानाही महेश व त्यांच्या कुटुंबीयांनी अपार कष्ट करून मुलाला वकील केले. त्यांच्या कष्टाला व जिद्दीला सगळीकडून कौतुकाची थाप मिळत आहे. श्रेयश कुलकर्णी हे वकील झाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## खराब रस्त्यामुळे घोळसगाव एसटी बंद

**अक्कलकोट, दि. १४ जून–**

रस्ता खराब झाल्याने गेल्या पंधरा दिवसांपासून घोळसगाव येथे येणारी एसटी महामंडळ बस सेवा बंद झाल्यामुळे नागरिकांचे तसेच विद्यार्थ्यांचे मोठे हाल होत आहेत. रस्ता त्वरीत दुरुस्त करून बस पूर्ववत चालू करावी अशी मागणी तंटामुक्त अध्यक्ष संजय होळे, सामाजिक कार्यकर्ते रामेश्वर पाटील यांनी केली आहे.

अक्कलकोट ते घोळसगाव देशमुख बोरगाव मार्गे येणाऱ्या सर्व एसटी बस देशमुख बोरगावला थांबत आहेत. घोळसगावला एसटी येणे बंद झाले आहे. तलावाच्या बांधाजवळील रस्ता जोरदार पावसामुळे पूर्ण खराब झाला आहे. रस्त्यावर दोन ते तीन फूट खोल खड्डे पडल्यामुळे बस सेवा बंद झाली आहे. त्यामुळे सर्व प्रवासी नागरिकांची, विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. सध्या मुलांचे कॉलेज चालू झाले आहे.

अकरावीची प्रवेश प्रक्रिया चालू झाले आहे. उत्पन्न, रहिवासी, जातीचा दाखला, वहया, पुस्तके, दप्तर, कपडेसाठी ग्रामस्थांची विद्यार्थ्यांची शहराकडे येणे जाणे अंत्यत गरजेचे झाले आहे. शेतकऱ्यांना बि बियाणे औजारेसाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. तहसील, पंचायत समिती, दवाखाना, विविध कामासाठी लोकांना जाण्यासाठी अत्यंत त्रास होत आहे. तरी प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन हा रस्ता त्वरीत दुरुस्त  करून बस सेवा सुरळीत करावी अशी मागणी संजय होळे यांनी केली आहे.

## शेतात काम करणाऱ्या तरुणाला सर्पदंश

### पाटकूल येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जून -**

शेतात काम करत असताना तरुणाला सर्पदंश झाला. ही घटना मोहोळ तालुक्यातील पाटकूल गावाच्या शिवारात शुक्रवारी दुपारी ३.१५ वाजता घडली. तरुणावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. ओम सतिश पवार (वय १८, रा. पाटकूल ता. मोहोळ) असे सर्पदंश झालेल्याचे नाव आहे. शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास ओम हा त्याच्या पाटकूल येथील शेतात गवत काढण्याचे काम करत होता. त्यावेळी त्याच्या डाव्या पायाला सापाने दंश केला. त्यानंतर चुलता महादेव पवार याने दुपारी ४.४५ वाजता सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## जिल्ह्यात ५७ हजार हेक्टरवर पेरणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

जिल्ह्यात खरीप पेरणीसाठी ३ लाख ३७ हजार ९६८ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर सरासरी पेरणी होत असते. दरम्यान, मे महिन्यात मुसळधार पाऊस झाल्याने वापशाअभावी जिल्ह्यात अवघ्या ५७ हजार ४७४ हेक्टर क्षेत्रावर १७ टक्केच पेरणी झाली आहे.

राज्याच्या कृषी विभागाने १५६ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रात खरीप पेरणी करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, त्यासाठी यावर्षी १९.१४ लाख क्विंटल बियाण्यांची आवश्यकता भासणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी बी-बियाणांची सांगड घातली आहे मात्र जमिनीतील ओलच हटत नसल्याने पेरण्यांना अडचण होत आहे. तरीही जिल्ह्यात आजतागायत उत्तर सोलापूर तालुक्या १६९३ हेक्टरवर खरिपाची पेरणी झाली असून, द. सोलापूर १७८५.६ हे., बार्शी १४ हजार ६४०.५ हे., अक्कलकोट ६०६२.५, मोहोळ १६७५, माढा १२००, करमाळा



#### उन्हाळी बागायती असलेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील द्राक्ष, केळी, डाळिंब, आंबा बागांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची आर्थिक गणितं बिघडली आहेत. या परिस्थितीत, शेतकऱ्यांना शासनाने मदतीचा हात देण्याची गरज जाणकार शेतकरी बोलून दाखवित आहेत.

१२१६५, पंढरपूर ४४५, सांगोला ११२३१, माळशिरस ३०३२, मंगळवेढा ३४४४ हे. वर पेरणी झाली तर जिल्ह्यात ५७ हजार ४७४ हेक्टरवर पेरणी झाली आहे.

दरम्यान, शासनाने पिक विमा योजनेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेत बदल करून शेतकऱ्यांसाठी सोयीस्कर आणि प्रभावी उपाययोजना करण्याचा सरकारचा उद्देश आहे.



## गुळवंचीत नूतन उपसरपंच तांबे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१४ जून-**

गुळवंची (ता.उत्तर सोलापूर) येथील उपसरपंचपदी जयश्री तांबे यांची अविरोध निवड झाल्याबद्दल हाजार समितीचे सभापती दिलीप माने यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सरपंच सुनील जाधव, शहाजी भोसले, सुनिल तांबे, अनिल तांबे, सागर तांबे, विजय सोलंकर, राहुल पांढरे, विक्रम जगताप, कृष्णा जाधव, स्वप्निल तांबे, सीमा तांबे आदी उपस्थित होते. आमचं गाव, आमचा विकास, स्मार्ट ग्राम पंचायत, राज्य अभियान संसद, आदर्शग्राम, तीर्थक्षेत्र विकास असे अनेक उपक्रमात लोकसहभाग महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र जीवनज्योती अभियान, प्रधानमंत्री,शबरी, मोदी आवास योजनाअंतर्गत गरजूंना घरकुलसह इतर योजना मिळवून देणे आवश्यक आहे. गावात विकास कामे करून सरपंच, उपसरपंच पदाची उंची वाढवा असे माने यांनी सांगितले.

# म्हेत्रेंचे तत्कालीन पाठीराखे काँग्रेसमध्येच

### पक्षाची धुरा सांभाळण्यास सरसावले

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि.१४ जून-**

पुढील काळातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला अच्छे दिन येणार आहेत. या काळात काँग्रेस पक्ष कोणाबरोबर सुद्धा युती न करता स्वतंत्रपणे निवडणूक लढविणार आहेत असे सांगून बळोरगी यांनी तालुक्यातील इतर पक्षातील मातब्बर नेते मंडळी लवकरच काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. असा गौप्यस्फोट केला.

माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे शिवसेना शिंदे गटात मोठ्या शक्ती प्रदर्शनाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व हजारो समर्थकांच्या उपस्थितीमध्ये प्रवेश केला. मात्र माजी मंत्री म्हेत्रे यांचे कट्टर पाठीराखेव नेत्यांनी शिंदे सेनेत प्रवेश केलेला नाही. याउलट म्हेत्रेंचा पक्ष प्रवेश सोहळा होताच कांग्रेसच्या नेत्यांनी काँग्रेस हीच कर्मभुमी असल्याचे सांगितले. अप्रत्यक्ष म्हेत्रे यांच्या पक्ष प्रवेशाबद्दल नाराजीचा सुर आळवला आहे. एकेकाळचे माजी मंत्री म्हेत्रे यांचे पाठीराखे आता काँग्रेसची धुरा सांभाळण्यास सरसावल्याचे चित्र आहे.

माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी विरोधकांच्या छातीत धडकी भरवणारे शक्ती प्रदर्शन केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व हजारो समर्थकांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात प्रवेश करीत काँग्रेसला जय महाराष्ट्र केला. या पक्षप्रवेश सोहळ्यानंतर काँग्रेस मधील म्हेत्रे यांचे खंबीर पाठीराख्यांनी पक्षप्रवेशाबद्दल भुमिका मांडली. काँग्रेसने म्हेत्रे कुटुंबीयांना भरपूर काही दिले आहे, मात्र ते आज पक्ष सोडत आहेत. आम्ही मात्र काँग्रेस सोडणार नाही. यापुढील काळात गाव, वाड्या, वस्त्या, तांड्यांपर्यंत पोहोचून काँग्रेस कार्यकर्त्यांना बळ देणार असल्याचे माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष अशपाक बळोरगी यांनी वागदरी रस्त्यावरील बळोर्गी फार्म हाऊस येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. पुढे बोलताना अशपाक बळवर्गी म्हणाले, काँग्रेसला १४० वर्षांची परंपरा आहे. काँग्रेसबरोबर गेल्या ४० वर्षापासून काम करतोय. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, कै सातलिंगप्पा म्हेत्रे, माजी आमदार कै. महादेवराव पाटील व सिद्धाराम म्हेत्रे यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली काम केले आहे. आजवर काँग्रेस पक्षाने मान, सन्मान, प्रतिष्ठा मिळवून दिली आहे हे विसरणे अशक्य आहे. त्यामुळे मी यापुढे सुद्धा काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता म्हणून काम करणार असल्याचे सागितले. काँग्रेस पक्षाला पुन्हा गतवैभव प्राप्त करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणार आहे असे यावेळी बळोरगी यांनी सांगितले.

**काँग्रेसमध्येच राहण्याचा निर्धार : मल्लिकार्जुन पाटील**

मी माझ्या कार्यकर्त्यांबरोबर आणि गावकरी बांधवाबरोबर चर्चा केली. स्वतः विचार करून काँग्रेस पक्षासोबत राहण्याचा निर्धार केल्याचे जि. प. कृषी आणि पशुसंवर्धन सभापती मल्लिकार्जुन पाटील यांनी स्पष्ट केले. दीडशे वर्षांपासून काँग्रेसची चळवळ गावागावात आणि घराघरात रुजलेली आहे. काँग्रेसचे अनेक नेते देशाच्या स्वातंत्र्यात जात आणि धर्म यांच्या पलीकडे जाऊन देशाची एकता आणि अखंडता टिकवलेली आहे. तोच विचार घेऊन मी आणि माझे समर्थक आणि मित्रपरिवार हे काँग्रेस पक्षातच राहण्याचा निर्धार असल्याचे पाटील यांनी सांगितले. सिद्धाराम म्हेत्रे यांचे खंदे समर्थक असलेले मल्लिकार्जुन पाटील हे त्यांच्यासोबत शिवसेनेत जातील असे अनेकांना वाटत होते पण तसे झाले नाही. उलट त्यांनी सर्व सहकारी, मित्रपरिवार आणि गावकरी यांना काँग्रेसमध्येच राहून तालुक्याचा विकास करत असताना आपण खंबीरपणे पाठीशी उभे राहावे असे आवाहन देखील केले.

एखादी व्यक्ती पक्षातून गेली म्हणून पक्ष संपत नाही, आम्ही नव्याने आणि जोमाने तालुक्यात कॉग्रेस पक्ष उभा करु असे प्रतिपादन माजी नगराध्यक्षा डॉ. सुवर्णा मलगोंडा यांनी पत्रकार परिषदेत केले. त्या म्हणाल्या, काँग्रेसने मला नगराध्यक्ष केले. महिला जिल्हाध्यक्षा केले. माझी आई श्रीमती पार्वती मलगोंडा यांना मंत्रिपद दिले. याची जाणीव आहे. राजकीय वारे फिरले म्हणून मी बदलणार नाही. कॉग्रेस पक्ष सोडणार नाही जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष अरुण जाधव म्हणाले, काँग्रेस पक्षाने अनेक वादळे पचवली आहेत. लोक येतात जातात .पक्ष संपत नाही. संपणार नाही. मी पक्षातच राहणार आहे. सर्व प्रथम मी भूमिका जाहीर केली होती. माझ्या भूमिकेचे स्वागत खासदार प्रणिती शिंदे यांनी केले असे सांगितले.

माजी मंत्री म्हेत्रे कॉग्रेस सोडताच त्यांचे एकेकाळचे खंबीर पाठीराखे पक्ष बळकट करण्याचा निर्धार करत आहेत. यात आगामी काळात कितपत यश येईल हे पहावे लागणार आहे.

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## काळमवाडीत मोफत आरोग्य तपासणी शिबीर



**पिलीव, दि.१४ जून-**

माळशिरस तालुक्यातील काळमवाडी येथे ग्रामपंचायतीच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न झाले. या शिबिरामध्ये डोळे तपासणी, मोफत पंचकर्म मार्गदर्शन, मोफत चष्म्याचे वाटप, अल्प दरात मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्याचे डॉ.रविकांत पाटील व नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. साक्षी पाटील यांनी सांगितले. आमदार उत्तमराव जानकर यांच्या मार्गदशनाखाली सरपंच भुजंगराव शिंगाडे यांच्या नेतृत्वाखाली व सर्व ग्रामपंचायत सदस्य, काळमवाडी ग्रामस्थ यांच्या विशेष सहकार्याने हे शिबीर घेण्यात आले. यावेळी उपसरपंच जगन्नाथ शिंदे, श्रीकांत आवताडे, तात्यासाहेब माने, राजेंद्र कोकरे, तानाजी यादव, अतुल आवताडे, किरण शिंदे, संभाजी आवताडे, रोहीत सुळ, बंडु शिंदे, बबन जानकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



## महत्वाचे...

### यंदाही वारकरी दिंड्यांना अनुदान देणार : आचार्य तुषार भोसले

**अकलूज, दि. १४ जून-**

राज्यातील दहा मानाच्या पालख्यांच्या सुमारे १,५०० दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपये प्रमाणे ३ कोटी रुपये अनुदान दिले जाणार असून वारकऱ्यांनी कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन भाजपा अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख आचार्य तुषार भोसले यांनी केले.



भोसले म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथी गृहात आषाढी वारी पालखी सोहळा नियोजनाची बैठक २८ मे रोजी पार पडली होती . या बैठकीत राज्यातील पालखी सोहळे, वारकरी दिंड्या व त्यांच्यासाठी शासनाने द्यावयाच्या सुविधा आदी विषयी चर्चा झाली. या बैठकीस शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ व राज्यातील सर्व वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, राज्यातील मानाच्या दहा पालखी सोहळ्याचे प्रमुख, संस्थानचे अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित होते. याच बैठकीत गतवर्षीप्रमाणे शासनाने सर्व वारकऱ्यांना मोफत रेनकोट उपलब्ध करुन द्यावेत, पालखी मार्ग व ज्या गावात पालखी मुक्कामी राहणार आहे त्या ठिकाणी मांस विक्री करु नये आदी मागण्या करण्यात आल्या होत्या . या सर्व मागण्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केल्या असून लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी शासनाने सकारात्मक निर्णय घेतले असल्याचे आचार्य भोसले म्हणाले.




### उत्कृष्ट मतदान अधिकारी म्हणून बार्शीच्या अनिल देशपांडे यांचा दिल्लीत गौरव

**सोलापूर, दि. १४ जून -**

उत्कृष्ट मतदान अधिकारी म्हणून राष्ट्रीय स्तरावर बार्शीच्या अनिल देशपांडे यांचा दिल्ली येथे गौरव करण्यात आला. मतदान अधिकारी हा निवडणूक आयोगाचा कणा व श्वास असून तो अधिक सक्षम झाला पाहिजे. सध्या भारत निवडणूक आयोगाच्या भारत आंतरराष्ट्रीय लोकतंत्र व निर्वाचन प्रबंध संस्था नवी दिल्ली यांच्यावतीने चार राज्यातील जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, पर्यवेक्षक, केंद्रास्तरीय मतदान अधिकारी यांच्यासाठी राष्ट्रीय पातळीवर प्रशिक्षण व चर्चासत्र ११ ते १३ जून दरम्यान आयोजित केले होते. यावेळी महाराष्ट्रातून १३२ अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील बार्शीचे मतदान अधिकारी अनिल देशपांडे यांनी सुचविलेल्या सुविधामुळे मतदार नोंदी अधिक अचूक व निर्दोष होणार आहेत. तसेच देशपांडे यांनी निवडणूक आयोगाच्या अँप मध्ये अनेक सकारात्मक बदल सुचविले याची आयोगाने दखल घेतली. महाराष्ट्राचे सहायक मुख्य निवडणूक अधिकारी किरण शार्दूल यांनी निवडणूक आयोगाच्या वतीने देशपांडे यांचा विशेष प्रमाणपत्र देऊन गौरव करत अनिल देशपांडे यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या गौरवाबद्दल जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, बार्शीचे तहसीलदार एफ आर शेख, नायब तहसीलदार संजीवन मुंढे, संगणक परिचालक आकाश गुळवे यांनी अभिनंदन केले.



### खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांचा माढ्यातील कापसेवाडी परिसरात दौरा

**टेंभूर्णी, दि. १४ जून-**

खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माढा तालुक्यातील कापसेवाडी व परीसरात अतिवृष्टीमुळे नुकसान झाले होते त्याभागातील पिकांचा पहाणी दौरा केला. मे महिन्यात सुरू झालेल्या आणि न थांबता सुरूच आसलेल्या पावसामुळे द्राक्ष बागावर करपा व डाऊनी या रोगाच्या प्रादुर्भावामुळे सध्य स्थितीला ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे,अतिवृष्टीत केळी पिकांचे नुकसान झाले,डाळींब पिकांवर तेल्याचा प्रादुर्भाव वाढत आहे.नुकसानग्रस्त शेतकर्यांची पिकांची बागांची पहाणी करुन तात्काळ पंचनामे करून करावेत म्हणून खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी कृषी अधिकारी व तहसीलदार यांना सुचना दिल्या. तसेच सततच्या ढगाळ वातावरणामुळे जर द्राक्ष घड निर्मिती होण्यास अडचण निर्माण होत आहेत.. द्राक्ष उत्पादकांच्या बाबत काही अडचण आली तर मी आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले. तसेच यंदा पाऊस झाल्याने पेरण्याची देखील वाढ झालेली आहे शेतकऱ्यांना कुठेही रासायनिक व सेंद्रीय खते व बी बियाणे यांचा कोठेही तुटवडा येणार नाही यांची ही दक्षता घ्यावी म्हणून खा.मोहिते-पाटील यांनी प्रशासनाला सूचना केल्या. यावेळेस नानासाहेब देशमुख, नितीन कापसे, विठ्ठल बारबोले, रामकाका मस्के, शितलकुमार जोकार, सत्यवान लटके, बाळासाहेब चव्हाण, प्रशांत चव्हाण उपस्थित होते.

# वारकऱ्यांची आरोग्य सेवा हीच पांडुरंगाची सेवा

## सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर : वारीत व नंतरही आरोग्य सुविधा देणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ जून-**

आषाढी सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी व जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक सहभागी होतात. सर्व वारकरी भाविकांना पालखी मार्ग, विसावा तसेच पालखी तळांवर आवश्यक आरोग्य सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे. वारकऱ्यांची आरोग्य सेवा करणे ही मोठी भाग्याची गोष्ट असून हीच पांडुरंगाची सेवा आहे. तरी प्रत्येकानेच सर्वश्रेष्ठ सेवाभावाच्या भावनेने कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.



आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमिवर वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधेबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवार, अति संचालक डॉ. संदीप सांगळे, आरोग्य उपसंचालक डॉ.राधाकिशन पवार, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अभियंता अमित निमकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश सुडके आदी उपस्थित होते.

यावेळी आरोग्य मंत्री श्री.आबिटकर म्हणाले, प्रत्येक वारीत आरोग्य विभागाने चांगले केले आहे. या वारीतही आरोग्य विभागाने सूक्ष्म नियोजन करुन वारकरी भाविकांना अधिकच्या सोयी-सुविधा उपलब्ध कराव्यात यामध्ये कोणतेही त्रुटी राहू नये यांची दक्षता घ्यावी.साथरोग नियंत्रणाच्या दृष्टीने पालखी सर्व मार्गावरील पाणी स्त्रोतांचे सर्वेक्षण तसेच पाणी नमुने तपासणी करावी. तसेच पालखी मार्गावरी संबधित गावातून पालखी सोहळे मार्गस्थ झाल्यानंतर त्या ठिकाणची स्वच्छता करुन तात्काळ औषध फवारणी करावी. तसेच तेथील स्थानिक नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. महिला वारक-यांसाठी स्त्रीरोगतज्ञाच्या माध्यमातून विशेष तपासणीचे नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. पालखी मार्गावरील पुरेशा औषधसाठा व तज्ञ व प्रशिक्षित मनुष्यबळ यांची उपलब्धता ठेवावी. पालखी सोहळ्यासोबत राज्याच्या कानाकोपऱ्यातून वारकरी भाविक येतात यासाठी आरोग्य विभागाच्या विविध कल्याणकारी योजना, सुविधा आदीबाबतचा प्रचार -प्रसिध्दी करण्यात यावी. जेणेकरुन आरोग्य विभागाच्या विविध आरोग्य कार्यक्रमांची माहिती सर्व वारक-यांपर्यत पोहोचविण्यात मदत होईल, असेही आरोग्य मंत्री श्री.आबिटकर यांनी सांगितले. तसेच पंढरपूर शहर त्याचबरोबर पालखी मार्गावरील खाजगी दवाखान्यात महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत असणा-या रुग्णालयांना दहा टक्के खाटा आरक्षित करण्यात येणार असून, ट्रॉमा आय. सी.यू. सेंटरच्या ठिकाणी तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येणार आहे असेही मंत्री महोदयांनी सांगितले.

यावेळी आमदार समाधान आवताडे म्हणाले, आतापर्यंत वारी कालावधीत आरोग्य विभागाने चांगल्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या असल्याचे सांगून, पालखी मार्गावर तसेच पंढरपूर शहारात आपला दवाखाना, ट्रामा केअर सेंटर , उपलब्ध आरोग्य सुविधा याबाबत ठळक फलक लावावेत जेणे भाविकांना आरोग्य सुविधेचा लाभ घेता येईल. तसेच वारी संपल्यानंतर स्थानिक नागरिक आजारी पडण्याची शक्यता लक्षात घेवून वारी नंतरही आरोग्य सुविधा उपलब्ध ठेवाव्यात असे सांगितले.आमदार राजू खरे म्हणाले, आषाढी यात्रा कालावधीत येणाऱ्या प्रत्येक वारकरी भाविकाला दर्जेदार सुविधा मिळावी, यासाठी मुबलक औषधसाठा, तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपलब्धता ठेवावी. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम म्हणाले,पावसाचे वातावरण लक्षात घेवून, पालखी मार्गावरील सर्वच ठिकाणच्या पाणी स्तोत्राचे नमुने तपासणी सुरु आहे. टँकर भरण्याचे ठिकाणी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन सदर ठिकाणचे पाणी पिण्यास योग्य असल्याबतचे माहिती देण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी आरोग्य विभागाच्या वतीने केलेल्या तयारीबाबतचे सादरीकरण आरोग्य उपसंचालक डॉ.राधाकिशन पवार यांनी केले. यामध्ये पालखी मार्गावर प्रत्येक पाच किलोमीटर अंतरावरती २०३ आपला दवाखाना स्थापन करण्यात आले आहेत. पालखी मार्गावरील सर्व आरोग्य संस्थामध्ये पुरेशा औषधसाठा व तज्ञ व प्रशिक्षित मनुष्यबळ यांची उपलब्धता असणार आहेत असे सांगितले.

### वाखरी पालखी तळाची आरोग्यमंत्र्यांनी केली पाहणी

आषाढी यात्रेनिमित्त पालखी सोहळ्याबरोबर येणाऱ्या वारकरी, भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. त्या पार्श्वभूमिवर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी वाखरी पालखी तळची पाहणी करून प्रशासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत माहिती घघेवून आवश्यक सूचना त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत संचालक डॉ. विजय कंदेवार, आरोग्य उपसंचालक डॉ.राधाकिशन पवार,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश सुडके उपस्थित होते.

### ३३१ रुग्णवाहिका आणि ४६ ठिकाणी तात्पुरते आयसीयु

पालखी मार्गावर वैदयकीय पथके, आवश्यक उपकरणे व औषधांसह सुसज्ज ३३१ रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार आहेत. ४६ ठिकाणी १० खाटांचे तात्पुरते आय.सी.यू. कक्ष स्थापन करण्यात येणार आहेत. दिंडया सोबत पालखी मार्गावर २९० आरोग्यदुत बाईक ॲम्ब्युलन्स व्दारे आरोग्य सेवा देणार आहेत. त्याचबरोबर वारकरी भाविकांना औषधकिट देखील आरोग्य विभागाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात असल्याची माहितीही यावेळी आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिली.

## पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने पोलीसांनी केली पाहणी

### संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळा ३० जूनला जिल्ह्यात

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि.१४ जून-**

श्री संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सातारा जिल्ह्यातील बरड येथील दि. २९ जून रोजी मुक्काम करून दि. ३० जून रोजी सकाळी ९:३० वाजताचे दरम्यान सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. त्यावेळी होणारी गर्दी लक्षात घेता सोलापूर ग्रामीण पोलीस मार्फत १हजार ६०० पोलीसांचा बंदोबस्त लावला जमार आहे. त्यामध्ये १५० पोलीस अधिकारी, १ हजार ५० पोलिस अंमलदार, ४०० होम गार्ड यांचा समावेश असणार आहे. त्यासंबंधाने पोलीसांनी पाहणी करून आढावा घेतला.



श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २०२५ अनुषंगाने , भाविक भक्तांना कुठलाही त्रास होऊ नये यासाठी आज नातेपुते पोलीस ठाणे हद्दीत सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली अकलूज विभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर, नातेपुते पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी महारुद्र परजणे, पोलीस उपनिरीक्षक किशोर तनपुरे, पोलीस हवालदार अशोक खाडे, युवराज कणसे, महेश जाधव, संतोष वारे यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा मार्ग पाहणी, वॉटर फिलिंग पॉईंट, पालखी विसावा, पालखी क्रॉसिंग पॉइंट, बंदोबस्त बाबत आढावा घेऊन भाविक भक्ताची गैरसोय होणार नाही, विनाअडथळा व अपघात मुक्त वारी करण्याचे नियोजन केलेले आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीतील भाविक भक्तांचे प्रशासन व जनतेच्या वतीने स्वागत केले जाते. सातारा जिल्ह्यातून सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रवेश करताना नातेपुते पोलीस ठाण्याचे हद्दीत पालखीतील भाविक भक्तांना कुठलाही त्रास होऊ नये, पालखीतील प्रसादाची वाहने सुरळीत वेळेत पालखीतळावर पोहोच व्हावीत, वाहतूक नियमन, भाविक भक्तांची सुरक्षा व कायदा सुव्यवस्था, अनुषंगाने सोलापूर ग्रामीण पोलीस मार्फत १६०० पोलीस बंदोबस्त लावला आहे.






## पंढरपूर कॉरिडोर विरोधात ४५८ मते

**एकुण ४८५ पैकी १५ जणांचे बाजूने मतदान**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ जून -**

पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीच्या वतीने विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील बाधितांचा कॉरिडोरसंबंधी कल जाणून घेण्यासाठी पंढरपूरात शनिवारी दि.१४ जूनला गुप्त मतदान घेण्यात आले. विरोधात ४५८ तर बाजूने केवळ १५ मते पडली.एकुण ४८५ नागरिकांनी मतदान केल्याचे तीर्थक्षेत्र बचाव समितीचे अध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी यांनी सांगितले.

याबाबत अध्यक्ष कुलकर्णी म्हणाले, शासनातर्फे बाधितांचा सर्व्हे केला गेला. त्यावेळी बहुतांश नागरिकांनी विरोध दर्शविला होता. शासनाकडून बाधित सकारात्मक आहेत असे चित्र निर्माण केले. त्यावेळेला जिल्हाधिकारी खोटे बोलत होते असे वृत्तपत्रे आणि वाहिन्यांना दिलेल्या मुलखीतीच्या बातम्यांवरून वाटत होते. आता जिल्ह्याचे पालकमंत्री देखील बहुतांश व्यापारी मंडळी आमच्या पाठीशी आहेत असे खोटे बोलत आहेत. यामुळे या प्रश्नाचा निश्चित उलगडा करण्यासाठी म्हणून बचाव समितीच्यावतीने चाचणी पद्धतीने मतदान घेतले गेले. खरंतर हे मतदान शासनाने घ्यावे अशी आम्ही मागणी केलेली होती परंतु त्याला दाद मिळाली नाही म्हणून ही मतदान प्रक्रिया आम्ही घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे विठ्ठल मंदिर परिसरातील हिंदूमहासभेच्या कार्यालयात शनिवारी (ता.१४) संभाव्य कॉरिडोर बाधित मंडळींना मतदानाला येण्यासाठी आम्ही आवाहन केले होते. त्याप्रमाणे सकाळी नऊ पासून संभाव्य कॉरिडोर बाधित मंडळी मतदानासाठी येत होती. मतदानाला बाधित मंडळींचा चांगला प्रतिसाद मिळाला. दुपारपर्यंत मतदानाची प्रक्रिया पार पडली. मतदान प्रक्रिये नंतर मतमोजणी करण्यात आली. यामध्ये कॉरिडोर विरोधात ४५८ तर केवळ १५ जणांनी कॉरिडोरला पाठिंबा दर्शविल्याचे बचाव समितीचे अध्यक्ष कुलकर्णी यांनी सांगितले.


### नेमक्या आकड्यांची माहिती

संभाव्य एकुण कॉरिडोर बाधित मंडळीं पैकी ४८५ मंडळींनी मतदानाचा आपला हक्क बजाविला. त्या मध्ये कॉरिडोर विरोधात ४५८ मते पडली तर केवळ १५ जणांनी कॉरिडोरला सहमती दर्शवित कॉरिडोरच्या बाजूने मतदान केले.या शिवाय नऊ बाधित मंडळी तटस्थ राहिली तर ३ मते बाद ठरली.

## पालखी सोहळ्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाची जय्यत तयारी : सीईओ जंगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. १४ जून -**

जिल्हा परिषद प्रशासनाने आषाढी वारीतील पालखी सोहळ्या साठी जय्यत तयारी करणेत आली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.



जिल्हा परिषदेत आज आषाढी यात्रे निमित्त भाविकांना देणेत येणारे सुविधांची माहिती देणे साठी पत्रकार परिषदेचे आयोजन करणेत आले होते. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव उपस्थित होते.

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे मंत्री जयकुमार गोरे यांचे मार्गदर्शनाखाली विविध सुविधा देणेत येत आहेत. त्यांनी पुढाकार घेतले मुळे पालखी मार्गांनी निगडीत १६ रस्ते मंजूर झाले आहेत. असेही सिईओ जंगम यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचे मार्गदर्शन घेणेत येत असून कामाचे टप्पे ठरवून देऊन कामाचे सनियंत्रण करणे साठी ॲप तयार करणेत आले असल्याचे सिईओ जंगम यांनी सांगितले.

पालखी मार्गावर जिल्ह्यातील एकूण ८१ ग्रामपंचायतीचा सहभाग असून सदर पालखी मार्गाची लांबी १२० किलोमिटर आहे. यंदाच्या वर्षी १०३ वारकरी सुविधा केंद्र मंजुर करण्यात आली आहेत. ९४ जलावरोधक व ९ जर्मन हँगर मंडप मंजुर करण्यात आली आहेत. या वर्षी ४३१५ फिरते शौचालय व त्यासाठी ३२५ स्वच्छता सेवकांची नेमणूक व ११४ सक्शन व जेटिंग मशीन तयार ठेवण्यात आले.

यंदाच्या वर्षी २३४ पाणी टँकर देण्यात आले आहेत. महिला वारकरीकरिता १८२४ महिला स्नान गृह व ११० हिकरणी कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. २१ अतिदक्षता विभाग निवड करुन १२१ आरोग्य दुत(बाईक ऍंबुलन्स) वारीकरिता तयार ठेवण्यात आले आहे. दहा मानाच्या पालख्यांकरिता ६० ठिकाणी ४३१५ तात्पुरते शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. या वारीकरिता जिल्हास्तरावरुन ६ अधिकारी वर्ग, ३१ जिल्हास्तरीय कर्मचारी व ८६ विस्तार अधिकारी व ग्रामसेवक असे एकूण १२३ अधिकारी व कर्मचारी नेमले आहेत.

आरोग्य विभागामार्फत प्रति३ किलोमीटर अंतरावर १४३ आरोग्य सल्ला व उपचार केंद्रांची स्थापना, ५८ रुग्णवाहिका (१०२ आणि १०८) दिंडी सोबत १२१ आरोग्य दुत तसेच आषाढी वारीसाठी ३ कोटी ५० लाख रुपये औषध खरेदीकामी निधी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

४१ बाह्य रस्ते व पालखी तळ सुधारणाचे काम सुरु करणेकरिता २ कोटी ३० लक्ष व ३० रस्त्याचे व पुल दुरुस्तीचे कामाकरिता ३ कोटी ८० लक्ष ग्रामविकास विभागामार्फत मंजुरी देण्यात आलेली आहे.

### जिल्हा परिषदेमार्फत नाविन्यपूर्ण उपक्रम

वाकऱ्यांकरिता गर्दीच्या सनियंत्रणासाठी पालखीतळावर ड्रोनचा वापर, मुक्काम व विसाव्याच्या ठिकाणी ४०० फुट मसाजर तसेच विठ्ठल उर्जा रथ वारकऱ्यासांठी ४ फिरते मोबाईल चार्जिंग सुविधा (१ विठ्ठल उर्जा रथामध्ये १०० चार्जिंग पॉईट) इ. सोई-सुविधा देण्याकरिता नियोजन करण्यात आलेले आहे.